
# मेहता मराठी ग्रंथजगत


जुलै, २०१८ • पृष्ठे १२८ • किंमत : ₹ १५
• वर्ष अठरावे • अंक सातवा


## विठू माझा लेकुरवाळा,
## संगे गोपाळांचा मेळा





# आवर्जून वाचावे असे काही!


















# मेहता मराठी
# ग्रंथजगत

। जुलै २०१८ । वर्ष अठरावे । अंक सातवा

मांडणी-अक्षरजुळणी



**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक

सुनील मेहता,

१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,

बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,

पुणे - ४११ ०३०

फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२

E-mail : info@mehtapublishinghouse.com



संपादक
सुनील मेहता

कार्यकारी संपादक
शंकर सारडा

संपादन साहाय्य
अंजली पटवर्धन

अंकाची किंमत १५ रु.

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| साहित्यवार्ता | १० |
| पुरस्कार | १४ |
| उपक्रम | १८ |
| **पुस्तक परिचय** | |
| **डॉ. आनंद यादव** | |
| एक साहित्यिक प्रवास | २६ |
| बीइंग मॉर्टल | ३४ |
| परवाना जगण्याचा | ५० |
| वर्क लेस डू मोअर | ६६ |
| प्रेमकथा | ७४ |
| अँड द माउंटन्स एकोड | ९२ |
| **प्रासंगिक** | |
| ज्ञानसूर्याची सावली | १०० |
| स्मरण | १०६ |
| अभिप्राय | ११२ |
| **प्रासंगिक** | |
| रंगरेषा (रिमझिम पाऊस..) | ११४ |
| शब्द शब्द जपून ठेव... | ११९ |
| बालनगरी | १२२ |



'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

# संपादकीय

## जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर ते ते...

आला आषाढ-श्रावण
आल्या पावसाच्या सरी
किती चातकचोचीने
प्यावा वर्षाऋतू तरी
मनी तापलेल्या तारा
जरा निवतात संथ
येता आषाढ-श्रावण
निवतात दिशा-पंथ

मर्ढेकरांच्या या प्रसिद्ध कवितेच्या ओळींतून पाऊस आल्यानंतरचा आनंद व्यक्त झाला आहे आणि ही कविता वाचून अर्थातच वाचकालाही प्रसन्नतेचा अनुभव येतो. पाऊस हे निसर्गाचं नुसतं विलोभनीय रूपच नाही, तर निसर्गाच्या व्यापकतेचा तो एक आविष्कार आहे. वर्षभराच्या पाण्याची बेगमी तो करतो, शेतीसाठी वरदान ठरतो, धरतीमातेला हिरवा शालू नेसवून आपल्या डोळ्यांचं पारणं फेडतो. त्यामुळे पावसाळ्यातील निसर्गाची मोहिनी 'मर्ढेकरांसारख्या'कवीवरही पडते. मर्ढेकरांसारख्या म्हणण्याचं कारण असं की मर्ढेकर त्यांच्या कवितांतून प्रतिकात्मकतेने जीवनाच्या वास्तवाला भिडले. उदा. 'पिपात ओल्या मेले उंदीर' ही कविता; पण मर्ढेकरांसारखा कवी आषाढ-श्रावणातील पावसाच्या सरींनी मनोमन चिंब होतो, शांत होतो; कारण वर्षा ऋतू  हे निसर्गातील वास्तव त्यांच्यासमोर रम्य रूपात उभं ठाकतं.

निसर्ग, ऋतुचक्र हे वास्तव प्रत्येक माणसासमोर आहे; पण त्या वास्तवातील व्यापकता त्याला खुणावत नाही. तो कोत्या वृत्तीनं  वागत

राहतो आणि माणसाच्या कोत्या वृत्तीमुळे माणसामाणसांतले गुंतागुंतीचे झालेले संबंध, त्यामुळे त्याची होणारी शारीरिक, मानसिक, भावनिक परवड याचं चित्रण साहित्यात आलं की त्याला 'वास्तव' असं लेबल लावलं जातं. म्हणजे 'जे कुरूप आहे, गुंतागुंतीचं आहे, वाईट आहे ते 'वास्तव' अशीच धारणा आपण करून घेतली आहे आणि वास्तवाचा प्रत्यय देणारं साहित्य हे सर्वश्रेष्ठ साहित्य असं आपण मानतो. या वास्तवाचे निर्मातेही आपणच आहोत.

तेव्हा साहित्यात या वास्तवाचं प्रतिबिंब पडावं की नाही, पडलं तर ते कोणत्या स्वरूपात पडावं, जे साहित्य वास्तव नसतं, ते श्रेष्ठ नसतंच का, असे प्रश्न वास्तवतेच्या संदर्भात पडू शकतात. आजूबाजूला जे नकारात्मक घडतं आहे, ते अधोरेखित करणारा लेखक वास्तवदर्शी समजला जातो. त्याला ही नकारात्मकता डाचत असते, म्हणून तो ती नकारात्मकता साहित्यकृतीतून अधोरेखित करतो. त्याने जे लिहिलेलं असतं, ते 'सत्य' असतं म्हणून वाचकाला ते जवळचं वाटतं किंवा भावतं; पण वास्तवाच्या नावाखाली काही वेळेला साहित्यकृती भडक होतात, बटबटीत होतात. तेव्हा वास्तवही कलात्मकतेने प्रकट झालं तर ते अधिक भावतं. ज्या कथा, कविता, कादंबऱ्या आत्ममग्नतेतून साकारलेल्या असतात त्यांना गौण लेखणारेही वाचक/समीक्षक आहेत; पण आत्ममग्न साहित्यही वाचकाला आनंद देऊ शकतं; कारण सर्वसामान्य माणूस आपल्या सुप्त मनातील भावना फक्त जाणू शकतो; पण अभिव्यक्त करू शकत नाही. त्यामुळे आत्ममग्न साहित्यातून लेखकाने 'स्व'शी साधलेला संवादही वाचकाला आपला वाटू शकतो.

संत साहित्याचा विचार केला तर त्यातही आत्ममग्नता आहे, उपदेश आहे. म्हणून ते साहित्य वास्तव नाही, असं आपण म्हणू शकतो का? संतांचं परमेश्वराशी झालेलं तादात्म्य, त्यांचा उपदेश याबद्दल कोणताच विकल्प आपल्या मनात येत नाही; कारण त्यांची स्वमग्नता, त्यांचा उपदेशही स्वानुभावाची प्रचिती देतो. म्हणून आजही संत साहित्य मार्गदर्शक ठरतं. संतांच्या भोवतीही नकारात्मक परिस्थिती होती; पण त्यांच्या अभंगांतून त्यांनी त्या परिस्थितीवरची उत्तरं दिली. 'शब्देवीण

संवादु, दुजेवीण अनुवादु’ ही ज्ञानदेवांची एक भावावस्था आहे. सर्वसामान्य माणूस त्या भावावस्थेत जाऊ शकत नाही; पण त्या भावावस्थेतलं आत्मिक सौंदर्य त्याला जाणवू शकतं आणि जीवनातील उच्च अशा आनंदाची, सकारात्मकतेची प्रचिती त्याला येऊ शकते. थोडक्यात, संतांनी आपल्या आजूबाजूच्या वास्तवाकडे डोळेझाक केली नाही, तर त्या वास्तवाला आत्मानुभूतीची जोड दिली तर ते सुंदर होऊ शकतं, याची जाणीव सर्वसामान्य माणसाला करून दिली.

वाईट अनुभव किंवा दु:ख ही माणसाच्या लेखनाची प्रेरणा असेल तर अनुभवांची, दु:खाची निर्मिती जाणीवपूर्वक केली जावी का? म्हणजे त्याच्यातून थोर साहित्यिक निर्माण होतील? जगात दु:ख नसेल, कटू अनुभव नसतील तर चांगलं साहित्य निर्माणच होणार नाही का? आपल्या भोवतीचं वास्तव सौंदर्यपूर्ण करण्याची जबाबदारी आपली आहे आणि त्यानंतर जी साहित्यनिर्मिती होईल, ती ‘सत्यम् शिवम् सुंदरम्’चा प्रत्यय देणारी नसेल कशावरून? तेव्हा जे उत्तम आहे, उदात्त आहे, उन्नत आहे, ते महन्मधुर आहे, असं सावरकरांनी लिहून ठेवलंय. ज्या माणसाने ब्रिटिशांच्या अमानुष क्रौर्याचा अनुभव घेतला, त्याच्या लेखणीतून उतरलेली ही ओळ आहे, हे विशेषत्वाने लक्षात घ्यावं लागतं. तेव्हा अशा महन्मधुरतेकडे वाटचाल करायला काय हरकत आहे? वारकऱ्यांची वाटचाल चालू आहे ‘विठ्ठल’रूपी महन्मधुरतेकडे!

तोच आपल्याला प्रेरणा देईल चांगुलपणाकडे जाण्याची!



# मेहता मराठी ग्रंथजगत

## नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**
त्रैवार्षिक वर्गणी ३५०रुपये
पंचवार्षिक वर्गणी ५००रुपये

---

**डिजिटल अंकाची वर्गणी**
त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

**आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी**

## सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

---

**अधिक माहितीसाठी संपर्क**

wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**इथे मिळतील ई-बुक्स...**

**eBooks**



**www.amazon.in**

**play.google.com**

**Online पुस्तके खरेदी करा** **www.mehtapublishinghouse.com**

# साहित्यवार्ता

## डॉ. अतुल गवांदे यांचा सातासमुद्रापार झेंडा ॲमेझॉन-हॅथवेच्या नव्या कंपनीची धुरा सांभाळणार

वैद्यकीय क्षेत्रातील चुकांवर नेहमी आपल्या लिखाणाद्वारे बोट ठेवणारे प्रसिद्ध डॉक्टर आणि लेखक अतुल गवांदे यांच्या रूपाने भारताच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. ॲमेझॉन, बर्कशायर, हॅथवे आणि जेपी मॉर्गन या जगातील दिग्गज कंपन्यांच्या भागिदारीतून सुरू होणाऱ्या नव्या कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकारपदी (सीईओ) मराठमोळ्या गवांदे यांची नियुक्ती झाली आहे.

नव्या कंपनीचे कार्यालय अमेरिकेतील बोस्टन शहरात असेल. कोणत्याही नफ्याची अपेक्षा न बाळगता अमेरिकेतील कर्मचाऱ्यांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, हा यामागील मुख्य उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले. गवांदे हे एक एंडोक्राईन सर्जन आहेत. सध्या ते ब्रिगहॅममध्ये महिलांसाठीच्या रुग्णालयात कार्यरत आहेत.

## हमीद दलवाई यांचे योगदान दुर्लक्षित

हमीद दलवाई यांनी १९६६मध्ये मोजक्या महिलांना सोबत घेऊन न्याय्य हक्कांसाठी लढा उभा केला. ते काळाच्या पुढे जाऊन विचार करणारे होते. पूर्वीच्या काळातील मुस्लिम समाजाला त्यांचे विचार पटले नाहीत. त्यामुळे त्यांना समाजातून विरोध सहन करावा लागला. तरीही हमीद दलवाई यांनी धर्मातील चुकीच्या गोष्टींना नेटाने विरोध केला. मूलभूत अधिकारांच्या मागणीसाठी मोर्चा घेऊन ते मंत्रालयावर धडकले. त्यांचे विचार पुरोगामी आणि कृतिशील होते. तिहेरी तलाक कायद्याच्या प्रक्रियेमध्ये हमीद दलवाई यांचे योगदान नाकारता येणार नाही. दलवाई यांच्याबाबत सर्वसामान्यांना फारशी माहिती नाही, याची खंत वाटते. त्यांचे योगदान दुर्लक्षित राहिले आहे, अशी खंत ज्येष्ठ अभिनेते नसीरुद्दीन शाह यांनी व्यक्त केली.

मुस्लिम समाजाच्या उत्थानासाठी लढा उभारणारे, संघटनेच्या

माध्यमातून समानतेचे, सामाजिक सुधारणेचे, धर्मनिरपेक्षतेचे बीज पेरणारे हमीद दलवाई यांचा जीवनप्रवास उलगडून दाखवणाऱ्या 'हमीद : द अनसंग ह्यूमॅनिस्ट' या लघुपटाचे प्रदर्शन नुकतेच राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात करण्यात आले. यावेळी नसिरुद्दीन शहा यांच्यासह ज्योती सुभाष, अमृता सुभाष उपस्थित होत्या.

शाह म्हणाले, ''ज्योती सुभाष यांनी माहितीपटाबद्दल कल्पना दिल्यावर मी हमीदभाईंचे साहित्य वाचले. 'भारतातील मुस्लिमांचे राजकारण' आणि 'इंधन' ही पुस्तके माझ्या वाचनात आली. त्यांचे विचार आणि कार्याचा परीघ पाहून मी भारावून गेलो. त्यांचे विचार अत्यंत स्पष्ट होते. दुर्दैवाने त्यांना कार्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अत्यंत कमी आयुष्य लाभले, याचे शल्य वाटते. आजच्या काळात त्यांच्या विचारांचा जागर करण्याची आणि तरुण पिढीपर्यंत पोचवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.''

या लघुचित्रफितीच्या लेखिका, दिग्दर्शिका ज्योती सुभाष यांनी लहानपणी हमीद दलवाई यांना बघितल्याचे सांगितले.

दलवाई माणूस म्हणून इतके मोठे होते, की नसिरुद्दीन शाहांसारख्या माणसाला कामात सहभागी व्हावेसे वाटले. अभिनेत्री अमृता सुभाष म्हणाल्या, ''दलवाई कायम उत्साहाने रसरसलेले असायचे असे सांगितले जाते. त्यांच्यासारखा मनस्वी माणूस एकदा प्रत्यक्षात बघायला मिळायला हवा होता असे वाटते.''

हमीद दाभोलकर म्हणाले, ''ही लघुचित्रफीत खूप आधी व्हायला हवी होती. दलवाई यांच्या नावावरून माझे नाव ठेवण्यात आले, ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. सामाजिक प्रश्न हाताळण्याची त्यांची शैली कायम भुरळ घालणारी वाटते.''

**ज्योती सुभाष तिहेरी भूमिकेत**

या लघुपटाचे लेखन, निर्मिती आणि दिग्दर्शन अशी तिहेरी जबाबदारी ज्योती सुभाष यांनी पेलली आहे. ओंकार अच्युत बर्वे यांनी दिग्दर्शन साहाय्य केले आहे. नसिरुद्दीन शाह यांच्यासह प्रसिद्ध अभिनेत्री अमृता सुभाष, डॉ. हमीद दाभोलकर आणि क्षितीश दाते यांनी लघुपटासाठी निवेदक म्हणून काम केले आहे. योगेश राजगुरू यांनी छायालेखनाचे, क्षमा पाडळकर यांनी संकलनाचे, विपुल पॉल यांनी ध्वनिसंयोजनाचे काम केले असून, लघुपटाला

नरेंद्र भिडे यांचे पार्श्वसंगीत आहे. ज्येष्ठ नेते भाई वैद्य यांच्या मुलाखतीचा लघुपटात समावेश आहे.

**✍ एक हजार ग्रंथांचा प्रकल्प ; दुर्मिळ ग्रंथांच्या डिजिटायझेशनला वेग पहिल्या टप्प्यात दीडशे पुस्तकांचे डिजिटायझेशन पूर्ण**

शतकोत्तर दशकपूर्तीचा टप्पा पार केलेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वा.गो. आपटे संदर्भ ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथांच्या डिजिटायझेशनच्या कामास प्रारंभ झाला आहे. पहिल्या टप्प्यातील सुमारे दीडशे पुस्तकांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असून, ते साहित्य परिषदेकडे सोपवण्यात आले आहे. यासाठी सुमारे एक लाख रुपये खर्च आला आहे. डिजिटायझेशनसाठी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे सहकार्य लाभले असून, अद्ययावत यंत्रणेच्या माध्यमातून पुढील टप्प्यातील संगणकीकरण लवकरच सुरू केले जाणार आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या संदर्भ ग्रंथालयात १८०० सालापासूनच्या दुर्मिळ ग्रंथांचा समावेश आहे. साहित्य परिषदेला या कामासाठी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे सहकार्य लाभले आहे. सुमारे एक हजार ग्रंथांचे डिजिटायझेशन करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या ग्रंथांचे डिजिटायझेशन पूर्ण झाल्यानंतर मसाप संकेतस्थळावरील ई-ग्रंथालयात हा अनमोल ठेवा वाचकांसाठी, संशोधकांसाठी आणि अभ्यासकांसाठी उपलब्ध होणार आहे, अशी माहिती मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी दिली. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे वैभव असलेले वा.गो. आपटे संदर्भ ग्रंथालय नेहमीच संशोधकांच्या आणि अभ्यासकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिलेले आहे. ५०,००० हून अधिक मौलिक संदर्भग्रंथांनी समृद्ध असलेल्या या ग्रंथालयात साहित्यप्रेमी वाचकांबरोबरच स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा राबता असतो. हा अनमोल ठेवा जतन करण्यासाठी परिषदेच्या कार्यकारी मंडळाने लोकसहभागातून डिजिटायझेशन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी आणि भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेचे मानद सचिव डॉ. श्रीकांत बहुलकर, कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष भूपाल पटवर्धन आणि निखिलेश कुलकर्णी यांच्या बरोबरच्या बैठकीत डिजिटायझेशनसाठी सहकार्याचा

भांडारकर संशोधन संस्थेने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

अत्याधुनिक स्कॅनिंग मशिनच्या साहाय्याने हे डिजिटायझेशनचे काम पूर्ण होत आहे.

### ✍ खूशखबर! मुले मराठी वाचताहेत!

मुले वाचत नाहीत; किंबहुना मुले मराठी पुस्तके वाचत नाहीत, ही चिंता कायमच पालकांना, लेखकांना सतावत असते. मराठीच्या तुलनेत मुलांचा इंग्रजी भाषेकडील वाढता कल हीसुद्धा डोकेदुखी ठरत आहे; मात्र यंदाच्या उन्हाळी सुट्टीने मराठी बालसाहित्याला 'अच्छे दिन' दाखवले आहेत. चरित्रविषयक लिखाणासह अनुवादित साहित्याकडील मुलांचा कल मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मराठी बालसाहित्याची मागणी वर्षभराच्या तुलनेत उन्हाळ्याच्या सुट्टीत २०-२५ टक्क्यांनी वाढली.

सध्याच्या काळात मुलांवर मनोरंजनाच्या नानाविध पर्यायांचा अक्षरश: भडिमार होत आहे. मॉल संस्कृती, मल्टिप्लेक्समधील झगमग, मोबाईल, टीव्हीकडील वाढता कल यामुळे मुले वाचनापासून दूर होत आहेत. कल्पनाशक्तीला, सर्जनशीलतेला वाव देणारे वाचनच काळाच्या ओघात मागे पडत चालले आहे. त्यातही इंग्रजी विरुद्ध मराठी ही लढाई चिंतेचा विषय बनली आहे. मुले एकतर कमी वाचतात आणि त्यातही इंग्रजीवर भर देतात, हे वास्तव सर्वत्र पाहायला मिळते; मात्र यंदाची उन्हाळ्याची सुट्टी या डोकेदुखीला अपवाद ठरली. मुलांनी मोठ्या प्रमाणात मराठी पुस्तकांना पसंती दिल्याचे चित्र होते. त्यामुळे मराठी पुस्तकांना 'अच्छे दिन' आल्याचे समाधान प्रकाशक, बालसाहित्यिकांकडून व्यक्त केले गेले.

उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांना वाचनासाठी प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने मुलांसाठी ग्रंथालय व्यवस्था, वाचनाची शिबिरे, बालसाहित्यिकांशी संवाद, ओरिगामी, चित्रकला, गोष्टींचा तास अशा विविध उपक्रमांवर भर देण्यात आला. एप्रिल आणि मे अशा दोन महिन्यांमध्ये बालमहोत्सव आयोजित करण्यात आल्याने मुलांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला.

मुलांना वाचायला आवडतेच; मात्र मुलांना पुस्तकांपर्यंत पोहोचवता आले किंवा पुस्तके मुलांपर्यंत पोहोचली तर वाचनाशी त्यांची नक्कीच गट्टी जमते, असा विश्वास बालसाहित्यिका डॉ. संगीता बर्वे यांनी व्यक्त केला. ◆

# पुरस्कार

**मतकरी, गोरे यांना साहित्य अकादमी; बालदिनी होणार पुरस्कारांचे वितरण**



रत्नाकर मतकरी




नवनाथ गोरे

ज्येष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरी यांना साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार २०१८ जाहीर झाला. त्याचबरोबर नवनाथ गोरे यांना अकादमीचा युवा साहित्य पुरस्कार मिळाल्याचीही घोषणा करण्यात आली.

साहित्य अकादमीच्या वतीने दरवर्षीच्या मुख्य पुरस्कारांव्यतिरिक्त २२ भारतीय भाषांतील साहित्यिकांना बाल, युवा, अनुवाद, महिला आदी गटांतील पुरस्कार दिले जातात. मतकरी यांना बालसाहित्यातील समग्र योगदानाबद्दल हा पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रत्येकी ५० हजार रुपये रोख व ताम्रपट असे पुरस्काराचे स्वरूप आहे. येत्या १४ नोव्हेंबरला (बालदिनी) नवी दिल्लीत पुरस्कारांचे वितरण होईल.

मराठीतील बाल साहित्य पुरस्कार विजेत्यांची निवड अनिल अवचट, बाबा भांड व डॉ. वसंत पाटणकर यांच्या समितीने केली. दरम्यान, कोंकणीमधील बाल साहित्य पुरस्कार कुमुद भिखू नाईक यांना 'मॉनिटर' या कथेसाठी जाहीर झाला.साहित्य अकादमीच्या युवा पुरस्कारासाठी नवनाथ गोरे यांच्या 'फेसाटी' या कादंबरीची निवड करण्यात आली. प्रत्येकी ५० हजार रुपये रोख असे त्याचे स्वरूप आहे. या गटातील कोंकणीचा पुरस्कार विल्मा बंटवाळ यांना 'मुखडी' या कवितासंग्रहासाठी मिळाला आहे. मराठीतील विजेत्यांची निवड वसंत आबाजी डहाके, रा.रं. बोराडे व सतीश आळेकर यांच्या समितीने केली.

**नवं कोरं**




# ख्रिस गेल सिक्स मशिन

लेखक
**ख्रिस गेल**
**टॉम फोर्डायिस सोबत**

अनुवाद
**दीपक कुळकर्णी**

**किंमत : ३९५/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

मी मारलेल्या षट्‌कारांमुळे अनेक चेंडू स्टेडियमच्या स्टँडमध्ये जाऊन पडले आहेत. काही चेंडू स्टँड्‌सच्याही पलीकडे गेले आहेत... मी मारलेल्या चेंडूंमुळे ज्या गाड्यांना पोचे पडले, त्या सर्व गाडीमालकांची मी जाहीर माफी मागतो. गाडीच्या विंडस्क्रीनचा जर चक्काचूर झाला असेल, तर मला क्षमा करा. पुढच्या वेळी जेव्हा सिक्स मशिन तुमच्या शहरात सामना खेळायला येईल, तेव्हा कृपया गाडी थोड्या दूर अंतरावर उभी करा. त्यामुळे स्टेडियममध्ये पोहोचण्यासाठी तुम्हाला जास्त चालावं लागेल; पण तुमचे चालण्याचे श्रम नक्कीच सार्थकी लागतील.

# पुरस्कार



### ✍ योजना यादव यांच्या 'मरी मरी जाय सरीर' या कवितासंग्रहास आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी यांचा पुरस्कार जाहीर

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या संपादक योजना यादव यांच्या 'मरी मरी जाय सरीर' या काव्यसंग्रहास आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी यांचा पुरस्कार जाहीर झाला आहे. १३ जुलै २०१८ रोजी आपटे वाचन मंदिरात साहित्य संमेलनाचे विद्यमान अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते या पुरस्काराचं वितरण करण्यात येणार आहे. या कवितासंग्रहातील कविता स्त्रीच्या अंतर्मनाची स्पंदनं टिपणाऱ्या आहेत. त्यांच्या या कवितासंग्रहासाठी त्यांना महाराष्ट्र साहित्य परिषद, मंगळवेढा आणि अखिल भारतीय महाराष्ट्र साहित्य परिषद, बडोदा या पुरस्कारांनी यापूर्वी गौरवण्यात आलं आहे. मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुक सेलर्स यांच्या तर्फे योजना यादव यांचं मन:पूर्वक अभिनंदन!

### ✍ पुष्पा भावे यांना राजर्षी शाहू पुरस्कार


ज्येष्ठ पुरोगामी विचारवंत प्रा. पुष्पा भावे यांना राजर्षी शाहू पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. शाहू जयंतीदिनी २६ जून रोजी श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. एक लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या नावे पुरस्कार मिळाल्याबद्दल भावे यांनी आनंद व्यक्त केला. मी जे शक्य होते ते छोटे काम सातत्याने करत राहिले. माझ्या हातून फार मोठी कामगिरी झाली असे नाही; परंतु या निमित्ताने पुन्हा एकदा त्या विचारांचा जागर होतो हे महत्त्वाचे असल्याची भावना प्रा. भावे यांनी व्यक्त केली.

नवं कोरं

TBC-27 Book No. 4

TBC सभासदांना निम्म्या किमतीत

# द ओडेसा फाइल




लेखक
**फ्रेडरिक फॉर्सिथ**

अनुवाद
**अशोक पाथरकर**

**किंमत : ३८०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

तुम्ही भूतकाळ माफ करू शकता?

१९६३ साल. एका तरुण जर्मन पत्रकाराला वंशसंहारातून वाचलेल्या एका माणसाच्या आत्महत्येच्या तपासाची कामगिरी देण्यात आली आहे. बातमी साधी सरळ वाटते : एका व्यक्तीच्या हालअपेष्टांची करुण कहाणी; पण मृत व्यक्तीच्या डायरीच्या पानात एक दीर्घकाळ दडलेले रहस्य सापडते.

त्यानंतर जे घडते ते म्हणजे हजारो लोकांच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या आणि ज्याला त्याबद्दल अजून शिक्षा झालेली नाही, अशा छळछावणीच्या एका भूतपूर्व प्रमुखाचा जीवघेणा पाठलाग.

## उपक्रम

# दिनविशेष

**वाचकांसाठी सुवर्णसंधी**

**करा मैत्री पुस्तकांशी**

**'मेहता पब्लिशिंग हाऊस'चा नवीन उपक्रम**

**१६ जुलै २०१८ ते १५ ऑगस्ट २०१८**

**दरम्यानचा दिनविशेष**

आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना
शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.
authors@mehtapublishinghouse.com

## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर
## ५० टक्क्यांपर्यंत सूट

**१७ जुलै - अर्ल स्टॅन्ले गार्डनर यांचा जन्मदिन**

'द केस ऑफ द आइस कोल्ड हॅन्ड्स, द केस ऑफ द केअरलेस क्यूपिड, द केस ऑफ द काउंटरफिट आय, द केस ऑफ द क्रिमसन किस,द केस ऑफ द क्रुकेड कँडल, द केस ऑफ द डेडली टॉय,द केस ऑफ द डेम्युर डिफेन्डन्ट, द केस ऑफ हॉन्टेड हसबन्ड, द केस ऑफ द हाउलिंग डॉग, द केस ऑफ द लकी लूझर' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - २०९०/-**

*१७ जुलै ते १९ जुलैपर्यंत*

**सवलत किंमत १३९९/-**

## २२ जुलै - धनंजय बिजले यांचा जन्मदिन

‘लढा लोकपालचा... उद्रेक आम आदमीचा, अण्णा हजारे : भ्रष्टाचाराच्या विरोधातील भारतीय लढ्याचा चेहरा’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३४०/-**

*२२ जुलै ते २४ जुलैपर्यंत*

**सवलत किंमत १९९/-**

## २६ जुलै - कारगिल विजय दिवस

‘परमवीर चक्र’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - २२०/-**

*२६ जुलै ते २७ जुलैपर्यंत*

**सवलत किंमत १२९/-**

## २७ जुलै - आशा बगे यांचा जन्मदिन

‘निसटलेले, पाऊलवाटेवरले गाव, प्रतिद्वंद्वी’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत -४२०/-**

*२७ जुलै ते २९ जुलैपर्यंत*

**सवलत किंमत २४९/-**

## २८ जुलै - जागतिक निसर्गसंवर्धन दिन

‘आपली सृष्टी **१०** पुस्तकांची मालिका, वसुंधरा, पर्यावरण प्रदूषण, वेध पर्यावरणाचा, वायू प्रदूषण’, नागझिरा या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - २२१५/-**

*२८ जुलै ते ३० जुलैपर्यंत*

**सवलत किंमत १०९९/-**

## २९ जुलै - जागतिक व्याघ्रदिन

‘वाघाच्या मागावर’ या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - १८०/-**

*२९ जुलै ते ३१ जुलैपर्यंत*

**सवलत किंमत १०८/-**

## २९ जुलै - जे. आर. डी. टाटा यांचा जन्मदिन

'जे. आर. डी. टाटा यांची पत्रे, की नोट जे. आर. डी. टाटा, टाटा एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती, जे. आर. डी. एक चतुरस्त्र माणूस' या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ११०५/-**

**सवलत किंमत ६४९/-**

*२९ जुलै ते ३१ जुलैपर्यंत*

## २ ऑगस्ट - दीपा महानवर यांचा जन्मदिन

'विमुक्ती' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - २५०/-**

**सवलत किंमत १४९/-**

*२ ऑगस्ट ते ४ ऑगस्टपर्यंत*

## ३ ऑगस्ट – अनिल काळे यांचा जन्मदिन

'मार्कर, ओल्ड सिटी हॉल, ओमेर्ता, द फर्म, द फिस्ट ऑफ गॉड, द रेनमेकर, द रनअवे ज्यूरी' या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २६१०/-**

**सवलत किंमत १२९९/-**

*३ ऑगस्ट ते ५ ऑगस्टपर्यंत*

## ४ ऑगस्ट – राजीव तांबे यांचा जन्मदिन

राजीव तांबे लिखित ८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ७८०/-**

**सवलत किंमत ४२९/-**

*४ ऑगस्ट ते ७ ऑगस्टपर्यंत*

## ४ ऑगस्ट – लीना दामले यांचा जन्मदिन

लीना दामले लिखित 'अंतरिक्षाच्या अंतरंगात, कथारूपी खगोलशास्त्र' पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - २७०/-**

**सवलत किंमत १५९/-**

*४ ऑगस्ट ते ६ ऑगस्टपर्यंत*

## ५ ऑगस्ट – मैत्री दिन

'चौघीजणी, टू ब्लू, मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा, फाईव्ह पॉइंट समवन, द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ, एक

होता मित्र, दोस्त, अदान ॲण्ड ईव्हा, मैत्री अशी आणि तशी’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - १९००/-**

*५ ऑगस्ट ते ७ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत ११४९/-**

## ६ ऑगस्ट – हिरोशिमा दिन आणि ॲन्टी न्यूक्लीअर दिन

वि. स. वाळिंबे लिखित ‘वॉर्सा ते हिरोशिमा’ पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत - ५५०/-**

*६ ऑगस्ट ते ८ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत २९९/-**

## ८ ऑगस्ट - शंकर पाटील यांचा जन्मदिन

शंकर पाटील लिखित **२१** पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – २७०५/-**

*८ ऑगस्ट ते ११ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत १६८०/-**

## ११ ऑगस्ट - वि. स. वाळिंबे यांचा जन्मदिन

‘नेताजी, वॉर्सा ते हिरोशिमा, वुइ, दि नेशन, वुइ, दि पीपल’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत – १५६५/-**

*११ ऑगस्ट ते १४ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत १०२७/-**

## १५ ऑगस्ट – स्वातंत्र्यदिन

‘वुइ, दि नेशन, वुइ, दि पिपल, नेताजी, महामानव सरदार पटेल, वादळमाथा ते १९६५ भारत-पाक युद्ध, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया,इमॅजिनिंग इंडिया, फ्रीडम ॲट मिडनाइट, Be the Change भ्रष्टाचाराशी लढा, अ बेटर इंडिया अ बेटर वर्ल्ड, सैनिकहो तुमच्यासाठी, मोठ्यांच्या छोट्या गोष्टी, परमवीरचक्र’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत - ३८३५/-**

*१५ ऑगस्ट ते १६ ऑगस्टपर्यंत*

**सवलत किंमत २१४९/-**

## JULY महिना विशेष

### ‘J' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २७८५/- सवलत किंमत -१६७१/-

संच २ मधील १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २९२३/- सवलत किंमत -१७५४/-

संच ३ मधील १२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २४३०/- सवलत किंमत -१४५८/-

### 'U' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील ८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २०४५/- सवलत किंमत -१२२७/-

संच २ मधील १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २०६५/- सवलत किंमत -१२३९/-

### 'L' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २६४०/- सवलत किंमत -१५८४/-

संच २ मधील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २७७०/- सवलत किंमत -१६६२/-

### 'Y' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - १७५५/- सवलत किंमत -१०५३/-

## AUGUST महिना विशेष

**'A' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट**

संच १ मधील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - ३१७०/- सवलत किंमत -१९०२/-

संच २ मधील १८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - ३१७०/- सवलत किंमत -१९०२/-

संच ३ मधील १५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - ३३६५/- सवलत किंमत -२०१९/-

संच ४ मधील १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २८१०/- सवलत किंमत -१६८६/-

संच ५ मधील १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २८७०/- सवलत किंमत -१७२२/-

संच ६ मधील १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत - २८४५/- सवलत किंमत -१७०७/-

संच ७ मधील ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -२९८५/- सवलत किंमत -१७९१/-

संच ८ मधील २० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -२९६०/- सवलत किंमत -१७७६/-

संच ९ मधील १७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३११०/- सवलत किंमत -१८६६/-

संच १० मधील २० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३२१४/- सवलत किंमत -१९२८/-

**'U' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचासाठी**
**जुलै महिन्यातील 'U' आद्याक्षराचा संच पहावा.**

## ‘G' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील २४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३७३५/- सवलत किंमत -२२४१/-

संच २ मधील १९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३३५५/- सवलत किंमत -२०१३/-

संच ३ मधील १७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -४४४०/- सवलत किंमत -२६६४/-

## ‘S' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३२५०/- सवलत किंमत -१९५०/-

संच २ मधील १६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -२९४४/- सवलत किंमत -१७६६/-

संच ३ मधील १६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३१४०/- सवलत किंमत -१८८४/-

संच ४ मधील २० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३१३०/- सवलत किंमत -१८७८/-

संच ५ मधील १२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३०४०/- सवलत किंमत -१८२४/-

संच ६ मधील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३०२०/- सवलत किंमत -१८१२/-

संच ७ मधील १६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -२९५०/- सवलत किंमत -१७७०/-

संच ८ मधील १६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३०२०/- सवलत किंमत -१८१२/-

संच ९ मधील १६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३१४०/- सवलत किंमत -१८८४/-

संच १० मधील १७ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -४११०/- सवलत किंमत -२४६६/-

## 'T' आद्याक्षराच्या पुस्तकांच्या संचावर ४०% पर्यंत सूट

संच १ मधील १८ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३९८५/- सवलत किंमत -२३९१/-

संच २ मधील १६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -४०३०/- सवलत किंमत -२४१८/-

संच ३ मधील १६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -४०००/- सवलत किंमत -२४००/-

संच ४ मधील १५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -४१८५/- सवलत किंमत -२५११/-

संच ५ मधील १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -३९९४/- सवलत किंमत -२३९६/-

संच ६ मधील १४ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -४०९५/- सवलत किंमत -२४५७/-

संच ७ मधील १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -४०६५/- सवलत किंमत -२४३९/-

संच ८ मधील १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -४१२५/- सवलत किंमत -२४७५/-

संच ९ मधील १६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -४१६०/- सवलत किंमत -२४९६/-

संच १० मधील १९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत -४२८५/- सवलत किंमत -२५७१/-


आमचे लेखक-अनुवादक यांच्या जन्मदिनानिमित्त
तसेच दिनविशेषावर आधारित विषयावरील आणि आद्याक्षरांच्या
पुस्तकसंचावर विशेष सवलत.


**किमतींमध्ये बदलाची शक्यता**

**अधिक माहितीसाठी संपर्क : फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / What's App No. 9420594665**

website : www.mehtapublishinghouse.com

# पुस्तक परिचय

## डॉ. आनंद यादव
## - एक साहित्यिक प्रवास




संपादक

**डॉ. कीर्ती मुळीक**

**श्री. अप्पासाहेब जकाते यादव**

*आनंद यादव यांची प्रत्येक कलाकृती लोकप्रिय ठरली. असे असले तरी स्वतःत न रमता, त्यांनी आपुलकीने अनेक नवोदित लेखकांना मार्गदर्शन केले. त्यांच्या लेखनाला प्रोत्साहन दिले; ग्रामीण साहित्य चळवळ केली नि त्या बाबतीत सामाजिक धुरा आपल्या खांद्यावर घेतली. यादव यांची ही सामाजिक बांधिलकी मोठी आहे. 'कलावंत केवळ स्वतःत रमणारा असतो,' या विधानाला यादव अपवाद आहेत. साहित्यदिंडीतील प्रत्येक वारकऱ्याला त्यांनी आपल्यात सामावून घेतले. त्यामुळे साहित्यरसिकांनी त्यांना संतपद दिले.*

*अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांना मोठ्या संख्येने मतं देऊन निवडले. यादव यांना मिळालेली लोकमान्यता सहन न होऊन काही मतलबी व्यक्तींनी कुटिल राजकारण केले. वैचारिक वाद ही हिंदू संस्कृती आहे; परंतु हे वाद हिंसक पातळीवर नेण्यात आले. यादव या साहित्यसंमेलनासाठी येऊ शकले नाहीत. ही या समाजाची शोकांतिका आहे. प्रतिभावंतांना या गोष्टींविषयी जीवनात ना खंत, ना खेद राहतो. स्वतःच्या कथा, कविता, कादंबऱ्यांमधून त्यांनी बोली भाषेतून निवेदन व संवादलेखन केले. स्वतंत्र लेख लिहून त्यांनी बोली भाषेचे सामर्थ्य जाणकारांच्या लक्षात आणून दिले. यादव यांच्या या कृतीमुळे मराठी ग्रामीण साहित्याला नवे परिमाण प्राप्त झाले. अनेक ग्रामीण लेखकांनी आपल्या बोली भाषेतून साहित्यकृती निर्मिण्यास सुरुवात केली. आजही ही परंपरा सुरू आहे. 'मराठी ग्रामीण साहित्याची चळवळ' सुरू करून यादव यांनी ग्रामीण जीवनाचे मराठी साहित्यातून होणारे कृतक दर्शन नाकारले. विविध पातळ्यांवर होणारी ग्रामीण लेखकांची कोंडी फोडली. त्यांच्या लेखनाला वाङ्मयीन दृष्टी प्राप्त करून दिली.*

## साहित्यातलं काटकोनी वळण

सन १९६० पर्यंतचं मराठी साहित्य स्थूलमानानं नागरी होतं. लिहिणारे साहित्यिक, त्यांचे विषय, पात्रं, समस्या, भाषा, प्रश्न, परिवेश सारं नागरी जीवनावर बेतलेलं असायचं. पण 'ठार ग्रामीण' प्रवाह म्हणता येईल असं साहित्य तत्पूर्वी नव्हतं. त्याच्या पाऊलखुणा पूर्वकाळात जरूर सापडतात. पायवाटा मळण्याचे प्रयत्नही आढळतात; पण ग्रामीण साहित्याचा ध्यास घेऊन साहित्याच्या विविध प्रकारांमध्ये लेखन करणं, त्याच्या समीक्षेबद्दलची कसोटी तयार करणं, तिचं व्याकरण नि भाषा वेगळी आहे असं ठासून सांगणं, त्यासाठी नागरी साहित्यिक, संपादक, समीक्षकांकडून 'यादव पत्रिका', 'यादव काल' (जो पुढे त्यांचा 'काळ' ठरला!) अशी हेटाळणी ऐकून घेणं नि तरीही ग्रामीण साहित्याबद्दलचा आपला आग्रह न सोडणं,

अशा प्रतिबद्धपणे ग्रामीण साहित्य लिहिणं, त्याबद्दल बोलणं, साहित्यिक आंदोलन उभं करणं, नवशिक्षित ग्रामीण साहित्यिकांना लिहितं करणं, प्रोत्साहन देणं, अशा अनेक अंगांनी प्रचलित मराठी नागरीप्रचुर साहित्यास मिलिटरी भाषेत सांगायचं तर 'अबाऊट टर्न' करणं नि वाहत्या रस्त्यावर सरळ नवा काटकोनी रस्ता तयार करणं (आजच्या भाषेत तर त्याला सहा पदरी क्रॉंक्रीटचा हमरस्ता, सुपर हायवे, एक्सप्रेस हायवेच म्हणायला हवं!) असं ऐतिहासिक कार्य डॉ. आनंद यादव यांनी केलं.

ग्रामीण साहित्यलेखन हा डॉ. यादवांच्या जीवनातील मूलभूत स्पंदनाचा भाग आहे. तो त्यांचा श्वास आहे, प्राण आहे. जीवनाचा तो एक न संपणारा शोध आहे. तो त्यांचा 'आदिताल' आहे. त्यामागे पूर्वसुरींच्या प्रेरणा आहेत. डॉ. यादव महात्मा फुले यांना 'मराठी ग्रामीण साहित्याचे आद्य जनक' म्हणून स्वीकारतात. त्यांच्या दृष्टीनं सन १९०३ मध्ये लिहिलेली रामचंद्र विनायक टिकेकर ऊर्फ धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' ही पहिली ग्रामीण कादंबरी. ग्रामीण जीवनावर बेतलेल्या 'पाणकळा', 'सराई', 'आई आहे शेतात', 'पड रे पाण्या', 'कार्तिकी'सारख्या कादंबऱ्या लिहिणारे र. वा. दिघे त्यांच्या दृष्टीने मराठी मातीचे खरे कादंबरीकार. ग्रामीण कवयित्री म्हणून ते बहिणाबाई चौधरींना आद्य स्थान बहाल करतात. त्यामुळे त्यांनी स्वतःस ग्रामीण साहित्याचे आद्य जनक म्हणवून घेतलं नाही, हे स्पष्ट आहे. पण या प्रवाहास 'मध्यप्रवाह' बनवण्याचं श्रेय मात्र त्यांनाच द्यावं लागेल.


त्यांच्या कविता, कथा, कादंबरी, विनोद, वगनाट्य, ललित लेख, समीक्षा, व्यक्तिचित्रं, संपादन, भाषणं, आत्मचरित्र, वैचारिक लेख, प्रस्तावना, लेखन, बालकविता अशा विविधांगी विपुल लेखनाचा मूळ स्वर ग्रामीण आहे. डॉ. यादवांचा जन्म खेड्यातला. कुटुंब शेतकरी. घरी अक्षरशत्रुत्व. अशा स्थितीत 'मीच शोधीन माझा मार्ग' असा ध्यास घेत ते शिकले. प्रतिभा कवितेनं उमलते, तशी 'हिरवे जग' (१९६०) घेऊन ती आली. 'मळ्याची माती' (१९७८) तिनं मराठी मनाला दाखवली.

*नगं हासूस कारभारणी दुर्मिळ हाय तुझा रंग*
*केवड्याच्या पोटरीला खरंच डसंल भुजंग*

सारख्या ओळीतून त्यांच्या कवितेचा ग्रामीण बाज जसा लक्षात येतो, तशी तिच्यातील प्रागतिकता

नवं कोरं

# रेझोनान्स




लेखक
**अजय पांडे**

अनुवाद
**उज्ज्वला गोखले**

**किंमत : ३९५/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

'टू पाक टू...' मृत्यूपंथावरच्या त्या माणसाचे हे अखेरचे शब्द... एखादा सुगावा, आरोप की नुसतीच असंबद्ध बडबड? इंटेलिजन्स ब्युरोचे संयुक्त संचालक सिद्धार्थ राणा एक गूढ उकलण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करत आहेत. निव्वळ अंधारात चाचपडायला लावणारे धागेदोरे घेऊन सिद्धार्थना एक लढा लढायचा आहे. भारताविरुद्ध एक भयंकर कट रचणाऱ्या दहशतवाद्यांना प्रतिबंध घालण्याचं आव्हान त्यांच्यासमोर आहे.

हे द्विखंडीय कथानक यातल्या दहशतवादी हल्ल्यांच्या कथासूत्राने तुमच्या मनाची पकड घेईल. कथेच्या मांडणीत आढळणारा प्रगत विज्ञान-तंत्रज्ञानाचा लीलया वापर अचंबित करेल. ही श्वास रोखून धरायला लावणाऱ्या धैर्याची कथा आहे आणि तरीही नात्यांमधले सौंदर्य या कथेचा गाभा आहे.

ज्या नात्यांना राष्ट्रांच्या आणि पूर्वापार शत्रुत्वाच्या सीमांचं बंधन नाही.

*पोराचं हाय पुढला लगीन; वाईच विचारानं पेरणी वाढा*
*जुंधळ्या-तुरीच्या पिकापरास गव्हा-तांदळाचं पीक काढा*

मधून व्यक्त होते. गावच्या काळ्या आईची सारी रया व्यक्त करणाऱ्या या कवीनं आपल्या कवितांतून ग्रामीण संस्कृती, संवाद, भाषा, व्यवहार, व्यथा, वेदना, वास्तव प्रकट केलं. यादवांचे कवितेचे आणखी धुमारे 'मायलेकरं' (१९८९), 'रानमेवा' (१९९९) 'सैनिक हो तुमच्यासाठी' (२०००) मध्ये दिसतात. त्यात अंतिम दोन्हीत बालकवितांचा बाज आहे.

'खळाळ' (१९६७) ते 'उगवती मने' (२००३) या कथालेखनाच्या प्रवासात डॉ. यादव यांनी आपल्या दहा कथासंग्रहांतून ग्रामीण जनतेची सुखदुःखं व्यक्त केली. व्यक्ती नि तिच्या व्यवहारातून ग्रामीण जीवन अधोरेखित करण्याचं त्यांचं कसब डोळ्यांत भरतं. खेड्यातील पात्रं, त्यांची बोली, त्यांचा थेटपणा नागरी साहित्यास काटकोनी छेद देत आपला अस्सलपणा ठसवतो. 'डवरणी' (१९८२), 'उखडलेली झाडे' (१९८६), 'झाडवाटा' (२००१) अशा शीर्षकांतूनही तो स्पष्ट होतो. 'इंजन', 'मोट', 'गिधाडं' या कथा वाचक विसरूच शकत नाहीत. यादवांच्या आत्मपर लेखनशैलीचं सावट कादंबऱ्यांप्रमाणेच कथेतही पडलेलं दिसतं. या कथात्मकतेचं उजवेपण आज राजन गवस, कृष्णात खोत, अप्पासाहेब खोत यांच्या लेखनात दिसतं. त्यातलं देशीपण आज अधिक ठळक होत आहे, हे डॉ. यादवांच्या स्वप्नाचं वर्तमान सत्य वा वास्तव म्हणून सांगता येईल.

तीच गोष्ट कादंबऱ्यांची. 'गोतावळा' (१९७१), 'नटरंग' (१९८०), त्याच वर्षी आलेली 'एकलकोंडा', 'माउली' (१९८५), 'कलेचे कातडे' (२००१) व 'लोकसखा ज्ञानेश्वर' (२००५) या लेखनाचा आलेख ग्रामीणतेकडून कलात्मक प्रयोगाकडे असा दिसतो व तो वरचढही मानावा लागेल. रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा'शी स्पर्धा करत त्याच वेळी प्रकाशित झालेली कादंबरी 'गोतावळा' कृषी संस्कृतीवरील यंत्रानं फिरविल्या जाणाऱ्या शोषण व दमनाच्या वरवंट्यावरच आघात करते. माणूस असून जनावरागत जगण्याचं शल्य ती स्पष्ट करते. यातला 'नारबा' प्रातिनिधिक आहे. तो शेतकऱ्यांच्या आजच्या आत्महत्येची पूर्वपीठिकाच एका अर्थानं समजावतो आहे, असं आज परत वाचताना लक्षात येतं. 'नटरंग'ला लोकसंस्कृतीच्या वेदना समजावयाच्या आहेत, असं वाटतं. यातील नाच्याच्या शोकात्मक

जीवनातील कथा वास्तवातील गणपत पाटील यांचीच शोकात्म कथा वाटावी. कालक्रमानं ती १९८० ची. म्हणजे गणपत पाटील यांच्या शोककथेच्या आधीची. पण कलाकारास दूरचं अगोदर दिसतं. आगामी वास्तव, भविष्यवेध ही चाहूल हेरण्याची कला प्रतिभावंतास त्याच्या निरंतर चिंतनातून हस्तगत होत असावी. 'कलेचे कातडे' (२००१) मध्ये हे चिंतन पुढे शब्दरूप घेताना दिसतं. या कादंबऱ्यांचा विकास म्हणून चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे यांच्या लेखनाकडे पाहता येईल. राजन गवस, कृष्णात खोत यांचं लेखन ग्रामीण कादंबरीस अव्वल दर्जा देताना आढळतं.

कादंबरीच्या समांतरपणे डॉ. यादव यांनी आपल्या आत्मकथा प्रकाशित केल्या. हाही त्यांचा आणखी एक कलात्मक प्रयत्न म्हणून नोंदविता येतो.

'झोंबी' (१९८७), 'नांगरणी' (१९९०), 'घरभिंती' (१९९२), 'काचवेल' (१९९७) अशा धारावाहिक आत्मकथा लिहून यादवांनी आपणास 'सिरियल ऑटोबायोग्राफर' सिद्ध करत नागरी साहित्याचे 'सिरियल किलर' (विधायकतेने) म्हणून नोंद केली. ती परंपरा चंद्रकुमार नलगे यांनी 'रातवा' (भाग १ व २) मधून चालवली. या आत्मकथनातून डॉ. यादव ग्रामीण माणसाचा जीवनसंघर्ष अधोरेखित करतात. 'स्व' विकासाच्या पाऊलखुणांतून ते ग्रामीण समूहविकास सूचित करतात. अंतस्थ उद्देश स्पष्ट करतात.

'मातीखालची माती' (१९६५) मधील माणसं हिंदी वाचकास रामवृक्ष बेनीपुरींच्या 'माट की मूरते'चं स्मरण देतात. ही व्यक्तिचित्रं गावचं जग नि जगणं आपल्यापुढे उभं करतात. 'स्पर्शकमळे' (१९७८), 'पाणभवरे' (१९८२), 'ग्रामसंस्कृती' (२०००) मधील ललित लेखांतून डॉ. यादव नागरीकरणातून बदलत जाणाऱ्या ग्रामसंस्कृतीस स्वर देतात. जिराईत व बागायतीनं निर्माण केलेल्या शेतकरी वर्गातली भेद, त्यांचं विश्व नि प्रश्न, अल्पभूधारकांचं दुःखं ते चित्रित करतात.

नागरी साहित्यास काटकोनी छेद देण्याचा डॉ. यादवांचा प्रयत्न केवळ ललित साहित्यानं थांबत नाही. मराठी समीक्षक ग्रामीण साहित्यास त्याचं कलात्मक मूल्य, साहित्यिक योगदान नाकारताना जेव्हा यादव पाहतात, तेव्हा ते आपल्या परीनं ग्रामीण साहित्याचा धांडोळा घेत तो इतिहासबद्ध करतात, त्याची संपादनं करतात नि समीक्षाही! हे असं त्यांना का करावं

लागलं? आपणच वाजवायचं नि आपणच नाचायचं, असा डॉ. यादवांचा एकपात्री प्रयोग, नागरी समीक्षकांच्या नकारात्मक भूमिकेपुढे निर्माण केलेला सकारात्मक पर्याय म्हणून पाहावा लागेल. डॉ. यादवांच्या लेखनास अलीकडच्या काळात निवडणुकीच्या निमित्तानं 'त्यांचं लेखन आत्मपरतेच्या पलीकडे जात नाही' म्हणणं आपली नामुष्की स्वीकारण्यासारखंच नव्हे का? प्रत्येकाची एक लेखनशैली असते. लेखनध्यास असतो, ध्येय असतं. तसं प्रत्येकाचं लेखन आत्मरतच असतं. प्रश्न आहे तो त्यातून तुम्ही आत्मरंजन करून घेता की व्यापक समाजहिताच्या गोष्टी करता. डॉ. यादव हे समाजहितैषी साहित्यिक होत. त्यांच्या लेखनामागे ग्रामीण व्यथावेदनांना माणुसकीचं साहित्य म्हणून मराठी सारस्वतात मान्यता देण्याचा आग्रह होता. ते करताना डॉ. यादव नागरी साहित्य व साहित्यिकांना दूषणं न देता ग्रामीण जनता व त्यांचं जीवन, सौंदर्य नि संघर्ष कलात्मक पद्धतीनं शब्दबद्ध करत गेले, हे उदारपणे समजून घेतलं पाहिजे.

व्यक्ती म्हणून डॉ. यादव यांच्यात ऋजुता असली तरी विचारक म्हणून ते आक्रमक होते. त्यांचा युक्तिवाद त्यांच्या दृष्टिकोनावर आधारित होता. री ओढणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. 'लघुनिबंधाचे जनक कोण?' सारख्या वादात ते स्पष्ट होतं. त्यांच्या समीक्षा नि चिकित्सेस मराठी, संस्कृत साहित्याचं वाचन व अभ्यासाची संशोधक बैठक आहे. वादाकरिता वाद ही त्यांची वृत्ती नव्हती. समरसता साहित्य मंचावरील त्यांच्या वावरातून ग्रामीण माणूस शहरी होत असल्याचं वास्तव मात्र प्रत्ययास येतं खरं! कागल ते पुणे अशा विकास प्रवासाची ती अटळ परिणती म्हणावी लागेल.

'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या' (१९७९), 'ग्रामीणता, साहित्य आणि वास्तव' (१९८१), 'मराठी साहित्य समाज आणि संस्कृती' (१९८५), 'साहित्याची निर्मितिप्रक्रिया' (१९८९), 'ललित गद्याचे तात्त्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास' (१९९५), '१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह' (२००१), 'आत्मचरित्र मीमांसा' (१९९८) सारख्या समीक्षा ग्रंथांतून डॉ. यादव हे मराठीचे एक गंभीर व जबाबदार समीक्षक म्हणून पुढे येतात. 'कलेचे कातडे' सारख्या कादंबरीची प्रस्तावना, भाषणे, अन्य ग्रंथ व साहित्य प्रवाहांवरील लेख यातूनही डॉ. यादव यांचं स्वतंत्र वैचारिक व्यक्तिमत्त्व उभं राहतं.

या साहित्यिक रियाजापूर्वी आकाशवाणीत असताना डॉ. यादव यांनी ‘चालू जमाना’ कार्यक्रमासाठी केलेलं लेखन एकत्र येण्याची गरज आहे. सन १९६४ ते १९७३ असं एक दशकभर ग्रामीण प्रश्नांवर सतत लिहून स्वातंत्र्योत्तर ग्रामीण जीवनाचं, प्रश्नांचं जे चित्रण केलं आहे, ती त्यांची खेळी नागरी माध्यमांच्या पुढे उभा केलेला आणखी एक काटकोनी प्रवास होय. त्यातील नवशिक्षित ग्रामीण तरुणांना त्यांनी दिलेली उमेद, हे त्यांचं सामाजिक देणं म्हणून इतिहासात नोंदवावं लागेल. यातील ‘संवाद’ व ‘नाटिका’ हा मराठी साहित्याचा ठेवा ठरावा, असा खजिना आहे. तो संकलित करून प्रकाशित झाला पाहिजे.

डॉ. यादव यांनी खेड्यापाड्यांत जाऊन अनेक ग्रामीण साहित्य संमेलनांची अध्यक्षपदं भूषविली आहेत. तेथील भाषणांचा संग्रह एकत्रित आल्यास डॉ. शरणकुमार लिंबाळेंच्या ‘शतकातील दलित विचार’ सारखा ऐतिहासिक दस्तऐवज तयार होईल. त्यांच्या या उपस्थिती व संवादातून नागरी साहित्य संमेलनांना एक रचनात्मक व समर्थ पर्याय निर्माण झाला आहे. सीमा भागात होणाऱ्या साहित्य संमेलनांचं अध्यक्षपद भूषविताना मी हे अनुभवलं आहे. त्याशिवाय संशोधनाच्या मार्गानं डॉ. यादव यांच्या साहित्याचं झालेलं मूल्यमापन, त्यांच्यावर प्रकाशित झालेले डॉ. रवींद्र ठाकूर व डॉ. एस. एम. कानजे यांचे समीक्षाग्रंथ, डॉ. यादवांच्या पाठोपाठ झालेलं अन्यांचं विपुल ग्रामीण साहित्यलेखन हा त्यांनी नागरी साहित्यास दिलेला उजवा पर्याय (उजवा कालवा, डावा कालवा साहित्यातही असतोच) होय.

डॉ. यादव यांच्या साहित्यकृती व कर्तृत्वास लाभलेले पुरस्कार, सन्मानपत्रे, अध्यक्षपद याकडेही मराठी सारस्वतातील त्यांच्या योगदान व कर्तृत्वाची पावती म्हणून पाहता येईल. त्यांच्या साहित्याचे हिंदी, इंग्रजी, कन्नड, उर्दू, बंगाली, फ्रेंच भाषांतील अनुवादही या काटकोनी दाव्यास पुरावा म्हणून देता येतात. मराठी साहित्याचा इतिहास लिहायचा झाला तर डॉ. आनंद यादव यांना वगळता येणार नाही. डॉ. लाभसेटवार साहित्य सन्मानानं त्यांना मराठीचं ज्ञानपीठ लाभलं आहेच. आता प्रतीक्षा भारतीय ज्ञानपीठाची!

**– डॉ. सुनीलकुमार लवटे**

**९८८१२५००९३**

◆

## पुस्तक परिचय


# बीइंग मॉर्टल



डॉ. अतुल गवांदे हे तीन लोकप्रिय पुस्तकांचे लेखक आहेत. ‘कॉम्प्लिकेशन्स’, जे पुस्तक नॅशनल बुक ॲवार्डच्या अंतिम फेरीसाठी निवडलं गेलं होतं; ‘बेटर’, ज्याची निवड ॲमेझॉन डॉट कॉमनं दहा सर्वोत्तम पुस्तकांमध्ये केली होती आणि ‘द चेकलिस्ट मॅनिफेस्टो’ हे त्यांचं तिसरं पुस्तक. बोस्टनमधल्या ‘ब्रिहॅम ॲन्ड विमेन्स हॉस्पिटल’चे ते शल्यतज्ज्ञ आहेत, ‘द न्यू यॉर्कर’चे ते लेखक आहेत आणि ‘हॉर्वर्ड मेडिकल स्कूल’ आणि ‘हॉर्वर्ड स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ’चे ते प्राध्यापक आहेत. विज्ञानावर लिहिलेल्या लेखांमुळे त्यांना ‘लेविस थॉमस प्राइझ’ मिळाले आहे. मॅकऑर्थर फेलोशिप आणि दोन नॅशनल मॅगझिन ॲवार्ड मिळाले आहेत.

सामाजिक आरोग्याविषयी त्यांचा सहभाग : ते ‘अरियाडने लॅब्स’चे संचालक आहेत, जे आरोग्यप्रणालीच्या पुनर्निर्माणासाठीचं संयुक्त केंद्र आहे आणि ‘लाइफबॉक्स’ या ‘ना नफा, ना तोटा’ तत्त्वावर चालणाऱ्या शस्त्रक्रिया जगभर सुरक्षितपणे व्हाव्यात म्हणून कार्य करणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष आहेत.

ते आणि त्यांची पत्नी कॅथलीन आपल्या तीन मुलांसोबत न्यूटन, मॅसॅच्युएट्स इथे राहतात.




लेखक
**डॉ. अतुल गवांदे**

अनुवाद
**डॉ. वसु भारद्वाज**

*आपण आता औषधोपचाराने ग्रासलेल्या वार्धक्याकडे आणि मृत्यूकडे जात आहोत; त्यावर आपण अशा पद्धतीने उपचार करतो, जणूकाही तो काही आजार आहे. एक गोष्ट खरी आहे की, या सरत्या वर्षांसाठी केवळ औषधोपचारच गरजेचे नाहीत, तर या स्थितीतही आयुष्य अर्थपूर्ण, शक्य तेवढे संपन्न आणि परिपूर्ण असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. हे पुस्तक त्या दिशेच्या प्रवासाचे केवळ सखोल चिंतन नसून, एक आवश्यक आणि सूक्ष्म दृष्टीने केलेले अवलोकन आहे. ते आयुष्याच्या अंतिम काळात, स्वतःच्या मर्जीने, प्रतिष्ठेने आणि आनंदाने कसे जगावे, याचे मार्गदर्शन करते.*

*गेल्या काही दशकांमध्ये वैद्यकीय क्षेत्रात स्वस्थता शुश्रूषेचा प्रांत नव्याने आलाय, तो मृत्यूच्या मार्गावर असणाऱ्या रुग्णांच्या शुश्रूषेमध्ये या पद्धतीचा विचार आणण्यासाठीच आहे आणि*

*ही पद्धत वाढत आहे. हीच पद्धत गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठीही वापरली जाते, मग तो मृत्युमार्गावर असो किंवा नसो.*

# एक चांगलं आयुष्य

१९९१ मध्ये न्यू यॉर्क राज्याचा भाग असलेल्या न्यू बर्लिनमधल्या एका छोट्या शहरामध्ये एक तरुण डॉक्टर बिल थॉमस यानं एक प्रयोग केला. तो काय करत आहे, हे खरं तर त्यालाही माहीत नव्हतं. तो एकतीस वर्षांचा होता, फॅमिली मेडिसीनचा आंतरसेवाकाल संपवून दोन वर्षांपेक्षा कमी काळ झाला होता आणि चेस मेमोरियल नर्सिंग होमचा वैद्यकीय संचालक म्हणून नुकताच रुजू झाला होता, जिथं ऐंशी अशा वयस्कर लोकांची मुक्कामाची व्यवस्था होती, जे गंभीरपणे विकलांग आहेत त्यांपैकी जवळपास अर्धे शारीरिक विकलांग होते; पाचपैकी चारजणांना अल्झायमरचा विकार होता किंवा इतर कुठल्यातरी प्रकारचे बोधात्मक विकार होते.

तत्पूर्वी थॉमसनं जवळच्याच एका रुग्णालयामध्ये अत्यवस्थ रुग्णांवर उपचार करणारा डॉक्टर म्हणून काम केलं होतं, जे एका शुश्रूषागृहाच्या अगदी विरुद्ध होतं. लोक अतिदक्षता विभागामध्ये आले ते अगदी नेमक्या, दुरुस्त होण्याजोग्या प्रश्नांसह... म्हणजे एक पाय मोडलेला किंवा क्रॅनबेरीसारखं नाक वगैरे. एखाद्या रुग्णाला जर मोठाच त्रास असेल... उदाहरणार्थ, पाय जर अवमनस्कतेमुळे म्हणजे बुद्धिनाशामुळे मोडला असेल तर... त्याचं काम होतं त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणं किंवा त्या रुग्णाला दुसरीकडे कुठेतरी योग्य अशा ठिकाणी जिथं त्याच्यावर उपचार होतील, तिथं पाठवणं; म्हणजे शुश्रूषागृहामध्ये पाठवणं. त्यानं या ठिकाणी वैद्यकीय संचालक म्हणून काम स्वीकारलं ते काहीतरी वेगळं करण्याची एक संधी मिळतेय म्हणून..!

चेसमधल्या कर्मचारीवर्गाला त्या ठिकाणी फारसं काही वेगळं असं वाटलं नाही; पण थॉमसच्या नव्या दृष्टीनं प्रत्येक खोलीमध्ये एक प्रकारचं नैराश्य पाहिलं. त्या शुश्रूषागृहानं त्याला निराश केलं. त्याला ते सगळं ठिकाणावर आणायचं होतं. सर्वप्रथम, एक डॉक्टर म्हणून त्याला जो चांगला

मार्ग माहीत होता, त्या मार्गानं त्यानं हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला. तिथं राहणाऱ्या रुग्णांना असं उत्साह आणि ऊर्जेशिवाय पाहून त्याला असा संशय आला की, ही काहीतरी ओळखू न आलेली अवस्था आहे किंवा काही औषधांचं चुकीचं संमिश्रण त्यांच्यावर असा परिणाम घडवत असावं. म्हणून त्यानं तिथं राहणाऱ्या सर्व रुग्णांची शारीरिक तपासणी करण्याचं काम सुरू केलं, त्यांचं स्कॅनिंग करण्याची आज्ञा केली आणि इतर तपासण्या व औषधांमध्ये बदल सुरू केले; पण अनेक आठवड्यांच्या तपासण्यांनंतर आणि बदलांनंतरही तो थोडाही बदल घडवून आणू शकला नाही. हं, वैद्यकीय तपासण्यांची बिलं मात्र वाढली होती आणि काम करणाऱ्या सगळ्या कर्मचाऱ्यांना वैताग आला होता. तिथला संचालक त्याविषयी त्याच्याशी बोलला आणि सगळं बंद करण्याविषयी सांगितलं.

''मला उपचारांविषयी जरा साशंकताच होती.'' त्यानं मला सांगितलं.

तरीही त्यानं हट्ट सोडला नाही. तो विचार करता करता त्या शुश्रूषागृहाच्या एका राहून गेलेल्या गोष्टीपर्यंत आला, ती म्हणजे वयस्कर लोकाचं आयुष्य आणि मग त्यानं त्यांच्या आयुष्यात नवं काहीतरी घालण्याचं ठरवूनच टाकलं. तो जी युक्ती सोबत घेऊन आला होता, ती थोडीशी वेडसरपणाची आणि भोळसट वाटत होती; तरी ती बुद्धिमत्तेचीही होती; त्यामुळे तिथं राहणारे सगळे आणि शुश्रूषागृहाचे कर्मचारी त्या युक्तीप्रमाणे वागतात, ही गोष्ट त्याच्यासाठी चमत्कारच होती.

पण ही युक्ती जाणण्यासाठी... अगदी ती कुठून आली आणि त्यानं ती कशी प्रयोगात आणली... हे जाणण्यासाठी तुम्हाला बिल थॉमसविषयी काही गोष्टी जाणून घेणं गरजेचं आहे. पहिली महत्त्वाची गोष्ट ही की, इतर छोट्या मुलांप्रमाणे थॉमसनं त्याच्या शाळेतील प्रत्येक विक्रीची स्पर्धा जिंकली होती. शाळेनं कधी मुलांना स्काउटसाठी किंवा खेळाच्या चमूसाठी घरोघरी मेणबत्त्या विकायला पाठवलं होतं किंवा मासिकं किंवा चॉकलेट विकायला पाठवलं होतं आणि तो प्रत्येक वेळी जास्तीतजास्त विक्री करून, यशस्वी होऊनच घरी परतला होता. प्रशालेत शिकताना तर तो विद्यार्थी मंडळाचा अध्यक्ष म्हणून निवडूनही गेला होता. संघ तयार करण्यासाठी त्याला कप्तान म्हणूनही निवडण्यात आलं होतं. जेव्हा त्याला वाटे, तो लोकांना अगदी

काहीही कशावरही विकू शके.

त्यासोबतच तो एक भयंकर विद्यार्थीही होता. त्याला अतिशय निकृष्ट अशी श्रेणी मिळायची आणि त्याच्या शिक्षकांनी त्याला जे गृहपाठ पूर्ण करायला सांगितले असतील, त्यात त्याचं सातत्यानं असणारं अपयश त्याला सतत शिक्षकांकडे जायला लावायचं. तो तसा प्रचंड मोठा वाचक होता आणि स्वत:चं सगळं करणारा होता, एक असा मुलगा जो स्वत:ला त्रिमिती शिकवू शकला होता, जेणेकरून तो एक नौका बांधू शकेल जे त्यानं केलंही. तो फक्त त्याच्या शिक्षकानं दिलेल्या कामाची काळजी करत नव्हता आणि ते सांगायलाही अजिबात कचरत नव्हता. आज आपण त्याचं निदान हे 'अपोझिशनल डेफियंट डिसऑर्डर' असं करू शकतो. १९७० मध्ये, त्याचे शिक्षक असाच विचार करत होते की, हा मुलगा म्हणजे 'वैताग' आहे.

ते दोन चेहरे... एक विक्रेता आणि दुसरा उद्दामपणाचा... दोन्हीही एकाच जागी उगम पावत होते, असं मात्र दिसत होतं.


मी थॉमसला विचारलं, ''एक लहान मूल म्हणून तुझं त्या वेळी विक्री करण्याचं कौशल्य काय होतं?'' तो म्हणाला, ''तसं काहीही नव्हतं. फक्त सांगायचं एवढंच होतं, 'मला कुणीतरी नकार द्यावा' अशी इच्छा तेव्हा होत असे. हीच गोष्ट तुम्हाला एक चांगला विक्रेता बनण्यास तयार करते. तुम्हाला कोणीतरी नाकारतंय, अशी एक भावना सतत तुमच्या मनात असायला हवी.'' हाच एक गुणधर्म होता, जो त्याला ती गोष्ट निष्ठेनं तोपर्यंत करू देत होता, जोपर्यंत त्याला जे हवं ते मिळत नाही आणि त्याला जे हवं ते टळत नाही.

तरीही बराच काळपर्यंत त्याला नेमकं काय हवं आहे, हे त्यालाच कळत नव्हतं. न्यू बर्लिननंतर तो दुसऱ्या एका प्रांतामध्ये मोठा झाला. ती जागा म्हणजे निकोलस शहराच्या बाजूला असणारा डोंगराळ प्रदेश होता. त्याचे वडील एका कारखान्यामध्ये काम करणारे कामगार होते आणि त्याची आई होती टेलिफोन ऑपरेटर. कुणीही महाविद्यालयात न गेल्यामुळे म्हणा, बिल थॉमसकडून कुणीही तो महाविद्यालयामध्ये जावा, अशी अपेक्षाही करत नव्हतं. शालेय जीवन संपत असताना तो एका सामूहिक प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी होणार होता. पण मित्राच्या एका मोठ्या भावाशी त्याचा

**नवं कोरं**

# रिक्त

## मोहना प्रभुदेसाई जोगळेकर




**किंमत : २५०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

'रिक्त' कथासंग्रहातील कथाविषय, पात्र, घटना, काळ यांचे निराळे संदर्भ घेऊन येतात आणि त्यामुळेच दीर्घकाळ मनात रेंगाळत राहतात. पात्रांचा कथेतील घटनांबद्दल स्वत:चा दृष्टिकोन हेही कथांचं वैशिष्ट्यं. वाटेत घडलेल्या घटनेने बदललेलं आयुष्य, आईच्या निधनानंतर परदेशातून आलेली ती, स्वत:ची ओळख पटलेल्या दोन मुलींमुळे त्यांच्या घरात उठलेलं वादळ, मुलीवर आपल्या हातून अन्याय झाला हे अखेर तिच्यासमोर कबूल करणारे वडील, शाळकरी मुलाला त्याच्या पालकांनीच शाळेत प्रवेश घ्यावा असं वाटायला लागणारं वास्तव, जातीभेद करायचा नाही या निश्चयाने वेगळं पाऊल उचललेली तरुणी, आई वडिलांच्या घटस्फोटाचं सावट मनावर असताना लग्न केलेली युवती, समाजसेवेच्या अनुभवातून झालेली द्विधा मन:स्थिती, अनाथ मुलासाठी एका तरुणीने उचललेलं अनोखं पाऊल, घरातील 'फुकट' गेलेला मुलगा, अशा असंख्य विषयांमधून व्यक्तिरेखांचं बारीक निरीक्षण कथेतील पात्रापात्रातून डोकावत राहतं. सारीच पात्रं त्या-त्या काळात वाचकाला अलगद नेऊन सोडतात, कथेतील काळाशी, वातावरणाशी वाचक नकळत एकरूप होऊन जातो. 'रिक्त' कथासंग्रहातील प्रत्येक कथा पुढे काय ही उत्कंठा वाढविणारी आणि पुढील कथेबद्दल उत्सुकता ताणणारी आहे.

संवाद झाल्यानं... जो महाविद्यालयात शिक्षण घेत होता आणि सुटीत आला होता... आणि त्यानं याला बियर, मुली आणि त्यांच्यासोबतचा वेळ मजेत कसा जातो, याविषयी सांगितल्यामुळे त्यानं महाविद्यालयात पुन्हा जाण्याचा विचार केला.

त्यानं राज्यातल्या जवळच्याच सनी कोर्टलॅन्ड या महाविद्यालयात नाव घातलं. तिथं कुठल्यातरी गोष्टीनं त्याला चेतवून दिलं. कदाचित ते त्याच्या शाळेतले शिक्षक असावेत, ज्यांनी अशी भविष्यवाणी केली होती की, तो शिक्षण अर्धवट सोडून पुन्हा परतेल आणि ख्रिसमसपूर्वी तो शहरामध्ये पेट्रोल पंपावर कामाला असेल. आता जे काय असेल ते, पण तो कुणाच्याही अपेक्षेपेक्षा जास्तच यशस्वी झाला. सगळ्या पाठ्यपुस्तकांचा चोथा चावून, जवळपास ४.० एवढी सरासरी ग्रेड मिळवून तो पुन्हा एकवार विद्यार्थी समितीचा अध्यक्ष म्हणून निवडला गेला. त्याचा असा विचार चालू होता की, तो एक चांगला क्रीडा शिक्षक बनू शकतो; पण जीवशास्त्राचा तास सुरू झाल्यानंतर त्याला असं वाटलं की, वैद्यकीय क्षेत्र हेच त्याच्यासाठीचं खरं क्षेत्र आहे. मग काय, त्यानं तिथलं शिक्षण संपवलं, तेव्हा हॉर्वर्ड मेडिकल स्कूलमध्ये प्रवेश मिळवणारा तो पहिला विद्यार्थी ठरला.

तो हॉर्वर्डच्या प्रेमात पडला. कदाचित तो तिथं आपल्याला वाईट वागणूक मिळत आहे, म्हणून कुरकुरत तिथं गेलाही नसता... एका कामगाराच्या घरातला मुलगा ज्याच्याजवळ त्या श्रीमंतीवर प्रेम करणाऱ्यांच्या मुलांसारखं काहीही नाही, म्हणजे त्यांचं इव्ही लीगचं दर्जेदार शिक्षण आणि विश्वस्त निधीचा पैसा... असं काहीही नाही; पण तसं त्यानं काहीही केलं नाही. त्याला ते ठिकाण म्हणजे आपल्या सुप्त गोष्टींचं प्रकटन करण्याचं ठिकाण वाटलं. त्याला इतर लोकांसोबत असणं आवडलं; जी माणसं विज्ञान, वैद्यकीय विज्ञान आणि इतरही गोष्टींकडे अगदी आकर्षिली गेलेली होती आणि त्यासाठी वेडी होती.

''वैद्यकीय महाविद्यालयात असताना माझा सगळ्यात आवडता कार्यक्रम कोणता असेल, तर तो हा की, तिथं आमचं जे मित्रमंडळ होतं, ते सगळं बेथ इस्रायल हॉस्पिटलच्या कॅफेटेरियात जेवणासाठी प्रत्येक रात्री जमायचं आणि मग जवळपास अडीच तास वेगवेगळ्या रुग्णांबद्दल नुसती

जोरजोरात चर्चा चालायची... आवेशपूर्ण आणि खरोखरच मस्त.'' त्यानं मला सांगितलं.

त्याला अशा ठिकाणीही उपस्थित राहायला आवडायचं, जिथं लोकांचा या गोष्टीवर विश्वास असायचा की, तो काही महत्त्वपूर्ण गोष्टी समजून घेण्यास अतिशय सक्षम आहे. नोबेल पुरस्कार विजेते शिक्षक त्यांच्या वर्गावर शिकवायला यायचे, अगदी शनिवारी सकाळीही यायचे; कारण त्यांना त्याच्याकडून आणि इतरांकडूनही मोठं व्हावं म्हणून अपेक्षा असायची.

तथापि, त्याला कधीही कुणाची मान्यता मिळवावी, असं वाटलं नाही. त्याच्या विभागानं त्याची नेमणूक मोठ्या नामवंत रुग्णालयामध्ये विशेष प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये किंवा त्यांच्या संशोधन प्रयोगशाळेत करावी म्हणून प्रयत्न केला. त्याऐवजी, त्यानं न्यू जर्सीत रॉचेस्टरला फॅमिली मेडिसीनमध्ये आंतरसेवाकाल पूर्ण करण्याची निवड केली. एक श्रेष्ठत्व मिळवण्यासाठी असं काही करण्याची ती हॉर्वर्डची कल्पना तर खचितच नव्हती. न्यू यॉर्कजवळच्या त्या गावाकडे परतल्यानंतर त्याच्यासमोर त्याचं ध्येय होतं. ''मी एक ग्रामीण माणूस आहे..'' त्यानं मला सांगितलं. अर्थात, हॉर्वर्डमधील चार वर्षं म्हणजे सरळसरळ न्यू यॉर्कबाहेर त्यानं घालवलेली चार वर्षं होती. त्यानं सुट्यांमध्ये बोस्टन ते निकोलस आणि पुन्हा परतणं असा सायकलवरचा जवळपास ३३० मैलांचा प्रवास चारी बाजूंनी केला. त्याला स्वयंपूर्णता आवडायची... रस्त्याच्या आजूबाजूला कुठेही किंवा शेतामध्ये तंबू ठोकायचा आणि त्याला जे शक्य होईल, ते अन्न मिळवून खायचं. त्याला 'फॅमिली मेडिसीन' हा विषयही असाच आवडला होता. तो स्वतंत्र जगू शकत होता, एकला चालो रे.

आंतरसेवाकाल करता करता जेव्हा त्यानं काही पैसे साठवले, त्यातून बर्लिनच्या जवळ एक जमीन खरेदी केली, जिथून तो त्याच्या बाईकवरून कायमच जायचा आणि विचार करायचा की, एक ना एक दिवस ही जागा आपल्याला मिळेल. दरम्यान, त्याचं प्रशिक्षण संपलं. त्या शेतामध्ये काम करणं, हे त्याचं आवडतं काम बनलं. त्यानं गावात वैद्यकीय व्यवसायही सुरू केला; पण त्यानं लगेच इमर्जन्सी मेडिसीनवर म्हणजे तातडीच्या उपचारावर लक्ष केंद्रित केलं कारण त्यामुळे एक ठरावीक वेळच लागायचा, फिरत राहता

यायचं. उरलेला सारा वेळ त्याला शेतावर घालवायला मिळायचा. तो स्वत:चं घर स्वत:च बनवण्याच्या विचारात गुंतला... सारं काही स्वत:च बनवलेलं. त्यानं त्याच्या मित्रांच्या सहकार्यानं घर बनवलं. त्यानं स्वत:पुरतं अन्नही शेतातूनच मिळवलं. विजेसाठी त्यानं वारा आणि सौरऊर्जेचा उपयोग करून घेतला. तो अगदी पूर्णपणे त्या गोठ्याबाहेरच राहायचा. ते सगळं वातावरण आणि सारे ऋतू अंगावर झेलत राहायचा. सरतेशेवटी तो आणि ज्यूड, त्याची पत्नी जी एक परिचारिका होती, या दोघांनी मिळून ते शेत जवळपास चारशे एकरांपेक्षा जास्त वाढवलं. त्यांच्याकडे गुरं होती, घोडे होते, कोंबड्यांची पिलं होती, एक साठवणीचं तळघर, एक लाकूड कापण्याचा कारखाना आणि एक साखरेचा साठा... अर्थात पाच मुलांना न सांगण्यासाठीचा!

''मला खरोखरच असं वाटत होतं की, मी जे काय आयुष्य जगत होतो, ते खरोखरच मला जे प्रामाणिकपणे जगावंसं वाटत होतं, तसंच आयुष्य होतं....' थॉमसनं सांगितलं.

तो अशा स्थितीत होता की, तो डॉक्टरपेक्षा शेतकरी जास्त वाटत होता. त्याची पॉल बुनयानसारखी दाढी होती आणि ती त्याच्या पांढऱ्या कोटावर टाय बांधण्यापेक्षा अगदी योग्य दिसायची; पण अतिदक्षता विभागातील काम सारं काही खराब करत होतं. ''खरं तर असं रात्रभर कामं करून करून मी आजारी पडलो होतो.'' तो म्हणाला. म्हणून मग त्यानं शुश्रूषागृहामध्ये काम पत्करलं. ते दिवसाचं काम होतं. किती तास हेही आधीच ठरलेलं होतं. ते कितीसं अवघड होतं?

नोकरीच्या अगदी पहिल्या दिवसापासूनच थॉमसला त्यानं त्याच्या शेतावर अनुभवलेलं अगदी गुळगुळीत, संपन्नतेचा साठा असलेलं आयुष्य आणि रोजच कामावरचं त्याला दिसून येत असलेलं अगदीच साचेबंद, एखाद्या संस्थेनं आखून दिलेलं, अजिबात जिवंतपणा न जाणवणारं आयुष्य यामध्ये प्रचंड मोठा विरोधाभास जाणवला. त्यानं जे काही पाहिलं; त्यामुळे एक प्रकारची अपराधीपणाची भावना त्याच्या मनाला कुरतडत असे. तिथल्या परिचारिकांनी त्याला त्याचा फायदा करून घेऊ शकता असंही सांगितलं; पण तो ते कधी करू शकला नाही आणि त्यानं जे काही पाहिलं, त्याप्रमाणे तो

जाऊ इच्छित नव्हता. चेस मेमोरियल नर्सिंग होममधली अवस्था ही स्वयंपूर्णतेमध्ये जगण्याच्या त्याच्या कल्पनेच्या अगदी विरुद्ध कशी होती, हे त्याला नक्की कळण्यापूर्वी काही वर्षं निश्चितच जायला हवी होती.

थॉमसला या गोष्टीची खात्री होती की, चांगलं आयुष्य हे जास्तीतजास्त स्वतंत्रतेपासून मिळू शकतं; पण ती अशी गोष्ट होती, जी लोक घरामध्ये नाकारत होते. त्याला त्या शुश्रूषागृहामध्ये राहणाऱ्या लोकांची मतं जाणून घ्यायची होती. त्यांपैकी काही शिक्षक होते, काहीजणी फक्त घर सांभाळायच्या आणि काही मिल कामगार होते, तो ज्यांच्यामध्ये वाढला होता तसे ते होते. त्यांच्यासाठी नक्कीच काहीतरी चांगलं करता येईल, याची त्याला खात्री होती. म्हणून अगदीच अंत:प्रेरणेवर अवलंबून राहण्यापेक्षा थोड्याशा गोष्टींवर का होईना काम करणं चांगलं, या विचारानं त्यानं त्या शुश्रूषागृहामध्ये थोडंसं चैतन्य आणण्याचा प्रयत्न केला, तेही अगदी त्याच मार्गानं, ज्या मार्गानं त्यानं त्याच्या घरात चैतन्य आणलं होतं... खरोखरचं चैतन्य त्यामध्ये ठेवूनच हे केलं. जर तो वनस्पती, प्राणी आणि लहान मुलं यांना तिथं राहणाऱ्यांच्या आयुष्यामध्ये आणू शकला तर... म्हणजे शुश्रूषागृहच त्यानं भरून टाकलं तर... काय होईल?

तो चेसच्या व्यवस्थापनाकडे गेला. त्यानं त्यांच्यासमोर या गोष्टीचा प्रस्ताव ठेवला की, न्यू यॉर्क राज्याकडे हे सारं पुनर्निर्माण करण्यासाठी संस्थेनं थोड्याफार मदतीसाठी अर्ज करावा. रॉजर हल्बर्ट तिथला प्रशासक होता आणि त्यानंच थॉमसला तिथं आणलं होतं, त्याला ही कल्पना आवडली होती. काहीतरी नवं करण्यासाठी तोही उत्साही होता. चेसच्या वीस वर्षांच्या कारकिर्दीमध्ये त्यानं या गोष्टींची खात्री पटवून दिली होती की, सुविधेलाच फार मोठी प्रतिष्ठा होती आणि तिथं राहणाऱ्या लोकांना सुविधा मिळण्यासाठी वेगवेगळ्या योजना आखल्या होत्या. थॉमसची ही नवी कल्पना आधीच्या विकासाच्या कल्पनेशी जुळत होती. मग काय, नेतृत्व करणारा हा चमू पुनर्निर्माण आणि सुधारणेसाठी काही आर्थिक मदत मिळावी म्हणून अर्ज लिहायला बसला. तथापि, थॉमसच्या मनामध्ये जे विचार घोळत होते, ते हल्बर्टनं आखलेल्या विचारांपेक्षा कितीतरी भरीव होते.

थॉमस त्यानं ठेवलेल्या प्रस्तावावर विचार करू लागला. तो म्हणाला

की,''माझं उद्दिष्ट शुश्रूषागृहाला झालेल्या तीन प्रकारच्या 'प्लेग'वर हल्ला करणं, हे होतं : कंटाळवाणी स्थिती, एकटेपणा आणि असहायता. हे तीन प्रकारचे प्लेग दुरुस्त करण्यासाठी आयुष्यामध्ये काहीतरी आणणं गरजेचं होतं.'' वयस्क लोक प्रत्येक खोलीमध्ये काही वनस्पती ठेवू शकत होते. ते समोरचं गवत काढून टाकू शकत होते आणि तिथं भाजीपाला आणि फुलांचा बगिचा करू शकत होते आणि ते प्राण्यांनाही आणू शकत होते.

इथपर्यंत सारं काही व्यवस्थित दिसत होतं; पण एखादा प्राणी ठेवणं, ही बाब जराशी अवघड होती, कारण आरोग्य आणि सुरक्षिततेचा प्रश्न येतो; पण न्यू यॉर्कमध्ये शुश्रूषागृहासाठी जे कायदे संमत होते, त्यानुसार एखादा कुत्रा किंवा मांजर याला परवानगी होती. हल्बर्टनं थॉमसला सांगितलं, ''पूर्वी दोन ते तीन वेळा कुत्रा पाळण्याचा अयशस्वी प्रयत्न केलेला आहे. ते प्राणी जरा विचित्रच वागायचे आणि योग्य ती शुश्रूषा पुरवण्यामागे अडथळा निर्माण होत होता; पण तरीही पुन्हा एकवार प्रयत्न करण्याची इच्छा आहे.''

मग थॉमस म्हणाला, ''आपण दोन कुत्रे ठेवून बघू या.''

हल्बर्ट म्हणाला, ''पण कायदा त्याला संमती देत नाही.''

थॉमस म्हणाला, ''तसं फक्त कागदोपत्री कर ना....''

काही क्षणभर तिथं शांतता पसरली. अगदी हे लहानसं पाऊलही जी नीतिमूल्यं हृदयामध्ये बाळगली होती, त्याच्या विरुद्ध झालं होतं; म्हणजे फक्त शुश्रूषागृहाच्या कायद्याविरुद्धच नाही तर शुश्रूषागृहांचा जो ठाम विश्वास होता की, ते फक्त वृद्धांचं आरोग्य आणि सुरक्षा यासाठीच आहेत, त्याच्याही विरुद्ध झालं होतं. आता स्वत:ला या कल्पनेभोवती ठेवणं हल्बर्टलाही जड जात होतं. काही दिवसांपूर्वी जे मी त्याच्याशी बोललो, त्याच्या डोळ्यांसमोर अद्यापही ते भयंकर दृश्यच येत होतं.

शुश्रूषा विभागाची संचालिका लोइस ग्रैसिंग, सामाजिक उपक्रमाचे नेते आणि समाजसेवक ही मंडळी समोरच होती आणि ते तिघेही एकमेकांकडे पाहत तिथं बसलेले मला दिसत होते, त्यांचे डोळे अक्षरश: गरागरा फिरत होते; ते म्हणत होते, 'हे जरा वेगळंच चाललंय... अं!'

मी म्हणालो, ''ठीक आहे. मी कागदोपत्री तसं ठेवतो.'' मी विचार करायला सुरुवात केली होती, ''तुम्ही जेवढा यावर विचार करत आहात,

**नवं कोरं**

TBC-27 Book No. 5

TBC सभासदांना निम्म्या किमतीत

# द ब्रोकर

लेखक
**जॉन ग्रिशॅम**

अनुवाद
**अशोक पाध्ये**




**किंमत : ४८०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

राजधानीतील सत्ताधाऱ्यांमध्ये ऊठबस करणारा, सत्ताकारणात कोणाला खाली खेचायचे, कोणाला वर चढवायचे या खेळात भाग घेणारा बॅकमन, हा अनेकांची सरकारदरबारी असलेली कामे पैसे घेऊन करून द्यायचा. त्यामुळे त्याला ‘दलाल’ असे संबोधले जाई. शेवटी त्याला तुरुंगवास पत्करावा लागला. सहा वर्षांनी त्याला माफी मिळाल्याने तो सुटून बाहेर आला. बॅकमनजवळ काही उपग्रहांवर नियंत्रण ठेवणारे सॉफ्टवेअर होते. बॅकमन सुटल्यावर त्याला अमेरिकेच्या केंद्रीय गुप्तचर संघटनेने- सी.आय.ए.ने देशाबाहेर नेऊन ठेवले. त्याला नवीन नाव, नवीन ओळख व एक नवीन घर दिले. तो आपल्या नवीन आयुष्यात स्थिर झाल्यावर त्याचा नवीन पत्ता अन्य देशांच्या गुप्तचर संस्थांना दिला. मग इस्रायली, चिनी व सौदी अरेबियाचे गुप्तचर त्याला मारण्यासाठी पुढे सरसावले. कोण पुढे येऊन मारतो आहे, हे सी.आय.ए.ला ठाऊक करून घ्यायचे होते. बॅकमनचा बळी गेला तरी त्यांना पर्वा नव्हती. त्यांना हवे होते ते फक्त उत्तर. अन् मग सर्व प्रकरणाला भलतीच कलाटणी मिळाली.’

‘पुढे काय झाले’ ही उत्सुकता ग्रिशॅम कायम ठेवतो. जगभरात प्रचंड खप असलेली कादंबरी. आत्तापर्यंत अर्धा अब्ज प्रती जगात खपल्या !

तेवढा मी करतच नाही; पण मी दोन कुत्र्यांचं तेवढं लिहितोच.''

थॉमस म्हणाला, ''आता मांजरींचं काय?''

मी म्हणालो, ''मांजरींचं काय?'' मग म्हणालो, ''मी दोन कुत्र्यांविषयी तेवढी कागदावर नोंद केली आहे.''

तो म्हणाला, ''पण काही माणसं ही कुत्र्यांवर प्रेम करणारी नसतात. त्यांना मांजरी आवडतात.''

मी म्हणालो, ''म्हणजे तुम्हाला कुत्रे आणि मांजरीही हव्यात?''

तो म्हणाला, ''तेवढं फक्त चर्चा करण्यासाठी मुद्दे हवेत म्हणून लिहा.''

मी म्हणालो, ''ठीक आहे; मी एक मांजर हवी, असंही लिहितो.''

''नाही, नाही, नाही. आपलं बांधकाम दोन मजली आहे. दोन्ही मजल्यांवर दोन दोन मांजरी कशा वाटतील?''

मी म्हणालो, ''आपण आरोग्य विभागाकडे दोन कुत्रे आणि चार मांजरींचा प्रस्ताव देणार आहोत?''

तो म्हणाला, ''होय, तेवढं लिहूनच टाका.''

मी म्हणालो, ''ठीक आहे, मी लिहितो. मला वाटतं, इथं आपण मुद्दा सोडत आहोत. असं करणं म्हणजे त्यांच्यासोबत उडता येणं, असं तर नाही. ''

तो म्हणाला, ''अजून एक गोष्ट. पक्ष्यांबद्दल काय?''

मी म्हणालो, ''कायदा स्वच्छपणे असं सांगतो की, शुश्रूषागृहामध्ये कुठल्याही पक्ष्यांना अनुमती नाही.''

तो म्हणाला, ''पण मग पक्ष्यांबद्दल काय?''

मी विचारलं, ''आता काय पक्ष्यांबद्दल?''

तो म्हणाला, ''जरा डोळ्यांसमोर चित्र आणा... इथून तुमच्या खिडकीतून जरा बाहेर बघा. असं चित्र मनात आणा की, तुम्ही जानेवारी किंवा फेब्रुवारीमध्ये आहात. बाहेर जवळपास तीन फूट बर्फ आहे. या शुश्रूषागृहामध्ये तुम्हाला कशाचे आवाज ऐकू येतील?''

मी म्हणालो, ''अं, तुम्हाला इथं राहणाऱ्या काहींचे स्फुंदण्याचे आवाज ऐकू येतील. शक्यता आहे काहीजणांचं हास्य. तुम्हाला विविध भागांमध्ये बहुधा दूरचित्रवाणीचा आवाजही ऐकू येईल, कदाचित आपल्याला ऐकायला

आवडेल त्यापेक्षा जरा वेगळा आवाजही ऐकू येऊ शकतो.'' मी म्हणालो, ''कदाचित तुम्हाला घोषणा दिल्याचा आवाजही ऐकू येईल.''

''आता कोणकोणते वेगवेगळे आवाज ऐकू येत आहेत?''

मी म्हणालो, ''हं, कर्मचारी एकमेकांशी आणि इथं राहणाऱ्या लोकांशी बोलण्याचा आवाज येतोय.''

तो म्हणाला, ''हं, पण त्या आवाजांबद्दल काय, जो आवाज जिवंतपणाचा, सजगतेचा आवाज आहे... एक सकारात्मक आवाज?''

''तू पक्ष्यांच्या गायनाबद्दल बोलतोयस.''

''होय!''

मी म्हणालो, ''हे पक्ष्यांचं गाणं ऐकण्यासाठी किती पक्षी हवेत, असं तुला म्हणायचं आहे?''

तो म्हणाला, ''सध्या शंभर तरी ठेवू या...''

''शंभर पक्षी? या जागेत?'' मी म्हणालो, ''तू तुझ्या कल्पनेपेक्षाही बाहेर गेला आहेस. तू आजपर्यंत कधी दोन कुत्रे, चार मांजरी आणि शंभर पक्षी असलेल्या घरामध्ये राहिला आहेस?''

आणि मग तो म्हणाला, ''नाही, पण प्रयत्न करायला काय हरकत आहे?''

आता डॉ. थॉमस आणि मी, आम्हा दोघांमध्ये ही विचारांतील फरकाची मेख बरीच मोठी होती.

बाकीचे तिघेजण त्या खोलीमध्ये नुसते ऐकत बसले होते, आता त्यांचे डोळे पार त्याच्या कवटीतून बाहेर पडतात की काय, अशा स्थितीत विस्फारले होते आणि ते सारखं म्हणत होते, ''ओ माय गॉड, तुम्हाला हे असं करण्याची इच्छा आहे?''

मी म्हणालो, ''डॉ. थॉमस, मीसुद्धा यामध्ये आहे. मला जरा यातून बाहेर येऊन विचार करावा लागेल; पण मला माहीत नाही की, मला प्राणिसंग्रहालयामध्ये बसल्यासारखे दिसायचे की तसा वास मला हवा आहे. हे असं करण्याचं चित्रही मी डोळ्यांसमोर आणू शकत नाही.''

तो म्हणाला, ''तुम्ही फक्त माझ्यासोबत राहाल का?''

मी म्हणालो, ''तू मला असं सिद्ध करायला निघाला आहेस की, हेच

काय ते सर्वोत्तम आहे.''

थॉमसला ज्याची आवश्यकता वाटत होती, त्याची ही फक्त सुरुवात होती. हल्बर्ट नाही तर म्हणू शकला नाही. काही एकामागोमाग झालेल्या बैठकांनंतर थॉमसनं त्याला बरोबर आपल्या बाजूला केलं आणि बाकीच्यांना बाजूला केलं. तो त्यांना सारखं त्या तीन प्लेगविषयी सांगत राहिला, त्या वास्तवाबद्दल ज्यामुळे शुश्रूषागृहातील माणसं कंटाळा, एकटेपणा आणि असहायता या तीन गोष्टींमुळे अक्षरश: मरायला लागली होती आणि त्यांच्या दु:खावर काहीतरी उपाय शोधावा, हेच त्यांना वाटत होतं. त्यासाठी प्रयत्न करणं हे फार मौल्यवान नव्हतं का?

त्यांनी अर्ज टाकला. त्याला काही संधी मिळण्याची शक्यता नव्हती. हल्बर्टला ठाम विश्वास होता; पण थॉमसनं तिथल्या अधिकाऱ्यांचं या वैयक्तिक कारणासाठी मन वळवण्यासाठी सगळ्यांना राज्याच्या राजधानीला नेलं आणि त्यांनी चक्क निधी मिळवला आणि जे नियमावलीमध्ये सवलत देण्याची क्षमता असणारे अधिकारी होते, त्यांनाही हे सारं पाहावं लागलं.


''जेव्हा आम्हाला तसा शब्द देण्यात आला,'' हल्बर्ट आठवून म्हणाला, ''मी म्हणालो, 'ओ माय गॉड. आता आम्हाला हे सारं करावं लागणार.' ''

हे सारं करण्याचं काम मंजूर झालं; याचा अर्थ लोइस ग्रैसिंग, जी संचालिका होती तिच्या अपयशाची नोंदच होती. ती जवळपास साठ वर्षांची होती आणि अनेक वर्षांपासून त्या शुश्रूषागृहामध्ये काम करत आलेली होती. तरीही वयस्करांच्या आयुष्यामध्ये काहीतरी चांगलं करणाऱ्या नव्या मार्गाचा अवलंब करण्याची ही संधी तिला अतिशय आवडली. तिनं मला हेही सांगितलं की, हा जणू 'एक मोठा प्रयोग' वाटत होता आणि तिनं थॉमसचा कधीतरी अधांतरी वाटणारा आशावाद आणि कर्मचारीवर्गाच्या मनात असणारं भय आणि सुस्ती, तोचतोपणा यामध्ये समन्वयाचं काम करण्याचं ठरवूनही टाकलं.

◆

**नवं कोरं**

# बेधुंद




लेखक
**अविनाश हंबीरराव लोंढे**

**किंमत : २५०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

कॉलेज जीवन म्हणजे विद्यार्थ्यांच्या भवितव्याची पायाभरणी. भविष्यात ज्या क्षेत्रात काम करायचं ठरवलेलं असतं, त्या क्षेत्राशी संबंधित ज्ञान, माहितीचा संचय करण्याचा हा काळ...पण रॅगिंग, व्यसनं, प्रेमप्रकरणं, अश्लील चित्रपट पाहणे, मुलामुलींनी एकमेकांना अश्लील एसएमएस पाठवणे, मुलांनी दारूच्या पार्ट्या करणे, सेक्सचा अनुभव घेणे, जातीवरून मुलांची भांडणं होणे, त्यांची टपोरी भाषा इ. वाईट गोष्टींमुळे काही मुलं जीवनाच्या मार्गावरून भरकटतात, जया आणि सुऱ्यासारखी...जयंत, अक्षय, सुरेश, समीर आणि अण्णा (फाइव्ह स्टार्स) या पाच मित्रांच्या निमित्ताने ही ब्लॅक कॅनव्हासवर रेखाटलेली कॉलेज जीवनाची चित्रं वास्तवाच्या जवळ जाणारी...वाईट गोष्टींचा परिणाम किती भयानक असू शकतो याचं दिग्दर्शन करणारी...वाचनीय.


## पुस्तक परिचय

# ‘परवाना जगण्याचा’



प्रिया कुमार, एक प्रेरणादायक व्यक्ती आणि लोकप्रिय लेखिका आहे. तिच्या स्वतःच्या प्रशिक्षण संस्थेची ती मुख्याधिकारी आहे. उद्योजक जगतातील नामांकित व्यक्तींबरोबर तिने काम केले आहे. तिची शिकवण्याची संभाषणात्मक शैली आणि काही वेळेस शिकवण्याचे अपारंपरिक मार्ग यामुळे अतिशय अपेक्षित दृश्य आणि चांगले यश प्राप्त झालेले दिसते. प्रिया निरनिराळ्या प्रख्यात वृत्तपत्रांतील या विषयावरील कार्यक्रमात भाग घेत असते. तिची इतर पुस्तके ‘आय ॲम अनदर यू’ आणि ‘द परफेक्ट वर्ल्ड’ प्रचंड खपत आहेत. गोष्टीरूपाने आपले म्हणणे मांडण्याची तिची पद्धत जगातील सर्व लोकांना आवडते.

'License To Live' या इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद




लेखक
**प्रिया कुमार**

अनुवाद
**श्यामल कुलकर्णी**

*उद्योजक जगतातील यशस्वी शिक्षिका, योगायोगाने यशाचा मार्ग दाखवणाऱ्या एका जगप्रसिद्ध प्रशिक्षकाने आयोजिलेल्या कार्यशाळेत दाखल होते. सात दिवसांच्या या कार्यशाळेत तिचा प्रवास तीन देशांत होतो. तिचे आयुष्य संपूर्णपणे बदलून टाकणाऱ्या या प्रवासाचे वर्णन या पुस्तकात आहे. त्या वेळी तिला आत्मशोध घ्यावा लागतो, आत्मपरीक्षण करावे लागते, स्वतःच स्वतःचा मार्गदर्शक व्हावे लागते. इतरांना तसे वागायला ती उत्तम रीतीने शिकवत असे; पण स्वतःच्या बाबतीत तिने हा मंत्र वापरून पाहिला नव्हता. वास्तव जगात चांगले आणि वाईट यांची बेमालूम सरमिसळ झालेली दिसते. तसंच, समजूतदार, शहाण्या लोकांबरोबरच भ्रमिष्टपणाचे कातडे पांघरलेल्या लोकांचा भरणा सापडेल. तुम्हाला क्षणात योग्य मार्ग सापडेल, तर काही वेळाने तुम्ही भरकटत आहात असे वाटेल. या सर्वांमधून नियतीने तुमच्यासाठी आखलेला मार्ग शोधून काढून तुमची आयुष्याबद्दलची स्वप्ने योग्य प्रकारे प्रत्यक्षात उतरवायची कशी, हे या पुस्तकात सांगितले आहे..*

# प्रवास सुरू

खिडकीवर शोभेसाठी लावलेल्या बारीक घंटा वाऱ्यावर जशा सतत किणकिणत राहतात, तसे कूर्ट रिंक हे नाव माझ्या मनात गुंजत होते. घरी परतत असताना माझ्या डोळ्यांसमोर ती सगळी घटना परत परत येत होती. त्या विचारातच मी सबंध प्रवासभर गर्क असल्यामुळे मी किती अंतर कापले, हे माझ्या ध्यानात आले नाही. मी खरे तर माझ्या घराच्या आवारात केव्हा शिरले, हे मला कळलेच नाही.

मी गाडीतून उतरले. माझ्या गाडीचेच दार जोरात ढकलले. माझे कुत्रे माझे स्वागत करायला पुढे सरसावले होते. माझ्या कुत्र्यांच्या सहवासात मला अतिशय दिलासा मिळतो. विशेषतः ऑफिसात एखादा दिवस दमणुकीचा असतो, त्या वेळी हे विशेषत्वाने जाणवते. बेटी नावाच्या स्पिट्झ जातीच्या माझ्या लाडक्या कुत्रीने माझ्या हातातून वर्तमानपत्र हिसकावून मिळवण्याकरता धडपड केली. मी ते बागेच्या दिशेने भिरकवावे म्हणून ती वाट पाहत बसली. त्या वेळी त्या वर्तमानपत्रातील माझ्या छबीवर तिची लाळ गळत होती. ते वर्तमानपत्र त्या जागेवर ओले झाले होते. कोकोने ते वर्तमानपत्र आपल्या दिशेला ओढले. दोघांत रस्सीखेच चालली होती. कोको त्या पेपरचा एक तुकडा घेऊन पळून गेली. बेटी माझ्या पायाशी तशीच उभी होती. मी परत ते फाटके वर्तमानपत्र बाहेर फेकावे म्हणून ती उभी होती.

पेपर उचलता उचलता माझे लक्ष त्यातल्या एका फोटोकडे गेले. त्या अंधारात त्या फोटोत मला एक ओळखीचा चेहरा दिसत होता. तो फोटो नीट स्पष्ट दिसावा म्हणून बागेतील दिव्यापाशी मी जरा धावतच गेले. मी त्या फोटोकडे टक लावून बघतच राहिले. माझा विश्वासच बसेना. खरे तर दिवसभर ते वर्तमानपत्र माझ्या हातात मी बाळगत होते; पण ती बातमी आणि फोटो यांच्याकडे माझे लक्षच गेले नाही. तो एक मोठा लेख होता. माझा फोटो ज्या पानावर होता, त्यानंतर काही पाने उलटल्यावर तो लेख होता. त्या लेखाचा मायना होता 'कूर्ट रिंक- यशाचा मार्गदर्शक'. विश्वासच बसेना की, मी हे वाचते आहे ते खरे आहे का? मी माझ्या स्वतःच्याच विश्वात मग्न होते. आजूबाजूला काय घडते आहे, याच्याकडे जणू माझे लक्षच नव्हते. आजूबाजूचे जग मी विसरले होते. माझ्या अगदी समोर कूर्टबद्दलचा लेख

होता. मी दिवसभरात तो पाहिलाही नव्हता. मी माझ्याच भोवतालच्या परिस्थितीत एवढी मश्गुल होते की, माझ्याच व्यवसायातील एका व्यक्तीवरचा एक महत्त्वाचा लेख मी पाहिलाही नव्हता. तो खरेतर माझा भविष्यातील स्पर्धक होण्याची शक्यता होती. मला माझ्या आईची आठवण झाली. ती घरभर चष्मा शोधत असायची आणि शेवटी तो कपाळावर सरकवलेला असायचा. माझ्या मनात जो सतत गोंधळ असतो, तो माझ्या आईकडून मिळालेला वारसा असावा; पण आईला दोष देऊन माझी सुटका होणार नव्हती. मी या वास्तव जगात जगायचे बंद केले होते जणू! माझ्याच कल्पनाविश्वात मी दंग असायची आणि हे मला कधीच कळत नव्हते. आज हा लेख नजरेतून दिवसभरात सुटला, हा माझ्या त्या गोंधळलेल्या मनःस्थितीचा परिपाक असावा. या कृतीचा दुसरा काही खुलासा मला देता येत नव्हता. आत्ताच त्या व्यक्तीची व माझी भेट झाली होती. हा त्याचाच चेहरा होता. माझी आई घरात त्या कुत्र्याच्या आवाजामुळे चिडून आरडाओरडा करत होती. माझी कुत्री बागेत भुंकत होती. माझी पँट ओढून, जवळ जवळ फाडूनच माझे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करत होती, कारण मी त्या वर्तमानपत्रातील तो लेख बागेतील अंधुक प्रकाशात वाचायचा प्रयत्न करत होते.

हा माणूस आमच्या उद्योग क्षेत्रातील एक अतिशय बुद्धिमान, असामान्य कर्तृत्व असलेली व्यक्ती असावी असे जाणवत होते. मी आत्तापर्यंत त्याचे नाव कसे ऐकले नाही? इतरांबद्दलच्या अलिप्त भावनेची ही किंमत होती. आमच्यापैकी काही कामात मश्गूल असण्यात धन्यता मानायचे. सबंध जग जरी त्या वेळी जवळून जात असेल तरी अशा माणसाचे त्याकडे लक्ष जात नाही. मी स्वतःत इतकी हरवून गेले होते, इतकी गोंधळलेली होते की, माझी प्रगती खुंटली होती. नवीन शिकण्याची उमेद हरवली होती. नवीन प्रयोग करून पाहण्याची इच्छा हरवून बसले होते मी. खरे तर मी जगायचेच विसरून गेले होते. माझ्यावर लेख नसेल तर मी वर्तमानपत्रदेखील वाचत नसे. मला वाचायला वेळ नव्हता. विचार करायला वेळ नव्हता. चिंतन, मनन या कशालाच माझ्याकडे वेळ नव्हता. माझे लक्षच नव्हते. किंबहुना हे सगळे करायचे मी सोडूनच दिले होते. जगायलादेखील माझ्याकडे वेळ नव्हता. एकंदरीत सध्या माझे जीवन जे वाया चालले होते, त्यामुळे खरे तर मी

जगायचेच थांबवले होते.

कूर्टने माझ्या देशात, माझ्याच शहरात एक परिसंवाद (चर्चासत्र) आयोजित केला होता. त्याकरता तो इथे आला होता. त्याचे वय चव्वेचाळीस होते. जन्माने तो जर्मन होता; पण अमेरिकेचा नागरिक होता. त्याच्या कार्यशाळा आगळ्यावेगळ्याच असायच्या. तो कडक शिस्तीचा होता, अशी त्याच्याबद्दलची माहिती त्या लेखात होती. ज्या लोकांना तो प्रशिक्षण द्यायचा, त्यांना कामात हमखास खात्रीपूर्वक यश कसे प्राप्त करून घ्यावे, हे शिकवायचा. त्याची शिक्षणपद्धती जरा अवघडच होती. पण त्याचा उपयोग मात्र चांगलाच होत होता. तो लेख नीट समजावा म्हणून मी काळजीपूर्वक दोनदा वाचला. काही मिनिटांपूर्वीच जो माझ्या हृदयाला भिडला होता, त्या व्यक्तीबद्दल उत्सुकतेने मी वाचत होते, का माझ्या प्रतिस्पर्ध्याबद्दल मला जाणून घ्यायचे होते; हे मला समजत नव्हते. काहीही असो, मला वाचण्यात उत्सुकता होती आणि समाधानही मिळत होते, हे मात्र खरे आहे.

मी तो लेख दोनदा वाचला. मग कोको आणि बेटीला माझ्या दोन्ही काखोट्यांना मारले आणि घरात शिरले. माझी आई अजूनही त्या दोघींबद्दल तक्रार करत होती. तिथे पडलेल्या बशा ती गोळा करत होती आणि तोंडाने तक्रारीचा सूर लावला होता; पण ते ऐकायला मात्र तिथे कोणीच नव्हते. ''अगं आई, कोणाशी एवढं बोलते आहेस?'' मी आईला जरा चिडवतच म्हटले.

''मला कशाला विचारते आहेस?'' आईने आपल्या निराशेच्या सुरात रागातच मला उत्तर दिले. ''तुला तर एक मिनिट वेळ नाही आणि मी जर काही असं बोलले तर तुझी नेहमीची टकळी सुरू करतेस. मला माहीत आहे की जगाकरता तू एक प्रकारे मोठी तारका बनली आहेस, प्रसिद्ध आहेस; पण घरात मात्र तुझ्या आयुष्यात, राहणीत काडीचा बदल नाही. ते होतं तसंच बेशिस्त आहे.'' सगळ्यांची आई अशीच तक्रारखोर असते. तुम्ही देशाचे राष्ट्राध्यक्ष असा किंवा गुंडांच्या टोळीचे प्रमुख असा; पण आईच तुम्हाला तुमची जागा दाखवून देऊ शकते.

मी आईजवळून सटकले. कारण प्रत्येक वेळेला तिचा तक्रारीचा सूर चालूच असायचा. त्याचा मला खूप त्रास व्हायचा. खरे तर शांततेची गरज घरी आल्यावर आवश्यक वाटायची. मला फक्त माझ्या कुत्र्यांचा सहवास

**नवं कोरं**

# रेड टेप




लेखक
**अभिजित कुलकर्णी**

**किंमत : ३४०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

‘करप्शन’ म्हणजे करपलेल्या व्यवस्थेचे अपत्य! सरकार निर्णय घेते व प्रशासन त्याची अंमलबजावणी करते. या प्रक्रियेत निर्णयाचे लाभार्थी, विरोधक, पत्रकार, अन्य दबावगट, ठेकेदार, दलाल आणि प्रसंगी माफिया अशा हितसंबंधीयांची गुंतागुंत त्यावर प्रभाव टाकत असते. त्यातून एक ‘व्हिशिअस सर्कल’ आकार घेते, जे स्वत:च्या फायद्यासाठी जनतेचा पैसा, हक्क, न्याय हे सारे गिळंकृत करून टाकते. पण ज्या अधिकारांमुळे आपण हे सर्व करू शकतो ते अधिकार आपल्याला फक्त जनतेचे विश्वस्त या नात्याने प्राप्त झाल्याचे भान बाळगत एखादा प्रामाणिक अधिकारी जेव्हा हा चक्रव्यूह भेदण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्याच्यापुढे किती आव्हाने उभी ठाकतात, काय काय प्रसंग गुदरतात, कोणकोणत्या अग्निदिव्यांतून त्याला जावे लागते त्याचा हा पट. लाल फीतशाही अर्थात रेड टेपिझममध्ये बंदिस्त असलेली मजबूत प्रशासकीय चौकट भेदू पाहणाऱ्या एका झुंजार अधिकाऱ्याची उत्कंठावर्धक संघर्षगाथा.

हवासा वाटायचा. मी त्यांच्याशी संवाद साधावा, बोलावे अशी त्यांची अपेक्षा नसायची. माझ्या आईला मात्र हे कधीच पटले नाही. मी निष्काळजी आहे, या गोष्टीला जबाबदार कशी आहे हे सतत माझ्या कानावर घालायची. कधीकधी मला वाटायचे की, ती जे बोलते आहे ते बरोबरच आहे.

मी स्वयंपाकघरात कोको आणि बेटी यांना आईभोवती बागडायला सोडून दिले आणि जिन्याने वर गेले. मी माझ्या अभ्यासिकेत गेले आणि माझा लॅपटॉप उघडला. मला कळेना, एवढी कोणती सणक मला आली अचानक! पण माझ्या डोळ्यांसमोर एकच विषय होता, तो म्हणजे कूर्ट रिंक.

मी त्या लेखात लिहिलेले संकेतस्थळ गुगलवर शोधायची धडपड चालू केली. तीन सेकंदांच्या आत माझ्यासमोर संकेतस्थळ आले आणि तिथे कूर्टचा फोटो झळकत होता. भलामोठा फोटो होता तो. मी ज्या कूर्टला आत्ता भेटले होते, त्यापेक्षा या फोटोत तो वेगळाच दिसत होता. कोत्या वृत्तीचा, स्वार्थी, अप्पलपोटा असा तो वाटत होता. शिवाय राकटही वाटत होता. काही मिनिटांपूर्वी मी त्याच्या मिठीत होते. त्याला त्या वेळी माझी खूप काळजी वाटत होती. पण त्या लॅपटॉपमधील फोटोत मात्र तो विचित्रच दिसत होता. उमदा नव्हता दिसत. मी तो फोटो पाहून माझ्या ओल्या कपड्यांतच शहारले.

त्यानंतर लॅपटॉपच्या पडद्यावर शब्द उमटू लागले –

**तुम्ही तुमचं आयुष्य बदलू शकता, असं जर मी तुम्हाला सांगितलं तर!**

**तुम्हाला ज्या पद्धतीचं आयुष्य हवं आहे तसं तुम्ही तुमचं आयुष्य घडवू शकता, असं मी तुम्हाला सांगितलं तर!**

**तुम्ही कितीही निराश झालेले असाल तरी मी तुमची मनःस्थिती संपूर्ण बदलू शकतो, असं मी तुम्हाला सांगितलं तर!**

**मी तुम्हाला असं आश्वासन दिलं की तुम्ही हे सगळं करू शकता, तर!**

ती वाक्ये एकेक करून माझ्यासमोर येत होती आणि माझ्या काळजाला भिडत होती.

मला असे वाटले की मी याच्याच शोधात होते. हेच माझ्या प्रश्नाचे उत्तर आहे. इथे मला पोहोचायचे आहे. मला माझ्या आयुष्यात बदल हवा आहे. मी

फार हरवून गेलेली होते. माझ्यात संपूर्ण बदल मला हवा होता. हो, हेच मला हवे आहे. मी खूप उत्साहित झाले आणि आनंदाने उडी मारून पटकन उठून बसले.

मी खरे तर त्या संकेतस्थळावरची माहिती पूर्ण वाचलीसुद्धा नव्हती. पण पहिल्या तीस सेकंदांत जी माहिती माझ्यासमोर आली, ती वाचल्यावर मी निश्चय केला की त्या चर्चासत्रात आपण भाग घ्यायचा. बाजारात एखादी वस्तू आवडल्याबरोबर कोणताही विचार न करता खरेदी करण्याची माझी आत्तापर्यंतची सवय होती. या सगळ्या विकत आणलेल्या वस्तू, ज्या मी कधीही वापरल्या नाहीत आणि जर त्या परत केल्या तर मी कोट्यधीश होईन. बहुतेक वेळा काही विचार न करता आवडलेली वस्तू मी खरेदी करत असे. मी अनेकदा कपडे, बुटांचे जोड अशा अनेक वस्तू अविचाराने पटकन खरेदी केलेल्या आहेत. नवीन कपडे घरात आणल्यावर अनेक महिने ते घालण्यासाठी मला काही योग्य कारण मिळत नसे. ते तसेच कपाटात पडून राहायचे आणि जेव्हा ते कपडे वापरायची योग्य वेळ यायची त्या वेळी ते कपडे अंगाला नीट बसत नसत. किंबहुना माझ्या आयुष्यात अनेक गोष्टी अशा ऊर्मीतून, एका झटक्यात विचार न करता घेतलेल्या होत्या. सौदा झाल्यावर मग मला त्या वास्तवाची जाणीव व्हायची. त्याच ऊर्मीत मी ठरवले की, कूर्टच्या चर्चासत्रात भाग घेण्याची मला नितांत 'गरज' आहे.

कूर्टचे सात दिवसांचे चर्चासत्र मुंबईत भरणार होते. मला माझ्या आतल्या आवाजाने साद दिली की या चर्चासत्रात तू भाग घेणार आहेस आणि माझे हात त्या चर्चासत्राच्या अधिक माहिती देणाऱ्या संकेतस्थळावर जाण्याकरता बटण दाबू लागले. त्या पानावर लिहिले होते, 'तुम्हाला भाग घ्यायचा असेल तर शो क्लिक करा'. मी त्याप्रमाणे केले. पुढच्या पानावर माझी पूर्ण माहिती भरण्याची सूचना होती. त्याप्रमाणे मी माहिती भरली. पुढचे पान उघडले. तिथे लिहिले होते की तुम्हाला नक्की या चर्चासत्रात भाग घ्यायचा आहे ना? तिथे मी 'हो' म्हणून संकेत दिला. त्या क्षणाला मी माझ्या या ऊर्मीबद्दल जरा विचार करू लागले. मला असे वाटले की कूर्ट आपल्या या चर्चासत्राचा जास्तच प्रसार करतो आहे. मी जवळ जवळ तयार झालेच होते; पण या नावनोंदणीची ती प्रक्रिया होती त्यामुळे मी परत वास्तव जगात आले.

ही काय नावनोंदणीची प्रक्रिया आहे! असा विचार माझ्या मनात आला. या चर्चासत्राबद्दल काहीही तपशील दिलेला नाही. मी तिथे जाऊन काय शिकणार आहे... तिथे गेल्यावर प्रत्यक्षात काय काय होणार आहे... त्या प्रशिक्षणाचा सारांश कुठे आहे... मान्यवरांच्या शिफारशी, प्रशस्तिपत्रके कुठे आहेत... त्या चर्चासत्रावरचे लेख कुठे आहेत... मला काहीतरी माहिती तर हवी!

पुढच्या पानावर त्या चर्चासत्रांची फी कशी भरायची याचा तपशील होता. ''हॅलो!'' मी मनाशी म्हणाले, 'मी हे पैसे कशाकरता खर्च करत आहे! किती फी आहे? हे सगळं विचित्रच वाटतं आहे.'

त्या वर्तमानपत्राची समाजातली पत आणि कूर्टचा नुकताच आलेला अनुभव यावरून ही बनवाबनवी निश्चित नसणार, याची मला खात्री वाटली.

'पुढे जा' या सूचनेवर मी क्लिक केल्यावर जे पान समोर आले त्यावरचा मजकूर वाचून मी एकदम आऽऽ वासला.

**'चर्चासत्राची फी पंचवीस हजार डॉलर्स. पैसे देण्याकरता क्लिक करा.'**

पंचवीस हजार डॉलर्स... बापरे! मी जोरात किंचाळले. त्याचे काय डोके फिरले आहे का?

मी जरा रागानेच लॅपटॉपचे ते पान बंद केले.

''पंचवीस हजार डॉलर्स?'' मी माझे डोके हलवत पुटपुटले.

पंचवीस हजार डॉलर्स ही एका चर्चासत्राला हजर राहण्याची फी खूपच जास्त आहे! तुम्हाला घर सजवायचे असेल किंवा एखादी हिऱ्याची अंगठी घ्यावयाची असेल किंवा गाडी विकत घ्यायची असेल किंवा दानधर्म करायचा असेल तर ही रक्कम काही अवाजवी नाही. पण चर्चासत्रासाठी एवढे पैसे देणे हे मात्र अतिच झाले. त्या चर्चासत्रातून आपल्याला दाखवण्याजोगे कुठलेही उत्पादन मिळणार नाहीये. या चर्चासत्राबरोबर एखादे छोटे घरकुल कूर्ट देणार असेल तर मात्र ही फी योग्य आहे. नाहीतर दिवसाढवळ्या घातलेला हा दरोडाच आहे.

मी त्याच्याशी संपर्क साधण्यासाठी असलेले माहितीचे पान उघडले. तिथे मला एक फोन नंबर मिळाला. तो अमेरिकेतील फोननंबर होता. मी फोन करायचे ठरवले. मी माझ्या घड्याळाकडे बघितले. अमेरिकेत आत्ता दिवस

**नवं कोरं**


# मुघल सत्तेचा सारिपाट

लेखक

**श्रीनिवास राव अडिगे**

अनुवाद

**उदय भिडे**




**किंमत : २२०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

सतराव्या शतकाच्या मध्यकाळात बिघडलेल्या प्रकृतिस्वास्थ्यामुळे मृत्युशय्येवर पडलेल्या मुघल सम्राट शहाजहानची– दारा, शुजा, औरंगज़ेब आणि मुराद – ही चारही मुले सत्ता हस्तगत करण्यासाठी आपसात झुंजत आहेत. शहाजहानवर अत्यंत कडक बंदोबस्तात उपचार चाललेले असल्यामुळे अफवांचे पीक भरमसाट वाढते. सम्राट जिवंत आहेत का? की त्यांच्या मृत्यूची बातमी हेतुपुरस्सरपणे गुप्त राखली जात आहे? साम्राज्यातल्या गुप्तहेरांनी आणि हस्तकांनी चुकीची माहिती आणि अर्धसत्य गोष्टी प्रसारित केल्यामुळे खरेतर भावा-भावांमधला तणाव वाढत चालला आहे. त्यामुळे कशाचीच खात्री देता येत नाही. अशा कारस्थानाने आणि लुच्चेगिरीने भरलेल्या राजमहालातील वातावरणात– आणि मुराद त्याच्या अतिभोगलालसालुप्ततेसाठी, दारा त्याच्या अतिसंवेदनशीलतेसाठी, आणि शुजा त्याच्या आततायीपणासाठी कुप्रसिद्ध होत असताना– सम्राट म्हणून सत्तारोहण करण्यासाठी औरंगज़ेबाकरिता अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे असे वाटत आहे. परंतु औरंगज़ेबाची ही सत्तालालसाच त्याच्या ऱ्हासाला कारणीभूत तर ठरणार नाही ना? मुघल सत्तेचा सारिपाट ही कादंबरी सत्ताग्रहण, श्रद्धा आणि जीवनाचे सार-समाधान यासंबंधीच्या प्रश्नांचा लेखणीच्या लालित्यपूर्ण फटकाऱ्यांद्वारे धांडोळा घेते.

उगवणार. आत्ता फोन करायला हरकत नाही. फक्त या नंबरचा फोन घेऊन तो भारतात वावरत असेल, तर ही वेळ योग्य नाही.

मी माझ्या मोबईलवर तो नंबर फिरवला. मला इतकी निराशा का घेरली होती ते मला कळले नाही. माझ्या उत्स्फूर्त भावनेच्या भरात मी काहीतरी करते आणि त्यामुळे नंतर मन मात्र निराशेने ग्रासते. मग परत नव्याने पश्चात्ताप होतो.

तिकडून फोनची घंटा वाजली. पहिल्याच घंटेनंतर उत्तर आले. खरे तर मी या संवादाची तयारी केलीच नव्हती. मला आपले वाटले की, कोणी या फोनला उत्तर देणारच नाही. मात्र मी निदान प्रयत्न केल्याचे समाधान मिळणार होते. खरे तर मला कोणत्याच प्रश्नांची उत्तरे नको होती. माझ्या पदरात पडलेली निराशा घालवण्याकरता मी तो फोन केला होता. मला ते सगळे वाचून वैताग आला होता. तो बाहेर काढायचा होता. मला या चर्चासत्रात भाग घ्यायचा होता. मी उत्सुक होते. नावनोंदणी प्रक्रिया समोर आल्याबरोबर माझ्या सगळ्या उत्साहावर पाणी पडले होते.

''हॅलो!'' पलीकडून एका माणसाने जरा कडक शब्दांतच विचारले. जणू तो माझ्यावर दोषारोप करतो आहे असा त्याच्या आवाजाचा रोख होता.

''अं... हॅलो, माझं नाव प्रिया. मी कूर्ट रिंकच्या संकेतस्थळावर होते.'' मी चाचरतच बोलले. मी घसा खाकरून पुढे म्हणाले, ''मला चर्चासत्रात भाग घ्यावयाचा आहे; पण त्याच्याबद्दल मात्र कोणताच तपशील इथं दिसत नाही. तिथं फक्त पैसे भरण्यासंबंधी सूचना आहे आणि फी आहे पंचवीस हजार डॉलर्स. मला माहीत नाही की ही फी मी कशाकरता देत आहे. अं... अं... जरा मला स्पष्टीकरण द्याल का?'' मला मी मूर्खच वाटायला लागले होते. वाटलं, लाईन खराब आहे, असं सांगून फोन बंद करावा.

''त्या संकेतस्थळावर पहिल्या तीस सेकंदांत त्या चर्चासत्राचा हेतू सांगितलेला आहे, तो तुम्ही पाहिलात का?'' पलीकडून जरा उर्मट आवाज आला.

''तुम्हाला तुमचं आयुष्य बदलायचं आहे का..' वगैरे जिथं आहे त्याबद्दलच तुम्ही बोलता आहात ना?'' त्यात आणखी काय लिहिले आहे ते आठवण्याचा मी प्रयत्न केला. ''एवढीच माहिती चर्चासत्राबद्दल आहे का?'' मी जरा आवाजात मवाळपणा आणून विचारले. त्याच्याही आवाजात तसाच

बदल होईल अशी अपेक्षा केली.

''हो, तुम्ही तुमच्या आयुष्यात जर बदल केलात, तर तेच तर हवं असतं.'' त्याने उत्तर दिले.

*ओ! हा हुशार दिसतो आहे माणूस. मला माझ्या कंपनीच्या प्रमुखपदी असाच कोणीतरी हवा आहे.*

''म्हणजे या चर्चासत्राबद्दलची थोडी झलक किंवा विषयपत्रिका किंवा चर्चासत्राची झलक, जी मला पाहता येईल, वाचता येईल...ती नाही का?'' मी सहजपणे विचारले.

''तुमचं आयुष्य बदलायचं असेल, तर तुम्हीच या चर्चासत्राचा विषय आहात आणि भविष्यात तुम्हाला काय हवं आहे हे तुम्हाला चांगलंच माहीत आहे. तीच झलक म्हणूनच तुम्ही हा फोन केला आहेत. तुमच्या आयुष्याला कोणतीच आखीव-रेखीव रूपरेषा नसते. खरं तर ही वेळ तुमची झोपायची आहे, जर तुमचं आयुष्य आखीवरेखीव रूपरेषेप्रमाणे चालत असतं तर! नाहीतर तुम्ही असं भलत्या वेळी दुसऱ्याला जागं करून, जो तुमचं आयुष्य बदलू शकतो त्याला खुलासा विचारत बसला नसतात.'' तो म्हणाला.

सिनेमात आकाशातून देववाणी जशी होते, तसा त्याचा आवाज होता. मी थक्क झाले.

अरेरे अरेरे...! काय बोलावे मला कळेना. ज्याचा आवाज देवासारखा आहे अशा माणसाशी तुम्ही काय वाद घालणार? ''चर्चासत्राला पंचवीस हजार डॉलर फी जरा जास्तच वाटत नाही का?'' या तिच्या म्हणण्यात निषेध किंवा विरोध यापेक्षा तक्रारीचा सूर जास्त होता.

''तुमचं आयुष्य पूर्णपणे बदलून टाकण्याकरता तुम्ही किती पैसे द्यायला तयार आहात? तुमच्या दृष्टीनं तुमचं आयुष्य सुखी, समाधानकारक आणि तुम्हाला स्वतःलाच किमती वाटेल असं होण्याकरता तुम्हाला किती पैसे खर्च करणं योग्य वाटतं? तुमच्या जीवनाचा उज्ज्वल भविष्यकाळ अगदी तुमच्या समीप आहे; पण त्याची उगीचच काळजी करत तुम्ही किती वेळ, पैसा आणि तुमचं अनमोल जीवन वाया घालवणार आहात? तुमच्या प्रश्नांची उत्तरं, जी तुमच्या अंतरात दडलेली आहेत ती शोधण्याकरता तुम्ही किती पैसे खर्च करायला तयार आहात? जर तुमच्या आयुष्याचं मोल ठरवायचं असेल, तर तुम्ही स्वतःची किंमत तुम्ही किती कराल? हे तरुणी मला जरा सांगतेस

का?'' त्याचे हे शब्द माझ्या कानातून मेंदूपर्यंत आरपार भेदून गेले. मी बर्फासारखी थिजून गेले. त्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून माझ्या प्रश्नाकडे त्याचे लक्ष वळवण्यासाठी मी त्याला विचारले, ''चर्चासत्र केव्हा आहे... कुठं आहे... तुमच्या संकेतस्थळावर यासंबंधी कोणताच खुलासा नाही.''

''तुमचं स्वतःचं आयुष्य बदलण्यासाठी अनेक संधी घेऊन उभं असलेलं चर्चासत्र तुमच्यासमोर तुमच्या जन्मापासूनच आहे. तुम्ही आत्ता जिथं आहात तीच चर्चासत्राची जागा आहे. तुम्हाला वेळ आणि जागा तुमच्या सोयीची हवी असेल तर तुमचे पैसे आणि माझा वेळ तुम्ही वाचवू शकता. मी माझ्या सवडीनुसार आणि मला सोयीस्कर असलेल्या जागेत चर्चासत्र घेत असतो. तुम्हाला खरंच स्वतःत बदल करायचा असेल तर तुमच्या तंत्राप्रमाणे, इच्छेप्रमाणे होणार नाही.'' फोनच्या पलीकडून गडगडाट झाला.

''तू कूर्ट आहेस का?'' मी भीतभीत विचारले.

''मी तुझ्या प्रश्नाचं उत्तर नाही. प्रश्न हा आहे की तू प्रिया आहेस का? का तू आहेस त्यापेक्षा स्वतःला कमी लेखणारी आहेस? तुला स्वतःचा शोध घ्यायचा असला तर संकेतस्थळावरची सगळी प्रक्रिया पूर्ण कर आणि सांगितलेले पैसे भर. फुकटात तुला फक्त लाटा बघायला मिळतील. लाटादेखील संवाद साधतात, पण तू ऐकू शकत नाहीयेस, कारण तुझे कान बधिर झाले आहेत. तू सत्याचा शोध घेत आहेस.'' जणू देवच माझ्या कानात बोलला आणि मला वस्तुस्थितीची जाणीव त्याने करून दिली. फोन ठेवल्याचा आवाज होऊन सगळे शांत झाले.

त्याने फोन ठेवलेला समजल्यावर मला दिलासा मिळाला. मला आणखी काहीही विचारायचे नव्हते. त्याला काय सांगायचे होते ते सांगून झाले होते. हा बोलत होता तो कूर्टच असणार. माझी खात्रीच पटली की तो कूर्टच बोलत होता. नाहीतर लाटांबाबत तो कसे बोलला? त्या पत्रकाराचे लेखातले म्हणणे योग्यच होते. त्यांच्या शिकवण्याच्या पद्धती कठोर आहेत असे नाही, तर शिकवण्याआधीचे बोलणे-वागणे तितकेच कठोर आहे; पण समुद्रकिनाऱ्यावर मला जो भेटला तोच हा आहे, यावर माझा विश्वासच बसेना. कदाचित तो नसेलही कारण त्याने आपले नावसुद्धा सांगितले नाही.

माझा मेंदू तर धावायलाच लागला. ती देववाणी ऐकून माझा आत्मा अंतर्बाह्य ढवळून निघाला. ती संपूर्ण संध्याकाळ खरे तर मी अंधारात

चाचपडतच होते; पण आता मात्र मी फार वेगळ्या ठिकाणी मनाने पोहोचले होते. कूर्ट जे बोलला त्याने समुद्रावर सावरण्याची जी कृती केली आणि आत्ताचे त्याचे बोलणे, हे सगळे अगदी खरे खरे होते. खरे तर मला हेच तर हवे होते. मला सत्याचा शोध घ्यायला, आत्मशोध घ्यायला कोणाचीतरी मदत हवी होती. गुरू हवा होता. मी कशापासून दूर पळते आहे, याचे मार्गदर्शन करायला मला खरेच मदतीची गरज होती आणि मला मनोमन पटले की, कूर्टच माझा मार्गदर्शक होऊ शकेल. मी गेंड्याच्या कातड्याची आहे आणि स्वतःला जास्त शहाणी समजणारी होते. जरी माझ्या मनातल्या प्रश्नांची उत्तरे माझ्या जवळपास असली तरी माझ्या मनात चाललेल्या गोंधळामुळे ती मला सापडत नव्हती. माझ्या आयुष्यात एका सर्वनाशाकडे नेणाऱ्या वादळात, अरिष्टात मी सापडले होते आणि यातून वाचण्याकरता, सावरण्याकरता मला कूर्टची नितांत गरज होती.

मी माझ्या आवडत्या सोफ्यावर लॅपटॉप घेऊन बसले. मी स्वतःला जी काय समजत होते त्यापेक्षा निश्चितच माझी लायकी जास्त होती; कारण माझे गुण मला कळत नव्हते. मी स्वतःला जरा जास्तच प्रमाणात कमी लेखायला लागले होते. मी एका अरिष्टाकडे जात आहे ही माझी भीती खरी होती. माझ्या वागण्या-बोलण्याचा, कृतीचा परिणाम केवढा मोठा होऊ शकतो, याची झलक मी सारखी पाहत असे. ज्या दिवशी चांगल्या मनःस्थितीत असेन, त्या वेळी माझे सर्व काम उत्कृष्ट प्रतीचे होत असे; पण ज्या वेळी माझी मनःस्थितीच बिघडलेली असायची, तेव्हा आधी केलेल्या सगळ्या चांगल्या कामावर बोळा फिरवला जायचा. तेव्हा या सगळ्या दोलायमान स्थितीत मी परत जिथे होते तिथेच असायची. प्रगती खुंटायची. कर्तृत्वाच्या शिखरावरून एक वर्षातच मी परत पूर्वपदावर यायचे. मला अशी भीती वाटत होती की, मी याच चक्रात अडकून पडेन. या परिस्थितीतून बाहेर पडायची वेळ आता येऊन ठेपलेली आहे.

मी परत त्या संकेतस्थळावर जाऊन काळजीपूर्वक पाहत राहिले. विशेष काही नव्हते. सुरुवातीचे विचार आणि त्यानंतर फी भरण्यासंबंधीही प्रक्रिया याव्यतिरिक्त आणखी काहीच नव्हते. जर कोणाला समजते की मी एका चर्चासत्रासाठी पंचवीस हजार डॉलर्स खर्च केले आहेत, तर ते मला वेड्यातच काढतील. लोकांत माझे हसे व्हावे असे मला मुळीच वाटत नव्हते.

त्याच्याआधी मला लोकांची पर्वा कधीच वाटली नाही; पण आत्ता या चर्चासत्रात भाग घेण्याचा निर्णय मी उगीचच 'त्या' भीतीने खूप वेळ लांबवला आहे. मी माझ्या निवडलेल्या कार्यक्षेत्रात काम करायला सुरुवात केल्यापासून मी यशस्वीच होत गेले, कारण मी त्या वेळी लोकांची पर्वा केली नाही. त्यामुळे मी प्रगतीच्या शिड्या भराभर चढले; पण अलीकडे मात्र लोकांची मते मला महत्त्वाची वाटायला लागली आणि मी माझ्या मनाच्या गोंधळात पार बुडून गेले. तुम्ही आजूबाजूला नजर टाकली तर तुमच्या लक्षात येईल की जवळजवळ निम्मे लोक अशाच गोंधळलेल्या मनःस्थितीत वावरत असतात आणि इतरांना मात्र अशा मनःस्थितीतून बाहेर पडण्यासाठी फुकटचा सल्ला देत असतात.

मी चर्चासत्रात भाग घ्यायचा निर्णय घेतला. माझ्या आयुष्यातील ही सर्वांत विक्षिप्त कृती होती. मी आयुष्य बदलण्याची हमी देत असलेल्या चर्चासत्रात भाग घेण्यासाठी पंचवीस हजार डॉलर्स फी मोजायला तयार झाले होते. हा बदल कसा, कोठे, केव्हा होणार आहे हे मला माहीत नव्हते. एक लाख डॉलर्सची गाडी मी विकत घेतली; पण त्या गाडीने माझ्या आयुष्यात कोणताच बदल झाला नाही. मी आत्तापर्यंत शेकडो डॉलर्स खर्च करून इतर अनेक वस्तू घेतल्या. माझ्या गरजेपेक्षा जास्त वस्तू माझ्याकडे आहेत; परंतु त्यामुळे माझ्या व्यक्तिमत्त्वात बदल काहीच झाला नाही. आता मी माझ्या जीवनासाठी आणखी खर्च करत आहे. माझ्या जीवनात योग्य बदल व्हावा म्हणून पंचवीस हजार डॉलर्स खर्च करायला मी तयार झाले आहे. माझे जीवन योग्य मार्गावर आणण्यासाठी, भोवतालचे जग बदलण्यासाठी, आणखी नवीन नवीन शक्यतांचा शोध घेण्यासाठी, जास्त सुखी होण्यासाठी आणि मनाने जास्त मोकळी व्हावे म्हणूनच ही संधी मी घ्यायचे ठरवले आहे. स्वतःचेच एक नवे रूप मी स्वतःलाच विकत आहे, यावर विश्वास बसत नव्हता! मी माझ्यात नवीन बदल करायला सिद्ध झाले आहे. त्याकरता मीच मला पटवून देते आहे की, हे चर्चासत्र तुला कसे योग्य ठरेल.

◆

**नवं कोरं**

# गार्डिअन




लेखक

**सुधा रिसबूड**

**किंमत : २२०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**


'मना कल्पना कल्पिता कल्प कोटी' मनाची शक्ती अगाध असते. सृष्टीच्या रहस्याचे कुतूहल प्रथमत: मन असलेल्या मानवातच निर्माण झाले आणि ते जाणून घेण्याचे यत्न त्याने सुरू केले. त्या अनवरत प्रयत्नांमधूनच, त्याला सृष्टीचे गूढ उकलू लागले आणि तो विज्ञानाच्या अभ्यासाचा पाया होता. काळाच्या ओघात त्याने विज्ञानाचे शिल्प उभारायला सुरुवात केली. अनेक वैज्ञानिक विचार, पद्धती, कल्पना यातून भविष्याचा वेध घेण्यास त्याने सुरुवात केली. अशाच काही अथांग वैज्ञानिक कल्पनांमधूनच ज्या कथा स्फुरल्या त्या ह्या पुस्तकात दिल्या आहेत. त्यामधून केवळ वैज्ञानिक कल्पनांचा आनंद घ्यावा. शास्त्रीय ज्ञान ग्रहण करण्यासाठी शास्त्रीय संशोधनात्मक साहित्य असतेच.

विज्ञान कथांचे हे विश्व पुष्कळसे भविष्यातील गूढ, अनाकलनीय आणि विस्मयकारी वैज्ञानिक कल्पनांचे जाळे निर्माण करते आणि त्यांचे खरे स्वरूप मात्र 'कळे आकळे रुप ते ज्ञान होता' अशी अवस्था आली की समजते. गगनाला गवसणी घालण्याची साहित्यिक ऊर्मी ही वैज्ञानिक कथांमधून अंशत: पूर्ण होते. वाचकांनाही त्याच भूमिकेतून ह्या विज्ञानकथांचा निखळ आनंद मिळावा, एवढीच अपेक्षा!

# वर्क लेस, डू मोअर



जॅन येगर यांनी न्यू यॉर्कच्या सिटी युनिव्हर्सिटीतून समाजशास्त्र या विषयात पीएच.डी. केली आहे. त्या राष्ट्रीय वक्ता संघाच्या सदस्य आहेत. ज्यांना भरपूर प्रशंसा लाभली आणि पुरस्कार मिळाले अशा २५ पुस्तकांच्या त्या लेखक आहेत. त्यांच्या या पुस्तकांचा बारापेक्षा जास्त भाषांमध्ये अनुवाद झाला आहे. त्यांची ही पुस्तकं नामवंत प्रकाशनांनी प्रकाशित केली आहेत. याखेरीज 'द न्यू यॉर्क टाइम्स', 'रेडबुक' यांसारख्या प्रकाशनांमधून त्यांचे २५०पेक्षा जास्त लेख प्रसिद्ध झाले आहेत. कामाच्या ठिकाणी असलेले परस्परसंबंध, वेळेचं व्यवस्थापन आणि मैत्री  ही त्यांची अधिकार क्षेत्रं आहेत. त्या संदर्भात विविध टीव्ही चॅनल्सवर त्यांच्या मुलाखती झाल्या आहेत. तसेच या विषयांवर त्यांनी वृत्तपत्रं आणि मासिकांतून विस्तृत लेखन केलं आहे. या विषयांना मध्यवर्ती ठेवून त्यांनी परिसंवाद घेतले आहेत आणि सरकारी, सामुदायिक क्षेत्रांतील लोकांसमोर त्यांनी या संदर्भात व्याख्यानंही दिली आहेत.




लेखक
**जॅन येगर, पीएच.डी.**

अनुवाद
**दिलीप राजाराम गोगटे**

*एक प्रकार नव्यानेच वाढीला लागला आहे. त्याचे नाव विचलन. एखाद्या माणसाचे लक्ष त्याच्या मूळ मुद्द्यापासून विचलित होऊन अन्य कमी महत्त्वाच्या बाबींकडे वळते. उदा. कामात व्यग्र असतानाच सतत ई-मेल्स पडताळत राहणे, बैठका चालू असताना मोबाईल कॉल स्वीकारणे, तसेच इंटरनेटवर उगीचच अंतहीन सर्फिंग करत राहणे इत्यादी. त्यामुळे मूळ काम बाजूला राहाते. परिणामी, कामाचे तास वाढलेले असूनही कामावर लक्ष केंद्रित न होण्यामुळे अपेक्षित रिझल्ट्स वेळेत मिळत नाहीत. साहजिकच तणाव पातळ्यांमध्ये धोकादायक वाढ होत आहे. त्यामुळे आता आपण वेळेचे अधिक प्रभावी नियंत्रक बनणे गरजेचे आहे. विचलकांचा प्रभावी मुकाबला करण्याची आपली जबाबदारी वाढलेली आहे आणि हे भान आपणास आतूनच यायला हवे. हे पुस्तक तुम्हाला ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, वाढलेल्या वेळात कामासाठी, सहसंबंधांसाठी आणि तंत्रविषयक दडपणांचा मुकाबला करण्यासाठी प्रभावी, उपयुक्त साधने देईल.*

**उद्दिष्ट निश्चिती**


तुम्ही कामात गर्क आहात. हे अगदी खरे! पण तुम्ही 'चांगल्या' कामात गर्क आहात काय? तुम्ही आजची, या आठवड्याची, या महिन्याची, या वर्षाची किंबहुना येत्या पाच - दहा वर्षांची उद्दिष्टे नक्की करण्यासाठी पुरेसा वेळ वा कष्ट घेतले नसतील तर तुम्ही कोणत्या चांगल्या कामात व्यग्र होतात हे तुम्हाला कसे कळणार? कोणत्या वेळी काय करायचे व आपल्या प्रत्येक क्षणाचे काम नक्की करणे म्हणजे आपली 'उद्दिष्ट निश्चिती.'

वर्तनविकासामध्ये सामर्थ्यपूर्ण उद्दिष्ट निश्चितीला अतिशय महत्त्व आहे. त्याची अनेक उदाहरणे देता येतील. हर्स्ट न्यूजपेपरचे कार्यकारी, बॉब डँझिग, जे प्रेरक वक्ते आणि लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत, त्यांनी आपल्यामधील कार्यकारी अधिकारी विकसित होण्यामध्ये, त्यांच्या लहान वयात झालेल्या संस्कारक्षम उद्दिष्ट निश्चितीने कशी मदत केली, त्याबद्दलचे मनोगत व्यक्त केले आहे. ''सामाजिक कार्यकर्त्या बाईंनी त्यांच्या प्रत्येक भेटीत 'तू निश्चित मूल्यवान आहेस' हे लहानग्या अकरा वर्षांच्या बॉबच्या मनावर ठसविले. या तीन शब्दांनी, त्या छोट्या जिवाला आपण आयुष्यात किती मोठे होऊ शकतो, याबद्दलची पहिली जाणीव करून दिली. मी त्यांचे ते शब्द, म्हणजे उद्दिष्टे कधीच विसरू शकलो नाही. अगदी लहान वयात मी अल्बानी येथील 'टाईम्स युनियन'मध्ये ऑफिसबॉय म्हणून माझी नोकरी सुरू केली तेव्हासुद्धा या शब्दांनी मला साथ दिली. मी प्रकाशक झालो तेव्हाही त्यांचे उद्दिष्टांना साद घालणारे शब्द माझ्यासोबत होते आणि हर्स्ट न्यूजपेपर्सच्या राष्ट्रस्तरीय मुख्य कार्यकारी अधिकारीपदाची वीस वर्षे धुरा सांभाळतानासुद्धा त्याच शब्दांनी मला सतत प्रेरणा दिली. लहान वयात पेरलेल्या उद्दिष्टांच्या बीजाचे पुढे जीवनभर फुलणाऱ्या बागेत रूपांतर होऊ शकते.''

उद्दिष्टे, माणसाचा वेळ खर्च करण्याच्या पद्धतीला आकार देतात. त्याचे आणखी एक उदाहरण म्हणजे लहानपणापासून मित्र असलेली तीन मुले (न्यूजर्सीच्या दुर्गम अशा भागातली) असे निश्चित करतात की, मोठेपणी आपण मेडिकल कॉलेज वा डेंटल कॉलेजमध्येच शिकायचे.

**नवं कोरं**

# सर्जा




लेखक

**रामचंद्र खाटमोडे**

**किंमत : १५०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

शेपटी नसलेला सर्जा
धावत राहतो रस्त्यावर
भर उन्हात, मिळेल ती सावली घेत...
अंगात बळ नसतानाही तो फोडत राहतो हंबरडा
त्याच्या अस्तित्वाचा...
आठवणीच्या शेतातून
दु:खांना पायदळी तुडवत
तो काढत राहतो वाट...
धावत राहतो एका आशेने
की सुखाचं गाठोडं सापडेल त्याला कुठेतरी
जिथे खिलारी त्याची वाट पाहत बसली असेल...

एकमेकांना स्फूर्ती देत, त्यांचे हे 'उद्दिष्ट निश्चित करणे', सेटॉन युनिव्हर्सिटीच्या एका भरती अधिकाऱ्याच्या प्रेरणेमुळे कसे जागे होते, याचे अत्यंत तपशीलवार वर्णन त्यांनी लिहिलेल्या 'द पॅक्ट' नावाच्या बेस्टसेलर पुस्तकात केलेले आहे. या पुस्तकाचे सहलेखक सॅम्पसन डेविस आणि रामेक हंट हे पुढे डॉक्टर झाले तर तिसरे सहलेखक जॉर्ज जेंकिन्स हे डेंटिस्ट झाले. या तिघांनी आपल्या उदाहरणामधून आपण समान उद्दिष्ट साकारून, आपले ध्येय कसे प्राप्त केले ते सांगून अनेकांना प्रेरणा दिली आहे.

**उद्दिष्ट निश्चितीची मूलतत्त्वे :**
**उद्दिष्टे का निश्चित करावीत?**

गेल्या काही काळात तुम्ही उद्दिष्टानुगामी नसाल तर तुमच्या व्यक्तिगत वा करिअरविषयक आकांक्षांबद्दल पुनर्विचाराची गरज आहे हे नक्की. उद्दिष्ट निश्चिती आणि नियोजन या दोन गोष्टी उच्चतम वेळ व्यवस्थापनाच्या मूलतत्त्वांपैकीच आहेत. तुम्हाला अधिक चांगल्या नियोजनासाठी उद्दिष्टांची खूप गरज असते. चांगल्या योजनेमुळे तुमची कार्यक्षमता वाढते आणि परिणामही जास्त चांगले मिळतात.

मर्फीच्या नियमांबद्दल आपण नेहमी ऐकतो. या नियमांत असे म्हटले आहे की, जर एखादी गोष्ट चुकीची घडणार असेल, तर ती तशी घडणारच. उद्दिष्ट निश्चिती आणि नियोजन याचा अर्थ असा नव्हे की, तुम्ही सर्व जगावर नियंत्रण करू शकता, अथवा तुमच्या केलेल्या कृतीच्या किंवा सहकाऱ्यांच्या कृतींच्या परिणामावर नियंत्रण ठेवू शकता. तथापि, तुम्ही दिशा आणि धोरण नक्की केले असेल तर तुमचे उद्दिष्ट पूर्ण होण्याची शक्यता मात्र वाढते.

उद्दिष्ट निश्चितीमुळे तुम्हाला कोठे जायचे ते कळते. आपल्या कामात अथवा फुरसतीसाठी उद्दिष्टांची गरज असते. उद्दिष्ट नसेल तर तुमच्या संधी आणि समस्या यांना चुकीच्या पद्धतीने सामोरे जायची पाळी येते आणि गडबड-गोंधळाची शक्यता वाढते; त्यामुळे तुमच्या वैयक्तिक अथवा व्यावसायिक आयुष्यावर वाईट परिणाम होण्याची शक्यता असते.

तुमच्यासमोर किती उद्दिष्टे असावीत? एक, दोन वा तीन? एकाच वेळी

तुम्ही किती उद्दिष्टे हाताळू शकता, पेलू शकता? माझी एक विद्यार्थिनी होती. वय अंदाजे वीस वर्षे. एका प्रकाशन संस्थेत पूर्णवेळ काम करत होती. एका व्यावसायिक वाद्यवृंदामध्ये यश मिळवायचे तिचे उद्दिष्ट होते. त्याचबरोबर रात्रीच्या कॉलेजमध्ये शिकून पदव्युत्तर शिक्षणही तिला घ्यायचे होते. ती विचार करत होती की, कोणत्या उद्दिष्टाचा पाठपुरावा करावा. ती अविवाहित होती. अर्थात तिला मित्र होता आणि तिच्यावर कुणीही अवलंबून नव्हते. मी तिला पटवून दिले की, तिच्या वयाचा आणि परिस्थितीचा विचार करता तिन्ही उद्दिष्टांसाठी एकत्र काम करणे अत्यंत योग्य होते. तिच्या वयाच्या इतर मुली एकाच उद्दिष्टाकरिता काम करताहेत का याचा तिच्याशी काही संबंध नव्हता. भले त्या नोकरी करत वा शिक्षण घेत असतील. कारण ती स्वत: अनावश्यक ताणाशिवाय तिन्ही गोष्टी समर्थपणे पेलू शकत होती. सुदैवाने पदव्युत्तर शिक्षणाची डिग्री मिळवणे, ही या तीन उद्दिष्टांपैकी एक गोष्ट ती वर्षभरातच पूर्ण करणार होती; त्यामुळे उरलेल्या दोन उद्दिष्टांसाठी पुरेशी शक्ती आणि वेळ देणे तिला सहज शक्य होते.

अटलांटा लाईफ फायनान्शियल ग्रुपचे अध्यक्ष रोनाल्ड डी. ब्राऊन यांनी त्यांच्या एका मुलाखतीमध्ये असे सांगितले की, तुमच्या वेळेचा उचित वापर करण्यासाठी तुम्हाला काय करण्याची आवश्यकता आहे त्याचे सुस्पष्ट आकलन व्हायला हवे.

ते म्हणतात, काही लोकांच्या बाबतीत, काय महत्त्वाचे व काय नाही हे ठरविण्याची अक्षमता किंवा अनिच्छा असते. ते 'मी कामात बुडालो आहे' या सापळ्यात अडकतात. खरे तर 'मी कामात योगदान देतो आहे' असे चित्र हवे.

कामात बुडालेल्या सर्वांच्या बाबतीत हे खरेच आहे आणि त्यांनी किती काम केले हा प्रश्न असतोच. कारण त्यांचे काम प्रभावी आणि योग्य नसते. ई-मेलचा सर्व कारभार असाच असतो. त्याबद्दल 'मला रोज दीडशे मेल येतात आणि रोज रात्री निजण्यापूर्वी मी त्या सगळ्यांची उत्तरे पाठवतो' अशा वक्तव्याबद्दल माझा टाचणी लावणारा प्रश्न असा की, ''मग त्यात काय? तुमचे कार्यउद्दिष्ट साधण्याच्या कामात तुम्ही काही प्रगती केली आहे का?''

**दीर्घकालीन उद्दिष्टांची निश्चिती करणे**

वेळ व्यवस्थापनातली सर्वांत महत्त्वाची पायरी दीर्घकालीन उद्दिष्टे निश्चित करणे ही असते. प्रख्यात वक्ते ब्रायन ट्रेसी यांनी त्यांच्या 'उद्दिष्टे निश्चितीच्या पाच पायऱ्या' या लेखात म्हटल्याप्रमाणे ''यशस्वी जीवनाचे सार उद्दिष्टे निश्चित करणे यातच असते; त्यामुळे आपण आपल्या भविष्याचे नियंते असल्याची भावना होते. तुम्ही आता कुठे आहात आणि कुठे जायचे आहे, याचा विचार करा. सुस्पष्ट उद्दिष्टांमुळे तुम्ही तुमच्या स्वप्नांकडे एखाद्या बाणाप्रमाणे सरसरत सरळ झेपावता.''

पुढची तितकीच महत्त्वाची पायरी म्हणजे ती उद्दिष्टे लिहून काढणे ही होय. त्यांचे कागदावर लेखन करण्याने (किंवा तुम्ही संगणक अथवा तत्सम इलेक्ट्रॉनिक उपकरण वापरत असल्यास त्यावर नोंद करण्याने) तुम्ही त्यांच्या प्रती तुमची निष्ठा प्रतीत करत ती पक्की करता. तुम्ही जर संगणकावर उद्दिष्टे नोंदली असतील तर त्याची एक छापील प्रत तयार करा. उलट मी तर अशा जुन्या मताची आहे की, तुम्ही तुमच्या सोबत कागद फाडता येणार नाहीत अशी घट्ट पानांची वही ठेवा. तुमच्या दीर्घकालीन उद्दिष्टांची यादी दिनांकित करा. त्याचा उपयोग या उद्दिष्टांचा वारंवार आढावा घेण्यासाठी होईल.

जर तुम्हाला आवडत असेल तर दर ३१ डिसेंबरला वर्ष संपताना किंवा तुमच्या वाढदिवशी तुमच्या उद्दिष्टांचा आढावा घेण्याचे ठरवा. या आढाव्यात, आपण दीर्घकालीन उद्दिष्टे साधण्याच्या मार्गावर योग्य वाटचाल करतो का? आपण त्या उद्दिष्टांचे पुनर्मूल्यांकन केले आहे का? त्यांपैकी काही उद्दिष्टांमध्ये बदल करायचा आहे का? या मुद्द्यांवर गांभीर्याने विचार करा.

या विभागाच्या शेवटी दीर्घकालीन उद्दिष्टांसाठी, व्यावसायिक आणि वैयक्तिक अशा दोन याद्या दिल्या आहेत. त्या तुम्ही भरायच्या आहेत. तुमच्या व्यावसायिक महत्त्वाकांक्षांमध्ये, येत्या पाच वर्षांत पुन्हा शिक्षण सुरू करून पुढची पदवी प्राप्त करणे किंवा येत्या दहा वर्षांत आपल्या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारीपद मिळवणे अशा उद्दिष्टांचा समावेश होऊ शकतो. पुढच्या वर्षात एखाद्या क्षेत्रातील तज्ज्ञता प्रमाणपत्र मिळविणे अथवा एका विशिष्ट प्रमाणापर्यंत आपली विक्री वाढवणे असाही विचार होऊ

शकतो.

तुमच्या वैयक्तिक उद्दिष्टांमध्ये निवृत्ती वयाचे पुनर्विलोकन करणे, निवृत्ती वयातील सुरक्षा नियोजन करणे अथवा वर्षभरात स्वत:चा बुक-क्लब सुरू करणे किंवा पुढील महिन्यापासून दर आठवड्यात किमान तीन वेळा व्यायाम करणे अशांचा समावेश होऊ शकतो. मात्र, तुमच्या दीर्घकालीन उद्दिष्टांचे लेखन अगदी नि:संदिग्ध शब्दांत करायला पाहिजे. विधाने लिहिताना 'मला श्रीमंत व्हायचं आहे', 'मला लोकप्रिय व्हायचं आहे' किंवा 'मला अधिक कल्पक व्हायचं आहे' असे संदिग्धपणे लिहिणे टाळावे. निश्चित स्वरूपात उद्दिष्टे ठरवण्यामुळे तुम्ही त्याच्या पायऱ्या ठरवू शकता.

◆


## टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील. या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

**टी बुक क्लब योजनेतील'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹१०० भरून उपलब्ध असलेल्या कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. सर्व पुस्तकांसाठी एकूण पोस्टेज ₹ १३५० राहील किंवा आठ पुस्तकांसाठी पोस्टेज ₹ १२५.


इतर कोणत्याही पुस्तकांवर २०टक्के सवलत मिळवा.

# प्रेमकथा



ॲनी झैदी या भारतीय लेखक आहेत. त्यांचा जन्म १९७८मध्ये झाला. त्यांनी अजमेरच्या सोफिया कॉलेजमधून बी.ए. ही पदवी प्राप्त केली. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात पत्रकार म्हणून केली. मिड डे, फ्रंटलाइनसारख्या आघाडीच्या वृत्तपत्रांमधून आणि मासिकांमधून त्यांनी काम केलं. त्यांच्या 'टर्फ : बॅन्टरिंग विथ बॅन्डिट्स ॲन्ड अदर ट्रू टेल्स' हे निबंधाचं संकलन (संयुक्त), 'द गुड इंडियन गर्ल' हा लघुकथासंग्रह (संयुक्त), तसेच 'क्रश' हा कवितासंग्रह (संयुक्त), 'गुलाब' ही कादंबरी, 'जाल' हे नाटक, 'सो मेनी सॉक्स' हे इंग्रजी नाटक अशी त्यांची साहित्यसंपदा आहे. 'मेटा' (२०१२) हा प्रतिष्ठेचा पुरस्कार, 'नेम, प्लेस, ॲनिमल, थिंग' या संहितेसाठी हिंदू मेट्रोप्लस प्लेराईट ॲवॉर्ड (२००९), 'जॅम' या नभोनाट्यास बीबीसीच्या आंतरराष्ट्रीय नाट्यलेखन स्पर्धेत विजयी होण्याचा मान (२०११), व्होडाफोन क्रॉसवर्ड बुक ॲवॉर्ड (२०१०) इ. सन्मान त्यांना लाभले आहेत. 'एक रेड कलर की लव्ह स्टोरी' आणि 'एक बहुत छोटीसी लव्ह स्टोरी इन हर वर्ड्स' हे त्यांनी दिग्दर्शित केलेले दोन लघुपट आहेत.

'एक बहुत छोटीसी लव्ह स्टोरी इन हर वर्ड्स' हे त्यांनी दिग्दर्शित केलेले दोन लघुपट आहेत.




लेखक
**अॅनी झैदी**

अनुवाद
**मुग्धा शुक्रे**

*लवकरच हे सगळं संपेल. हे सगळं इतक्या लवकर होईल, असा विचार तिने कधीच केला नव्हता. हा नाही-तरी दुसरा नेहमी तिच्या मनात यायचा. रात्री तो उशिरा घरी आला. त्याच्या चेहऱ्यावरचं हसू– खोटं-खोटं हसणं. वास्तवात ते नाहीच आहे. असं झालं तर काय होईल? किंवा त्याच्या मीटिंग्ज खूप उशिरापर्यंत लांबू लागल्या आहेत किंवा तिला टाळण्यासाठी तो बाल्कनीत जाऊन फोनवर बोलू लागला आहे. किंवा तिने शहराबाहेरच्या टेकडीवर एक काचेच्या भिंती असलेलं घर बांधलं आणि तिथल्या बेडरूमला लावायच्या पडद्यांचा पोत कसा असेल याबद्दल ती अखंड बोलत असताना तो तिच्यावर खेकसला आणि त्याने त्या घराचा चक्काचूर केला, तर? तर, ती काय करेल?*

*लांबच्या लांब दुपारी ती एकटी पडलेली असायची तेव्हा, जेव्हा ती बेडशीट्स बदलायची कव्हर्स घड्या घालून ठेवायची तेव्हा, किंवा टीव्हीवरची धूळ झटकायची, लायब्ररीतून डीव्हीडी येऊन यायची तेव्हा... तिने या सगळ्या शक्यतांचा विचार केला होता. पण अशा रेंगाळत राहणाऱ्या, सत्यानाश करू शकणाऱ्या पर्यायाचा तिने कधीच विचार केला नव्हता.*

# ती जी लाटांबरोबर वाहत गेली

तो त्या बंगलीबाहेर उभा राहतो. बाल्कनीतून खाली पाहणारं तिथं कोणीही नव्हतं. काल रात्री ते तिघे तिथे होते. तपकिरी, तेलकट, अंधुक चेहरे. खेड्यातल्या त्या कंटाळवाण्या रात्रीने इस्त्री केल्यासारख्या सगळ्या सुरकुत्या गायब झालेल्या दिसत होत्या. त्या दोघांच्यामध्ये ती उभी होती. हसत-हसत चांदण्यांचं निरीक्षण करत होती. खास एखाद्या गोष्टीमुळे नाही, पण एकंदरीतच ती खूश होती.

तो जाणून होता– हे सगळं इतकं साधं-सरळ, इतकं निष्पाप नाहीये. तसंही ते आत्तापर्यंत कधी होतं?

अर्थातच, ती निष्पाप होती. अर्थात. ती काय बरं नव्हती... त्याला नेमका शब्द माहीत नव्हता. असंवेदनशील नाही, अव्यवस्थित नाही, अप्रामाणिक... अशक्त, उतावीळ नाही. हट्टी नाही. प्रामाणिक, मोकळ्या स्वभावाची नाही.

त्याच्या मनातल्या यादीपैकी ती जे-जे काही नव्हती, त्या सर्व विशेषणांवर तो फुली मारत होता; परंतु ती त्याला फसवतही नव्हती. या गोष्टीबाबत त्याची खात्री होती. जेव्हा तुमच्याकडे फक्त आशेचा एखादा किरण शिल्लक असतो, तेव्हा जेवढी खात्री असते, तेवढीच त्याला वाटत होती. या जगात देव आहे का? ती विश्वासू आहे ना? जे स्मगलर्स त्यांच्या आईच्या कुशीत प्राण सोडतात, त्यांना भरपाई मिळते का? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं कोण देऊ शकेल?

हे अवघड प्रश्न त्याला इथे घेऊन आले नव्हते. तिच्या मागोमाग ही समुद्राकाठची काळी रेती तुडवत तो थेट पॅराबेलला आला होता. फेरीबोटने इथे यायला तासापेक्षा कमी वेळ लागला होता आणि फक्त साठ रुपये भाडं लागलं होतं. घालवलेला वेळ किंवा खर्च केलेले पैसे याबद्दल त्याची काहीच तक्रार नव्हती, पण त्याला असं समुद्र ओलांडायला आवडायचं नाही.

गेले बारा महिने ती त्याच्याकडे समुद्राचं गुणगान करत होती. त्याचं ते अमर्याद अस्तित्व, त्या काळ्या रेतीने दिलेला विश्वास, त्या रेतीचा मऊशारपणा– जो ओलसर आंतरत्वचेसारखा मऊ आहे– त्यामध्ये तिला स्वत:ला बुडवून घ्यायचं होतं. रंग बदलणाऱ्या सरड्यासारखे पाण्याचे

बदलणारे रंग तिच्या इच्छांचे प्रतीक होते.

माझ्यासाठी रेतीचा तो किनारा होता आणि मी तुझ्यासाठी साता समुद्रापार धावत येईन... ती म्हणायची. एखाद्या सकाळी ती त्याच्या कानात गुणगुणायची–'सात समुंदर पार मैं तेरे पीछे पीछे आ गयी....'

सात समुद्र ओलांडून मी तुझ्याकडे धावत आले... फरक एवढाच होता, तिने इथे येण्यासाठी कोणताही समुद्र ओलांडला नव्हता.

कधी कधी ती त्याच्या खांद्यावर डोकं टेकवून म्हणायची– आपण एकमेकांसाठी तसे होऊ या, जसे समुद्र आणि रेती एकमेकांसाठी असतात. जेव्हा तिला त्याला चिडवावंसं वाटे तेव्हा ती ते गाणं म्हणायची– ज्यामध्ये समुद्रकिनारी मला एक बंगला हवाय किंवा एखादी झोपडी तरी– असं काहीसं होतं. ती म्हणायची, पॅराबेलला आहे तसं कॉटेज असायला हवं.

जेव्हा तिला पहिल्यांदा शहरात आणलं होतं, तेव्हा ती रडली होती. त्यांच्यासमोर नाही. त्यांनी तिला तिथे राहू द्यावं, ही तिची गरज होती. त्यांनी त्या गावातल्या बंदिस्त बालपणीच्या दु:खांपासून तिला दूर नेण्याची गरज होती तशीच, त्याचं बालपणही त्याच ठिकाणी गेलेलं होतं. ते दोघेही एकमेकांना ओळखत नसले, तरी ते दोघे एकाच जिल्ह्यात लहानाचे मोठे झाले होते.

तो तिच्या बालपणाविषयी कल्पना करू शकत होता. खास मुलींना म्हणून जी भीती वाटते, जे दु:स्वप्न त्या सतत पाहतात की– त्या सध्याच्याच छोट्याशा, पर्यटनस्थळ असलेल्या गावात बंदिस्त झाल्या आहेत– ते तो समजू शकत होता. सगळ्यात छोट्या शहरांना हे खास दु:ख लागू होतं. तिथल्या स्थानिक लोकांचं दु:ख– जे पर्यटकांना त्यांच्या गावात सुटीसाठी आलेले पाहतात. इतर लोक तिथे येतात ते तिथला इतिहास, तिथलं सौंदर्य यांसारख्या गोष्टींसाठी किंवा कदाचित आणखी काही तरी मोठ्या गोष्टींच्या शोधात; ज्यामुळे त्यांच्या जगण्याला, त्यांच्या आहार व सेक्समधील मौजमजेला नवा आनंद मिळेल. परंतु जे तरुण या गावामध्ये लहानाचे मोठे झालेले असतात, त्यांच्यासाठी इथं दु:खाव्यतिरिक्त दुसरं काहीच नसतं. ते कुठेही जाऊ शकत नाहीत आणि इतरांसाठी मात्र तिथून निघून जाणं किती सोपं वाटत राहतं.

ते लोक नेहमीच येत-जात राहतात. हे खूप त्रासदायक असतं. त्याने तो

त्रास अनुभवला होता.

पण त्याने फार कमी प्रमाणात अनुभवला होता. तिथून सुटका करून घेण्यासाठी त्याला एक निमित्त तेवढं हवं होतं. 'घरी राहण्याने काही साध्य होणार नाही' हे पटवून देऊ शकेल, असा एखादा क्षण त्याला पुरेसा होता. मुलींबाबत हीच गोष्ट वेगळी असते. दुसरं कोणी तरी इथं येऊन त्यांना घेऊन गेल्याशिवाय त्यांना हे ठिकाण सोडता येणार नाही, हे त्या जाणून असतात आणि ही जाणीवच फार त्रासदायक असते. तिलाही नक्कीच या चिंतेने सतावलं असणार.

यदाकदाचित तिचं लग्न याच शहरात झालं, तर ती इथून कधीही जाऊ शकणार नाही.

तिने त्याला सांगितलं होतं हे– एखादा अनोळखी माणूस तिचा नवरा म्हणून तिच्याकडून प्रेम आणि निष्ठेची मागणी करेल याची तिला भीती वाटायची. तिला मोठ्या शहरात जायचं होतं– जिथं सगळ्या जगाचं दुःख तुमच्यावर येऊन आदळतं, वेदनेच्या काळ्या लाटांवर स्वार होऊन; ज्या नंतर तुमच्या पायाशी विरघळून जातात.

ते शहर– जिथं दुःखाला सौंदर्याचा साज चढवला जातो– एवढं सुंदर बनवून सादर केलं जातं की, त्या सादरीकरण तुमची आठवड्याची कमाई स्वेच्छेने तुम्ही खर्च करता. गुणगुणावीशी वाटणारी गाणी, संगीत, राजसी रंग आणि रेखीव शरीरांनी दुःखाला सुशोभित केलं जातं– अशा शहरात तिला राहायचं होतं. ते शहर– जिथं दुःखी होण्याचं कोणालाच दुःखं वाटत नव्हतं, कारण दुःखात अडकून पडण्याएवढा वेळ किंवा तेवढा अवकाश त्यांच्याकडे नव्हता. असं शहर– जिथे तुम्ही नीटनेटक्या वेणीतली जाईची फुलं फेकून देऊन तुमचे विस्कटलेले, न विंचरलेले केस तसेच कंबरेपर्यंत नितंबावर रुळणारे असे मोकळे सोडू शकता.

अशा केसांतून कंगवा फिरवणारी दासी व्हायलादेखील तिला आनंदानं आवडलं असतं. दाट काळे केस– एखाद्या फिल्मस्टासारखे. ती फिल्मस्टार होऊ शकणार नाही– हे ती जाणून होती. लाखो लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारं हसू तिच्याजवळ नव्हतं किंवा तिचं मोडकं दुःखं लाखोंना वेडं बनवू शकत नव्हतं. ठीक आहे. तिची तक्रार नव्हती. तिला फक्त या शहराच्या कुंपणावर आसरा हवा होता, जिथून ती या सिताऱ्यांना चमकताना

**नवं कोरं**

# घाचर घोचर

लेखक
**विवेक शानभाग**

अनुवाद
**अपर्णा नायगांवकर**




**किंमत : १५०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

मुंग्यांचा बेसुमार त्रास असलेल्या घरातून मध्यमवर्गीय, सुरक्षित घरात जाण्याचं एका एकत्र कुटुंबाचं स्वप्न साकार होतं; पण नवीन घरात गेल्यावर भावनिक समीकरणं बदलतात. पूर्वी खऱ्या अर्थानं एकत्र नांदणारं हे कुटुंब भावनिकदृष्ट्या दूर व्हायला लागतं. या कादंबरीच्या अस्वस्थ निवेदकाची बायको त्याला सोडून निघून जाते. या सगळ्या बदलत्या परिस्थितीकडे तो हतबुद्धपणे पाहत राहतो. पैशाची अभिलाषा कुटुंबनाशाला किंवा नात्यांमधील दुराव्याला कशी कारणीभूत ठरते, त्याचं हे प्रातिनिधिक चित्र 'घाचरघोचर'मधून प्रभावीपणे समोर येतं. अस्वस्थ निवेदकाच्या प्रवाही निवेदनातून 'घाचरघोचर' या शब्दाचा अर्थ उलगडत जातो.

पाहणार होती. कोणाला तरी चमकताना पाहणं, खुला समुद्र, त्याच्या उसळत्या लाटा पाहणं हे तिला हवं होतं.

तिच्या जुन्या, प्राचीन, भूवेष्ठित शहरातल्या काळ्या भिंती न्याहाळणं; ज्या ठिकाणाबद्दल फक्त पर्यटकांनाच उत्सुकता असू शकते अशा ठिकाणी राहणं तिला नको होतं.

तेवीस वर्षं... ती काही तरी घडण्याची वाट पाहत होती. तिने त्याला सांगितलं होतं हे– मी आतल्या आत शुष्क होत चालले होते. आतल्या आत मरत होते. पण एके दिवशी ते आले. ते– ज्यांना त्यांच्या पहिल्या मुलाच्या मागोमाग लगेचच, खूपच लवकर दुसरं मूल झालं होतं. तिचं गाव हे त्यांचंही मूळगाव होतं. म्हणूनच ते त्यांच्या आजीला भेटायला आले होते. त्यांना मदत हवी होती. अशा मदतीवाचून दोन मुलांना वाढवताना त्यांचा जीव मेटाकुटीला आला होता.

कोणत्या तरी लहानसहान देवाने तिची ही प्रार्थना ऐकली असावी, जिचा मोठ्याने उच्चार करण्याचं धैर्यदेखील तिच्याजवळ नव्हतं. हजारो गरीब एकेकट्या स्त्रिया– ज्यांना मुळाक्षरांचं ज्ञान आहे आणि शंभरपर्यंत मोजता येते, अशा स्त्रियांमधून त्यांनी तिची निवड केली होती.

आणि त्याचा स्वत:चा देवदेखील नक्कीच त्याचं मागणं ऐकत असावा. त्यामुळेच तिला त्याच्या अपार्टमेंट संकुलात आणलं गेलं होतं, जिथे तो गेली कित्येक वर्षं काही तरी चांगलं घडण्याची वाट पाहत होता. शहरात लाखो पुरुष होते, पण नियतीने तिच्यासाठी त्याची निवड केली होती.

तिला त्याच्या जवळ आणलं गेलं, असं म्हणायला तिला आवडायचं. जणू काही समुद्रावरील वाऱ्याच्या झुळुकांनी तिच्या काखेतून हात घालून तिला वर उचललं होतं आणि तिच्या बाहूंचं पंखात रूपांतर केलं होतं.

परंतु पहिल्यांदा इथे आली, तेव्हा ती रडली होती. रात्री स्वयंपाकघरातल्या फरशीवर कॉयरचा बिछाना घालून ती पडली होती. रस्त्यावरचा प्रकाश स्वयंपाकघरात झिरपत होता. जणू बंद न करता येणारा रात्रदिवाच लावून ठेवलाय! ते तिला स्वयंपाकघरात पडदे लावू देणार नाहीत, तसंच तिला बैठकीच्या खोलीत झोपायचीही परवानगी देणार नाहीत. तिथे त्यांची स्वयंपाकीण झोपत होती. गेली तेरा वर्षं ती तिथं झोपत होती आणि त्या वृद्ध स्त्रीची जागा बदलणं शक्य नव्हतं. शिवाय प्रत्येक रात्री

फर्निचर हलवून पुन्हा सकाळी जागेवर ठेवायचं– ज्यामुळे तिच्यासारख्या नव्या व्यक्तीला तिथे झोपायला जागा होईल, हेही त्रासदायक होतं.

तिला कशी तरी प्रयत्नपूर्वक उचलता येईल अशी जड गादी दिली गेली होती आणि स्वयंपाकघरात झोपायला सांगण्यात आलं होतं.

त्यामुळेच ती रडत होती. कारण शहरातले चमकदार दिवे रात्रभर प्रकाशमान असत आणि त्या प्रकाशामुळे ती झोपू शकायची नाही. एके रात्री ती दमणुकीने गलितगात्र, थरथरत बिछान्यावर उठून बसली. स्वयंपाकघरातली ती चकचकीत शांतता सहन होईना, म्हणून हळूच बाहेर जिन्याजवळ आली. जिन्याखाली बसून अनावर हुंदके देत स्फुंदून रडू लागली. त्याने तिला पहिल्यांदा पाहिलं ते या अशा अवस्थेत.

हे नक्कीच विधिलिखित असावं. तो ‘मंगल पांडे’ सिनेमाचा रात्रीचा शो पाहून येत होता. तो स्वत: पांडे असल्याने त्याने तो पाहायलाच हवा, असं त्याला वाटलं होतं. सिनेमा खूपच मोठा होता. त्याने जेव्हा जिन्याजवळ त्या मुलीला अंगाचं मुटकुळं करून रडताना पाहिलं, तेव्हा जवळजवळ रात्रीचे दोन वाजले होते. क्षणभर त्याला त्याच्या कल्पनाशक्तीचे खेळ वाटले. सिनेमामधली विधवा अशीच रडत होती ना– गुडघे छातीजवळ घेऊन, स्फुंदून, नाट्यमय हुंदके देत.

परंतु जेव्हा तो तिच्याजवळ गेला, तिच्याशेजारी बसला आणि तिने तिचा चेहरा त्याच्याकडे वळवला; तेव्हा त्याच्या लक्षात आलं, तिचा चेहरा खरा आहे. त्याच्या कल्पनेचा आविष्कार नाहीये.

अशा पद्धतीने त्या दोघांची भेट झाली होती. एक मुलगी– जी रात्र खूप मोठी आहे, ती आली आहे ते शहरही खूप मोठं खूप चकचकीत आहे आणि शिवाय तिला तिथून परत घरी जाण्याचीही इच्छा नाहीये– या सगळ्या कारणांसाठी रडत होती.

त्यालाही पुन्हा घरी परत जायचं नव्हतं. तसंच तिनेही दुसरीकडे कुठे जावं, असं त्याला वाटत नव्हतं. इतकी वर्षं त्याला या दमट, माशांचा वास मारणाऱ्या शहरात का राहावं लागलं, हे आता कुठे त्याच्या लक्षात आलं. त्यांची भेट नियतीने ठरवलेली होती.

त्यानंतर एका आठवडी सुटीला त्या कुटुंबाने पॅराबेलची ट्रिप ठरवली. ते लोक तिलादेखील बरोबर घेऊन गेले. त्याच्यासाठी हा मोठा आघात होता.

त्याने विचार केला होता. हे कुटुंब दोन-तीन दिवसांसाठी बाहेरगावी जाईल आणि एक स्वयंपाकाच्या आजी सोडल्या तर घरी कोणीच नसेल. शेवटी तो आणि ती एकदाचे एका नीटस घरात एकांतात असतील. यावरून तीसुद्धा त्याला चिडवत होती. त्याला चांगलंच माहीत असलेलं गाणं त्याच्या कानात गुणगुणून– 'अकेली हूँ घरमें तू आजा बलमा...' सजणा, घरात मी एकटीच आहे, तू ये ना– अशा अर्थाचं ते गाणं.

परंतु हे सगळे बेत धुळीला मिळाले. त्यांना त्यांच्या सुटीच्या काळातदेखील तिची गरज होती. ते समुद्राच्या अगदी जवळ राहणार होते आणि त्यांच्या छोट्या मुलांवर लक्ष ठेवावं लागणार होतं.

तिला पोहता येत नाही– तिने प्रतिवाद केला होता. ते हसले होते. म्हणाले होते, तिला पोहायची गरज पडणार नाही. तिने फक्त मुलांवर लक्ष ठेवावे. वेळच्या वेळी त्यांना खाणं भरवावं. त्यांचे कपडे ओले झाले, रेतीने भरले, तर ते बदलावेत–एवढंच. तिनेही तिथं मजा करावी.


तिला नक्कीच मजा आली असावी. ती पॅराबेलहून परत आली तीच रेती, समुद्र आणि सूर्यप्रकाशाने भारलेली. ती परत आली होती तो दिवस त्याला आजही आठवतो आहे. ती जिन्याखाली अलगद आली होती, जिथे बांबूच्या चटईवर पडून तो तिची वाट पाहत होता. त्याने छातीपर्यंत पांघरूण ओढून घेतलेलं होतं. ती त्याच्या पुढ्यात बसली. त्याचे हात तिने तिच्या हातात घेतले. तिचे डोळे चमकत होते. जणू चांदणं झिरपून त्याचे थेंब तिच्या डोळ्यांच्या काठावर जमा झाले असावेत– शुद्ध चांदणं! तिने त्याला पॅराबेलबद्दल सांगायला सुरुवात केली तसा तिचा चेहरा आनंदाने खुलला होता.

त्याला वाईट वाटलं होतं. या उन्मुक्त आनंदात तिला गवसलेली सुटका त्याला घाबरवत होती. ती पॅराबेलहून परत आली, तेव्हापासून ती जास्त धीट झाली होती. बऱ्याचदा ती त्याच्या मांडीवर डोकं ठेवून चटईवर झोपायची. प्रेमाबद्दल बोलायची. झोके, कॉटेजेस, रात्रीच्या काळ्या अंधाराने भारलेल्या आणि छोट्या-छोट्या पांढऱ्या फुलांनी भरलेल्या बाल्कनीजबद्दल बोलायची. समुद्र, लाटांची गाज, पिवळी-काळी रेती याविषयी बोलायची.

एकदा ती त्याच्या कानात कुजबुजली होती– तू माझ्यासाठी खूप काही हो... प्रत्येक गोष्ट हो आणि कधीही निघून जाऊ नकोस. जाशील ते परत

**नवं कोरं**

# नाना आणि महादजी




लेखक

**कुंदन तांबे**

**किंमत : २००/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

...थोरल्या माधवराव पेशव्यांच्या सन १७७२ मधील अकाली मृत्यूमुळे मराठेशाहीवर पानिपतच्या पराभवापेक्षा मोठा घाव बसला. त्यातच नारायणरावांचा खून, राघोबादादांमुळे पडलेली फूट आणि इंग्रजांच्या कारवाया यामुळे मराठेशाही बुडणार असा रंग दिसू लागला.

– पण दोन व्यक्तींच्या असामान्य कर्तृत्वामुळे मराठेशाही वाचली आणि पुढे कळसाला पोहोचली. ही दोन कर्तृत्ववान माणसे म्हणजे नाना फडणीस आणि महादजी शिंदे!

या दोघांच्या संयुक्त कामगिरीचा मागोवा घेणारी ललित कादंबरी म्हणजे नाना आणि महादजी!

थोरल्या बाजीरावांवरील 'बाजी', तसेच 'त्राता', 'महाकवी कालिदास' या रसिक वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या कादंबऱ्या लिहिणारे कुंदन तांबे यांची ही ललित कादंबरी...

येण्यासाठीच. तू लाटांसारखा हो. तू एवढ्या कठोर आवाजात का बोलतोस? एवढा उतावीळ का होतोस? आपण कोणापासून पळून जाऊ शकतो? समुद्रापासून, रेतीपासून?

काही तरी अघटित होऊ घातलं आहे, या शंकेने तो ग्रासला होता. हे असं बोलायला ती कुठे शिकली असेल? तो नक्कीच गाण्यांचा परिणाम असणार. ती रेडिओचे शब्द उचलते. 'दर्या किनारे एक बंगला' आणि 'मुझको चाँद ला के दो, इडली डू इडली डू' आणि 'ये रातें, ये मौसम, नदी का किनारा...' हे सगळं बोलताना ती हसत असते. मग म्हणते, ठीक आहे. बंगला नसला तरी चालेल; फक्त मला पॅराबेलला मात्र घेऊन चल. फक्त आपण दोघंच, दुसरं कोणीही नाही.

तो तिला पॅराबेलला नेऊ शकत नव्हता. सुटीची ही मजा त्याला परवडण्यासारखी नव्हती. पाच वर्षांत एकदाच तो तिथून दुसरीकडे कुठे गेला होता, गोकर्णला. तो बसने गेला होता आणि तिथे २०० रुपये दराच्या एका स्वस्त, छोट्या हॉटेलात त्याने मुक्काम केला होता. आता तो म्हणतोय की, तो पैशाचा आणि वेळेचा अपव्यय होता. देवळं सोडली, तर तिथे पाहण्यासारखं काहीही नव्हतं. तिथे आलेल्या इतर लोकांना गर्जना करणारा समुद्र आणि समुद्रकिनाऱ्यावरील सोनेरी रेती पाहून खूप आनंद होत होता. समुद्र, रेती आणि तेथील परस्परांच्या सहवासात त्यांना तो गवसला होता. प्रत्येक जण कोणाबरोबर तरी आलेलं होतं, फक्त तोच तेवढा एकटा होता.

या गोष्टींनी काय फरक पडतो? सूर्यप्रकाश, पृथ्वीतलावर आढळणारे सूक्ष्मतम बदल, समुद्राची भरती-ओहोटी आणि लाटांनी पुन्हा उसळून काठावर येणं. तिथून जाणाऱ्या लोकांच्या ओठांना स्पर्शून घेण्यासाठीच जणू त्या अशा उसळत असतील. पण मग या सगळ्या गोष्टींमध्ये एवढं काय खास आहे?

तिथल्या जोडप्यांचा तर त्याला विशेष राग येत होता. एखाद्या बिनडोक रोमँटिक हिंदी सिनेमाच्या नायक-नायिकांप्रमाणेच ते वागत होते... परस्परांच्या कंबरेभोवती हात लपेटून. एकमेकांच्या शरीरावर रेलून चालणं, परस्परांवर पाणी उडवणं, पाण्यात खेळणं, बर्फाच्या रंगीबेरंगी कँडीज चोखत फिरणं. आणि तो? तो भटकत राहिला, आसपास सगळीकडे दिसणाऱ्या जोडप्यांकडे पाहत चालत राहिला. तिथपर्यंत, जिथे त्याच्या

पायांना थंडगार रेतीचा स्पर्श जाणवला. त्याला अद्यापही स्पष्ट आठवत होतं, त्याची पावलं शिंपल्यांना अडखळली होती. सोडून दिलेली घरं! मनात आलं होतं. कोणत्याही स्मरणचिन्हाशिवायची थडगी. त्याने, परत कधीही समुद्रकिनारी न जाण्याचा संकल्प तिथेच केला होता.

परंतु ती मात्र समुद्रकिनाऱ्यांनी भलतीच प्रभावित झाली होती. पॅराबेलमध्ये तिला असं सापडलं तरी काय, ज्यामुळे तिथे परत जाण्याची तिला आस लागावी? बारा महिने उलटून गेल्यानंतरही ती ओढ तिला अस्वस्थ करते आहे. तिच्या लाडे-लाडे बोलण्याची त्याला भीती वाटायला लागली आहे आणि ते कुटुंब आता पुन्हा पॅराबेलला गेलेलं आहे.

या वेळी ती स्वेच्छेने, आनंदाने त्यांच्याबरोबर गेलेली आहे. उत्सुकतेने, उड्या मारत आनंदाने तिने त्याला सांगितलं होतं– आम्ही जाणार आहोत, आम्ही पॅराबेलला जातो आहोत. ते मला पुन्हा तिथे घेऊन जात आहेत. या वेळी ती असंही म्हणाली नाही की, तिथं त्या दोघांनी मिळून जावं– एकट्याने, दुसऱ्या कोणालाही बरोबर न घेता, अशी तिची इच्छा आहे. त्यामुळेच लगोलग संध्याकाळची फेरीबोट पकडून तो त्यांच्या मागोमाग पॅराबेलला आला होता.

तो कॉटेजेसजवळ पोहोचेपर्यंत अंधारून आलं होतं– ज्यामध्ये तुम्ही एखाद्या लहान बाळासारखे झोपून झुलत राहू शकता, असे झोके. समुद्रकिनाऱ्यालगत बरेच रिसॉर्ट्स होते. परंतु तो जाणून होता, त्याला कोणत्या प्रकारचं रिसॉर्ट शोधायला हवंय. जिथे नारळांच्या झाडांमध्ये असे लांब झोके ताणून बांधलेले आहेत. त्यांच्यामागे केळीचं बन आहे आणि त्या बनानंतर लाकडी कॉटेजेस आहेत– ज्या कॉटेजेसच्या बाल्कनीचे कठडे चमकदार लाल रंगाने रंगवलेले आहेत.

रात्रीच्या आकाशात एखाद्या ग्रहाने स्थिती घ्यावी तशा अंत:स्फूर्तीने त्याने योग्य कॉटेज शोधून काढलं आणि तिथेच ते होते. वरच्या मजल्यावर तीन छायारूप आकृत्या– ती, स्वयंपाकीण आणि ड्रायव्हर.

त्या कुटुंबाने ड्रायव्हर ठेवलेला आहे, हे त्याला माहीत होतं. तो त्याला चेहऱ्याने ओळखत होता. पन्नाशीतला दणकट शरीरयष्टीचा गृहस्थ– जो नेहमी पांढऱ्या गणवेशात असे. तो जिन्यावरून दिवसातून दोनदा ये-जा करत असे. सकाळी गाडीची किल्ली घेण्यासाठी आणि रात्री परत

करण्यासाठी.

हृदय जणू घशावर, पाठीवर, खांद्यावर जाऊन धडकल्यागत वेदना त्याने अनुभवली. कदाचित त्या तिघांच्या वेगवेगळ्या खोल्या असाव्यात किंवा सगळ्या नोकरांमध्ये मिळून एकच लांबलचक खोली असावी... त्याने विचार केला. बहुधा ते फरशीवर अंथरूण घालून झोपत असावेत. मला याची पर्वा का वाटावी?तसं तर स्वयंपाकीणबाईपण आहेत तिथे, परंतु त्या वयस्कर आहेत. शांत झोपतात आणि मोठ्याने घोरतात.

तिनेच हे त्याला बऱ्याचदा सांगितलं होतं, कारण त्यांच्यामुळे तिला झोपणं अशक्य व्हायचं. जर स्वयंपाकीणबाई शांतपणे झोपल्या आणि त्या तिघांमध्ये मिळून एकच खोली असली, तर ती आणि ड्रायव्हर तिथे असतील. मग काय झालं?

ते तिघे बाल्कनीत उभे असलेले त्याला दिसत होते. वाऱ्याने केस उडताहेत. पोटं बाल्कनीच्या उबदार कठड्याला टेकवून ते उभे आहेत. एक वयस्कर स्त्री, एक मध्यमवयीन पुरुष आणि एक मुलगी. तो जाणून आहे– ती विश्वासघात करणारी नाही, उतावीळही नाही. सहजी बळी पडण्याइतकी दुर्बळ नाही किंवा हट्टी नाहीये.

मग तो कशाला घाबरतोय? त्याने हे स्वत:लाच विचारलं. पामचे लवचिक वृक्ष त्याचं लक्ष वेधून घेण्यासाठीच जणू इकडून तिकडे झोके घेत होते. जणू ही रात्र त्याला गिळंकृत करू पाहतेय, तशी भीती दाखवतेय आहे; परंतु तो स्वत:ला असा दुर्बळ होऊ देणार नाही. तो पामच्या सावलीत उभा राहिला, वरून येणाऱ्या आवाजांचे कानोसे घेत. आता ती हसेल... त्याच्या मनात आलं. त्यांच्यापैकी एकाकडे वळून ती हसेल.

तिचे दात पिवळसर चंद्रप्रकाशात चमकतील किंवा ती गाणं म्हणेल, 'ये रात ये चाँदनी फिर कहाँ...'

परंतु त्याऐवजी हळू आवाजात रडण्याचा आवाज आला, जणू काही एखादं छोटं मूल मोठ्ठ्याने भोकाड पसरावं की नाही, यासाठी मनाची तयारी करते आहे. त्याचं रडणं आणखी मोठं होण्याअगोदरच ती आत निघून गेली.

त्याला तिचा आवाज ऐकू येत नव्हता, परंतु त्याच्या डोक्यात तिचं चित्र स्पष्ट होतं. मुलाला कडेवर घेऊन ती झुलवतेय, जसे हे त्याच्या सभोवतीचे पाम वृक्ष वाऱ्याने झुलताहेत तशी. त्याचबरोबर बाळाला शांत करण्यासाठी

नवं कोरं

# पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब




लेखक
**पिंकी विराणी**

अनुवाद
**रेश्मा कुलकर्णी-पाठारे**

**किंमत : ३९५/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

स्त्री गर्भाशय तसंच आहे. अनादी-अनंत काळापासून जसं होतं तसंच आहे. तितकंच कणखर आणि तितकंच असुरक्षित. बाहेरचे घटक मात्र प्रचंड वेगानं बदलत गेलेले आहेत. समाज... कामाचं ठिकाण... कारकीर्द... ताणतणाव...प्रदूषण... स्त्रीची स्वतःची सामाजिक आणि आर्थिक स्थिती... त्यासाठी कराव्या लागणाऱ्या तडजोडी...या सगळ्याचा परिणाम अखेर स्त्रीच्या प्रजननक्षमतेवर होत आहे. मग जेव्हा तिला नैसर्गिकरीत्या मूल जन्माला घालता येत नाही तेव्हा तिच्यावर औषधांचा मारा केला जातो. नानाविध प्रक्रियांचा भडिमार केला जातो. पण सरतेशेवटी, गर्भाशय तर तेच आहे जसं ते पूर्वी होतं; त्याद्वारा सगळं अखेर बाळाकडेच पोहोचतं.

अखेर स्त्री अशा वळणावर उभी राहते, जिथे तिला प्रश्न पडतो वैद्यकीय विज्ञान की नैतिकता? कशाला महत्त्व द्यावं?

शूऽऽ असा आवाज ती करतेय.

तिथे दिवे नव्हते. दिवे लावलेले खांबही नव्हते. कॉटेजमध्येदेखील दिवे नव्हते. स्वयंपाकीण आणि ड्रायव्हर जिथे होते तिथेच तसेच उभे होते. रात्रीच्या अंधाराकडे निरर्थक हसून पाहत. त्यांच्यामध्ये उभी असलेली तरुण स्त्री आत निघून गेल्यामुळे त्या दोघांमध्ये जे शारीरिक अंतर पडलेलं होतं, ते अद्याप अबाधित होतं.

त्याने सभोवती पाहिलं. बांबूच्या काड्यांनी तयार केलेल्या चट्टयांची भिंत आणि शाकारलेलं छप्पर असलेली एक शेड तिथं होती. जिच्या बाजूच्या तीन भिंती गायब होत्या. ते एक उपाहारगृह होतं. तिथे समुद्राची गाज भरलेली होती, चमकदार दिवे होते आणि टेबलांच्या रांगांतून माशांचे तुकडे शोधत फिरणाऱ्या भटक्या मांजरीप्रमाणे हळुवार संगीत तिथं लहरत होतं. त्याला लपण्यासाठी एक केळीचं झाड सापडलं.

ते तिथेच होते– फक्त दोघेच. जाड पांढऱ्या डिशमधून काही तरी खात होते. वर्षाच्या या हंगामात तिथे खूप कमी पर्यटक आहेत. ते हलकंच हसताहेत. सावकाश खात आहेत. त्यांचं जेवण झाल्यानंतर त्या स्त्रीने तिच्या पतीच्या हाताला हलकासा स्पर्श केला आणि आग्रही आविर्भावाने ओठांचा लाडिक चंबू केला. त्याने सुस्कारा टाकला आणि आत निघून गेला.

मिनिटाभरातच झोपलेल्या छोट्या मुलाला छातीशी घेऊन तो परत आला. त्याच्या मागोमाग ते तिघे तिथे आले. स्वयंपाकीण, ड्रायव्हर आणि ती. धाकट्या मुलाला तिने कडेवर घेतलेलं होतं.

तिथल्याच एका वेगळ्या टेबलाजवळ त्या तिघांना बसायला सांगितलं गेलं. वेटरला बोलावण्यात आलं. त्याने हजर व्हायला बराच वेळ लावला. दरम्यान, त्याने तिच्या चेहऱ्याचं निरीक्षण केलं.

ती फक्त काही पावलांच्या अंतरावर होती. तिच्या चेहऱ्याची डावी बाजू त्याच्या दिशेने वळली. वेटरला येताना पाहून ज्या पद्धतीने तिने तिकडे मान वळवली, ते तो पाहत होता. तिची अस्वस्थ नजर तिथल्या फळ्याकडे गेली, ज्यावर गुलाबी खडूने आजचे विशेष पदार्थ लिहिण्यात आले होते. तिच्याप्रमाणे त्यानेही डोळे ताणून ते वाचण्याचा प्रयत्न केला.

परंतु वेटर त्यांच्या टेबलाजवळ आला नाही. ठरवणारे, ऑर्डर देणारे 'ते' होते. त्यांनी मेन्यूकार्डमधे डोकं घातलं आणि काय आणायचं ते वेटरला

सांगितलं. त्यानंतर स्वयंपाकीणबाईंना त्यांच्या टेबलजवळ बोलावण्यात आलं आणि तिथल्या उरलेल्या परंतु हात न लावलेल्या रोट्यांचा गठ्ठा आणि उरलेली भाजी घेऊन जायला सांगण्यात आलं. एक क्षणभरानंतर वेटर भाजीचा दुसरा बाऊल आणि ढीगभर भात घेऊन आला.

जे छोटं बाळ तिच्या मांडीवर झोपलेलं होतं, ते हालचाल करायला लागलं. झोपेतच रडण्याच्या बेतात होतं. तिने डाव्या हाताने थोपटत त्याला पुन्हा झोपी घालण्याचा प्रयत्न केला आणि उजव्या हाताने जेवत राहिली. दूर अंतरावर दिसणाऱ्या पाम वृक्षावर तिने दृष्टी स्थिर केली होती.

ते उभयता आळीपाळीने थोड्या-थोड्या वेळाने विचारत होते– सगळं व्यवस्थित आहे ना? तुम्हाला आणखी काही हवंय? लोणचं? भात? ठीक आहे? मजा करताय ना?

त्याने तिच्या चेहऱ्यावर नजर रोखली होती. तिच्या डोळ्यांत काही तरी नवं भासत होतं. सुरुवातीला त्याला वाटलं, बहुतेक तिने त्याला पाहिलं असावं. ती थेट त्याच्याकडे पाहत असल्यासारखी वाटत होती. परंतु ती काहीच बोलली नाही, हसली नाही किंवा आश्चर्याने चीत्कारली नाही. तिचे डोळे कठोर झाल्यासारखे वाटले. ती ड्रायव्हरशी किंवा त्या स्वयंपाकीणीशी अजिबात बोलत नव्हती. एक शब्दही नाही.

वेटर आसपास फिरत होता. आळसावलेला, भिंतीच्या खिळ्यावर लटकलेल्या घड्याळाकडे सहेतुक नजर टाकत होता. उपाहारगृहातले इतर सर्व ग्राहक निघून गेलेले होते.

मोठा मुलगा झोपेतून उठून बसला. त्याने पुन्हा जेवण भरवण्याचा हट्ट केला. ते तरुण जोडपं आश्चर्याने चीत्कारलं, हसलं. ते कॉफी पीत होते. त्यांनी एका पेल्यात थोडं दूध ओतून बाळाला दिलं. ते तिला हाका मारत होते, इंग्रजीतच विचारत होते– मजा येतेय ना?

ती उठते, वॉश बेसिनकडे जाते. हात धुते. ते जोडपंही उठून उभं राहिलंय. त्यांचे हात परस्परात गुंफलेले आहेत. बोटं एकमेकांत गुंफलेली आहेत. ज्या प्रकारे ती त्याच्याकडे चोरटे कटाक्ष टाकते आहे. ते त्याने पाहिलं. त्यांचे गुंफलेले हात, एकमेकांना स्पर्श करणारी शरीरं... ती जवळीक.

परतीच्या वाटेवर स्वयंपाकीण स्वत:शीच बडबडते आहे. तिथल्या

दगडांकडे, झुडपांकडे डोकावून पाहत बोलते आहे. ड्रायव्हर बॅटरी घेऊन घाईघाईने पुढे चालत आहे. ती त्या दोघांच्या मागून चालते आहे. धाकट्या मुलाला कडेवर घेऊन आणि मोठ्या मुलाला बोटाला धरून आणते आहे. तो मुलगा निरागस बडबड करतो आहे. मोठ्या आवाजात काही सांगतो आहे. त्याच्यामुळे तिचा अबोलाही संपुष्टात येतो.

तो छोटा मुलगा तिला विचारतो आहे, तिला एकटीने झोपायची भीती वाटत नाही का? ती म्हणते –हो, वाटते. पण जेव्हा जेव्हा तुम्हाला भीती वाटते, तेव्हा तुम्ही गाणं म्हणायला हवं. कॉटेजच्या दाराजवळ गेल्यानंतर मुलगा थांबतो आणि तिला गाणं म्हणायला सांगतो. मुलाला आत घेऊन जाण्यापूर्वी ती गाण्याची ओळ म्हणते– 'सागर किनारे दिल ये पुकारे, तू जो नहीं तो मेरा कोई नहीं है ।'

समुद्र मोठ्याने गर्जना करतो आहे. त्याच्या तोंडाशी लाटा फेसाळल्या आहेत– एखाद्या उद्धट, हट्टी लहान मुलाच्या हनुवटीवर थुंकीचा फेस ओघळताना दिसतो तशा किंवा क्षमेची याचना करणाऱ्या एखाद्या आक्रमक प्रियकरासारखा– जो सगळ्या जखमा, सगळ्या चुका चुंबून बऱ्या करू पाहत आहे किंवा एखाद्या रात्रीतून घुसळून स्नेहाळ-स्निग्ध सकाळ उगवावी– तसा.


त्याला एक हॅमॉक सापडलाय. लांबलचक मोठा झोका– ज्यात तुम्ही आरामात आडवे पडून झोके घेऊ शकता. तो त्यात पालथा पडलाय, चेहरा जमिनीकडे करून. झाडं स्वत:तच व्यग्र आहेत. समुद्राची गाज त्याला थकवते आहे. तो डोळे बंद करून घेतो. त्याला जाणवतंय, कोणत्याही क्षणी तो रडायला सुरुवात करू शकतो.

जर ती बाहेर आली, तिने त्याला तिथे पाहिलं आणि विचारलं, काय झालंय? तर तो तिला सांगेल– रात्र खूपच मोठी आहे, चांदण्याही प्रखर वाटताहेत, समुद्राची गाज मला थकवते आहे आणि तरीही तो तिच्याशिवाय तिथून परतण्याचा विचारही करू शकत नाही. तिच्याशिवाय कुठेही खाणं, कुठेही असणं त्याला सहन होणार नाही.

◆

**नवं कोरं**

# तिमिरपंथी




लेखक
**ध्रुव भट्ट**

अनुवाद
**सुषमा शाळिग्राम**

**किंमत : ३२०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

भटक्या-विमुक्त म्हटल्या जाणाऱ्या जाती-जमातींच्या लोकांना प्रत्यक्ष भेटून लिहिल्या गेलेल्या या कथेचे नायक आपला चिरंजीव ठसा उमटवून जातात. चौर्यकलेचे नियम, त्यातील बंधनं, मर्यादा, गुरूंच्या आणि पूर्वजांच्या आज्ञा इत्यादी गोष्टी वाचकाला एका आगळ्याच भावविश्वात घेऊन जातात, जिथं राहून त्याला नवनवीन सत्यांचा अनुभव येतो.


कायद्यानं ज्यांना जन्मजात गुन्हेगार मानलं, त्या चौसष्टाव्या कलेच्या कलाधरांच्या मनोभूमीवर आणि कर्मभूमीवर प्रकाश टाकणारी, तसेच पूर्वापार चालत आलेला आपल्यावरचा शिक्का पुसून टाकण्यासाठी धडपडणाऱ्या तरुणांच्या प्रयत्नांची ही कथा वाचताना वाचक त्या शर्विलकी विद्येच्या जाणकार महानायकांकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहू लागतो.
प्रत्येक वेळी एक वेगळा, नावीन्यपूर्ण विषय घेऊन येणारे ध्रुव भट्ट यांची ही अनोखी कथा, एका अनोख्या जगाची कहाणी घेऊन आली आहे.

## पुस्तक परिचय

# अँड द माउंटन्स एकोड



खालिद हुसैनी जगातील अत्यंत नामवंत आणि लोकप्रिय कादंबरी लेखकांपैकी एक असून, जगातील सत्तर देशांत आजवर त्यांच्या पुस्तकांच्या अडतीस दशलक्षांपेक्षा अधिक प्रती खपल्या आहेत. त्यांच्या 'द काईट रनर' या पुस्तकाचा 'द टाइम्स', डेली टेलिग्राफ आणि गार्डियन यांनी दशकातील सर्वोत्तम कलाकृती म्हणून गौरव केला. त्या पुस्तकावर एक चित्रपटही बनवण्यात आला होता. 'अ थाउजंड स्प्लेंडिड सन्स' या त्यांच्या पुस्तकाला २००८ सालचं 'रिचर्ड आणि जूडी' यांचं सर्वाधिक वाचनीय पुस्तक म्हणून निवडण्यात आलं होतं. हुसैनी हे संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्वासितांसाठीच्या शाखेचे 'सदिच्छा-दूत' आहेत. तसेच 'खालिद हुसैनी फाउंडेशन' या अफगाणिस्तानातील लोकांना मानवतावादी दृष्टिकोनातून मदत करणाऱ्या स्वयंसेवी संघटनेचे संस्थापकही आहेत. त्यांचा जन्म उत्तर अफगाणिस्तानातील काबूलमध्ये झाला आणि ते कॅलिफोर्नियात राहतात.




लेखक
**खालिद हुसैनी**

अनुवाद
**वैजयंती पेंडसे**

*आशयघन आणि विस्तृत अवकाश असलेली, शहाणपण आणि माणुसकीच्या गहिवराने ओथंबलेली 'अँड द माउंटन्स एकोड' ही भारून टाकणारी कथा, माणूस म्हणून आपली व्याख्या करणाऱ्या, आपल्या आयुष्याला आकार देणाऱ्या भावबंधांची, मानव्याच्या खऱ्या अर्थाची खालिद हुसैनीला असलेली गहिरी जाण पुन्हा एकदा अधोरेखित करते. एका छोट्याशा अफगाणी खेड्यातल्या, आईच्या मायेला पारख्या झालेल्या दोन भावंडांमधल्या हृदय हेलावून टाकणाऱ्या अतिशय घट्ट भावबंधांतून ही कथा सुरू होते. तीन वर्षांच्या परीसाठी तिचा थोरला भाऊ अब्दुल्ला तिच्या भावापेक्षा तिची आईच अधिक आहे, तर दहा वर्षांच्या अब्दुल्लाचं लहानगी परी हे सर्वस्व आहे. त्यांच्या आयुष्यात जे जे घडतं त्याचे त्यांच्या आणि त्यांच्या भोवतालच्या अनेकांच्या आयुष्यात जे पडसाद उमटतात, त्यातून मानवी आयुष्यातली नैतिक गुंतागुंत*

*स्पष्ट होते.अनेक पिढ्यांमध्ये घडणारी ही कथा केवळ आई-वडिलांच्या आणि मुलांच्या नात्याबद्दलची राहत नाही, तर भाऊ-बहीण, चुलत भावंडे, नोकर, मालक, विश्वस्त, पाल्य या साऱ्या नात्यांची होते. त्यांच्या एकमेकांवर प्रेम करण्याच्या, एकमेकांना दुखावण्याच्या, फसवण्याच्या, एकमेकांसाठी त्याग करण्याच्या नाना परी हुसैनी पडताळून पाहतो. ऐन मोक्याच्या क्षणी, आपल्या अगदी जवळच्या असणाऱ्या माणसांचं वागणं आपल्याला किती अनपेक्षित असू शकतं आणि तेच कदाचित सर्वाधिक महत्त्वाचं असू शकतं, हेही!*

परी त्या वेळी फक्त चार वर्षांची होती. पण इतक्या लहान वयात तिच्या आयुष्यात जी उलथापालथ घडली होती, त्यामुळे काही गोष्टी तिला नव्यानं शिकायची गरज निर्माण झाली होती. तिला असं सांगण्यात आलं की, तिनं यापुढे मला काका नबी म्हणून हाक मारायची नाही, तर नुसत नबी असं म्हणायचं. तिची चूक झाली तर तिला त्याची सौम्यपणे जाणीव करून देण्यात यायची, अगदी माझ्याकडूनसुद्धा. वरचेवर, पुन्हा-पुन्हा, तिच्यात आणि माझ्यात कुठलंही नातं नसल्याची तिची खात्री होईपर्यंत. आता मी तिच्यासाठी नबी खानसामा होतो आणि नबी ड्रायव्हरसुद्धा. नीला तिची ममा झाली आणि श्री. वाहदाती पपा. नीलानं तिला फ्रेंच शिकवायला सुरुवात केली, जी तिच्या स्वतःच्या आईची भाषा होती.

श्री. वाहदातींनी परीचं केलेलं थंड स्वागत फार काळ टिकलं नाही. तिचा रडवेला चेहरा आणि घरच्यांच्या आठवणीनं तिला आलेलं हिरमुसलेपण यापुढे त्यांचा कठोरपणा विरघळून गेला. हळूहळू आमच्या रोजच्या प्रभातफेऱ्यांत तीही सामील झाली. आम्ही चालायला जायचो, तेव्हा श्री. वाहदाती तिला बाबागाडीत घालून ढकलत नेऊ लागले किंवा गाडीच्या चाकामागे ते तिला आपल्या मांडीवर घेऊन बसत आणि ती गाडीचा भोंगा जोरजोरात वाजवत असताना कौतुकानं हसत. त्यांनी एक सुतार नेमून परीसाठी एक तीनखणी पलंग बनवून घेतला, तसेच तिच्या खेळण्यांसाठी एक मेपलच्या लाकडाची पेटी आणि एक छोटंसं ठेंगणं कपाट. परीच्या खोलीतलं सगळं फर्निचर त्यांनी पिवळ्या रंगानं रंगवून घेतलं; कारण परीचा तो आवडता रंग होता, असं त्यांना कळलं होतं. एक दिवस मी त्यांना त्या

कपाटासमोर मांडी घालून बसलेलं पाहिलं. परी त्यांच्या जवळ बसली होती आणि ते कपाटाच्या दरवाजांवर जिराफ आणि लांब शेपटीच्या माकडांची चित्रं रंगवत होते. अगदी चांगल्या प्रकारे. श्री. मार्कोस, मी जरी तुम्हाला सांगितलं असलं की, इतकी सारी वर्षं मी त्यांना रेखाटनं करताना पाहत आलो होतो, तरी त्यांची कलाकृती प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनी पाहण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.

परीच्या आगमनाचा एक दृश्य परिणाम म्हणजे वाहदातींचं घर पहिल्यांदाच एक खरंखुरं कुटुंब असल्यासारखं वाटू लागलं होतं. परिवाराच्या प्रेमामुळे नीला आणि तिचा नवरा आता एकत्र जेवू लागले होते. ते परीला घराजवळच्या बागेत घेऊन जात आणि बाकावर शेजारी-शेजारी बसून कौतुकानं तिचा खेळ पाहत. रात्रीच्या जेवणानंतर मी त्यांना चहा देत असे, तेव्हा त्या दोघांपैकी एक जण त्यांच्या मांडीवर लोळणाऱ्या परीला लहान मुलांच्या पुस्तकातली एखादी गोष्ट वाचून दाखवत असे. जसजसे दिवस जात होते, तसतसा परीला आपल्या शादबागमधील पूर्वायुष्याचा आणि त्यातील माणसांचा विसर पडत चालला होता.

परीच्या येण्याचा दुसरा परिणाम मात्र मलाही अगदीच अनपेक्षित होता. माझं त्या घरातलं स्थान आता कमी महत्त्वाचं होऊ लागलं होतं. श्री. मार्कोस, तुम्ही माझा सहानुभूतिपूर्वक विचार करायला हवा. हे लक्षात घ्या की, मी एक तरुण मनुष्य होतो. मलाही आशा-आकांक्षा होत्या. मूर्खपणाच्या असतील कदाचित, पण होत्या. काही झालं तरी केवळ माझ्यामुळेच नीलाला मातृत्वाचा लाभ झाला होता. तिच्या दुःखाचं कारण शोधून काढून मीच त्यावर उपाय योजला होता. माझी काय अपेक्षा होती? मला असं वाटत होतं का की, यानंतर मी तिचा प्रियकर बनेन? एवढा मूर्ख मी नक्कीच नव्हतो. पण श्री. मार्कोस, ते संपूर्ण सत्यही नव्हतं. खरं सांगायचं झालं, तर आपण सगळेच अशी काही अशक्य गोष्ट आपल्या बाबतीत घडेल, सगळ्या प्रतिकूल बाबींवर मात करून घडेल, याची वाट पाहत नसतो का?

माझं अस्तित्व इतकं नगण्य बनेल, याची मी अपेक्षा केली नव्हती. नीलाचा सगळा वेळ आता परीभोवती जायचा. तिचा अभ्यास, तिचा खेळ, तिची झोप, तिचं फिरणं. आमचा रोजचा संवाद आता जवळजवळ बंदच झाला होता. त्या दोघी जर एखादं कोडं सोडवत असल्या किंवा ठोकळ्यांनी घर बांधत असल्या, तर मी तिच्यासाठी कॉफी घेऊन आल्याचं नीलाच्या

लक्षातही यायचं नाही. मी अजूनही त्याच खोलीत मागे उभा असल्याचं तिला जाणवतही नसे. जेव्हा आमच्यात काही बोलणं होत असे, तेव्हाही तिचं त्यात लक्ष नसायचं आणि ती ते संभाषण थोडक्यात आटपण्याच्या मागे असे. गाडीतही तिचा भाव अलिप्तच असे. आणि ही शरमेची गोष्ट असली तरी खरी आहे की, यासाठी मात्र मला माझ्या पुतणीचा राग येऊ लागला होता.

वाहदातींशी केलेल्या करारानुसार परीच्या कुटुंबीयांना तिला भेटायची परवानगी नव्हती. त्यांनी तिच्याबरोबर कुठल्याही प्रकारे संबंध ठेवायचा नव्हता. परी वाहदातींच्या घरात राहायला आल्यानंतर लगेचच मी एकदा शादबागला गेलो होतो. जाताना मी अब्दुल्ला आणि आता रांगता झालेला माझ्या बहिणीचा मुलगा इक्बाल यांच्यासाठी छोटीशी भेटवस्तू घेऊन गेलो होतो.

सबूर रुक्षपणे म्हणाला, ''तुझ्या भेटी देऊन झाल्यायत. आता निघालास तरी चालेल.''

मी त्याला म्हटलं की, त्याच्या या थंड्या स्वागताचं, माझ्यावरच्या रागाचं कारण मला कळत नव्हतं.

''तुला चांगलच कळतंय,'' तो म्हणाला, ''आणि आता तू येऊन आम्हाला भेटण्याची काहीएक गरज नाहीये.''

त्याचं बरोबर होतं. मला कळत होतं. आमच्यामध्ये एक दुरावा उत्पन्न झाला होता. माझं येणं आता अवघडलेलं, तणावपूर्ण आणि कदाचित विवादास्पदही झालं होतं. आता तिथं बसून त्याच्याबरोबर चहा घेणं, हवापाण्याच्या, द्राक्षाच्या हंगामाच्या गोष्टी करणं हे नैसर्गिक राहिलं नव्हतं. सबूर आणि मी, आम्ही जरी सारं काही ठीक असल्याचा आव आणत असलो, तरी सारं ठीक नव्हतं. त्याच्या कुटुंबाच्या झालेल्या ताटातुटीला मी कारणीभूत होतो. सबूरला मी नजरेसमोरही नको होतो आणि मी ते समजू शकत होतो. माझ्या दर महिन्याच्या भेटी मी बंद केल्या. त्यांना कुणालाच मी नंतर कधीही भेटलो नाही.

श्री. मार्कोस, १९५५च्या वसंताच्या त्या सुरुवातीच्या दिवशी घरातल्या सगळ्यांची आयुष्यं कायमची बदलून गेली, अगदी पूर्णपणे. मला अगदी प्रसंगवार आठवतंय. त्या दिवशी पाऊस पडत होता. बेडूक बाहेर पडून ओरडू लागण्याएवढा जोरात नाही, पण संपूर्ण सकाळभर पावसाच्या बारीक बारीक सरी येत-जात होत्या. माझ्या लक्षात आहे कारण, झहीद माळी नेहमीच्या

आळशीपणानं वाईट हवेबद्दल तक्रार करत होता आणि आपलं काम बंद करून घरी जाण्याचा विचार पुन्हा-पुन्हा बोलून दाखवत होता. त्याच्या बडबडीला कंटाळून मी माझ्या झोपडीत जाण्याचा विचार करत होतो, तेवढ्यात मला घरातून नीलानं माझ्या नावानं मारलेल्या हाका ऐकू आल्या.

मी धावत धावत अंगण ओलांडून घरात पोचलो. तिचा आवाज वरच्या मजल्यावरून येत होता. त्यांच्या मुख्य शयनगृहाच्या दिशेनं.

नीला खोलीच्या एका कोपऱ्यात भिंतीला टेकून उभी होती. तिचा हात तिच्या तोंडावर होता. ''त्याला काहीतरी झालंय!'' तोंडावरचा हात न काढता ती म्हणाली.

श्री. वाहदाती पलंगावर बसले होते. त्यांनी अंगात शुभ्र सदरा घातला होता. त्यांचा चेहरा पांढराफटक पडला होता. केस अस्ताव्यस्त झाले होते. त्यांच्या तोंडातून विचित्र घरघर येत होती. आपल्या उजव्या हातानं ते काहीतरी करण्याचा प्रयत्न करत होते; पण त्यांना ते जमत नव्हतं. त्यांच्या तोंडाच्या एका कोपऱ्यातून लाळेचा ओघळ खाली आला होता. त्यांची ती अवस्था बघून मला धक्काच बसला.

''काहीतरी कर, नबी.''

आता सहा वर्षांची झालेली परी तेवढ्यात खोलीत आली. श्री. वाहदातींच्या पलंगावर चढून ती त्यांच्यावर ओणवली आणि त्यांचा सदरा खेचू लागली. ''पपा, पपा!'' त्यांनी विस्फारलेल्या डोळ्यांनी तिच्याकडे पाहिलं. काहीतरी बोलण्यासाठी त्यांच्या तोंडाची उघडमीट झाली; पण काही आवाज आला नाही. परी किंचाळली.

मी पटकन तिला उचलून घेतलं आणि तिला नीलापाशी घेऊन गेलो. मी नीलाला तिला दुसऱ्या खोलीत घेऊन जायला सांगितलं, कारण आपल्या वडिलांना तशा अवस्थेत तिनं बघणं योग्य नव्हतं. नीलाची नजर शून्यपणे माझ्याकडून परीकडे तर परीकडून माझ्याकडे फिरली. मग जणू त्या तंद्रीतून बाहेर येण्यासाठी करावी तशी तिनं आपल्या डोळ्यांची उघडझाप केली आणि परीला घेण्यासाठी हात पुढे केले. ती मला सारखं विचारत होती की, तिच्या नवऱ्याला काय झालं होतं? मला सांगत होती की, मी काहीतरी करायला हवं.

मी खिडकीतून झाहीदला हाक मारली. आयुष्यात पहिल्यांदाच तो बिनकामाचा मूर्ख माणूस काहीतरी उपयोगाचा ठरला. त्यानं मला श्री.

वाहदतींना पायजमा चढवण्यास मदत केली. आम्ही दोघांनी मिळून त्यांना पलंगावरून उचललं, जिन्यावरून खाली नेलं आणि गाडीच्या मागच्या सीटवर ठेवलं. नीला त्यांच्या शेजारी बसली. झहीदनं घरात थांबून परीवर लक्ष ठेवावं, असं मी त्याला सांगितलं. तो कां-कू करू लागला, तेव्हा मी त्याच्या एक श्रीमुखात भडकावली आणि त्याला म्हटलं की, तो म्हणजे केवळ एक ओझ्याचं गाढव होता आणि त्यानं मुकाट्यानं सांगितल्याप्रमाणे करायला हवं.

एवढं बोलून मी गाडी बाहेर काढली. ◆


## आवाहन


पुस्तक वाचताना वाचक त्या पुस्तकाशी एकरूप झालेला असतो. काही वेळेला तर तुमच्या जीवनाला कलाटणी देण्याचं सामर्थ्य एखाद्या पुस्तकामध्ये असतं. आम्ही नेहमीच वाचकांना दर्जेदार पुस्तकं वाचण्याचा आनंद दिला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसचं असंच एखादं तुम्हाला आवडलेलं, भावलेलं पुस्तक असेल तर त्या पुस्तकाबद्दलचा अभिप्राय आम्हाला साधारण ५०० ते ८००शब्दांत लिहून कळवा. अभिप्रायाबरोबर आपला संपूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर देण्यास विसरू नये. ते पुस्तक आपल्याला का आवडलं ते लिहायचं आहे. आपल्या अभिप्रायाचं स्वागत असेल. यासाठी मानधनही दिलं जाईल. अभिप्राय छापण्याबाबतचा अधिकार संपादकांच्या अधीन राहील. त्या संबंधात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही आणि अस्वीकृत अभिप्राय परत पाठवला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच या संदर्भात दूरध्वनी-वरून कोणीही संपर्क साधू नये. आपला अभिप्राय आमच्या या ई-मेलवर mmgj@mehtapublishinghouse.com किंवा खालील पत्त्यावर पोस्टाने/कुरियरने पाठवावा.

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

**१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवन समोर, पुणे ३०.**

नवं कोरं

# धना




लेखक

**पै. गणेश मानुगडे**

**किंमत : १७०/-रु. पोस्टेज : ५०/-रु.**

धना आणि राजलक्ष्मीची ही प्रेमकहाणी आहे. धना यशस्वी पहिलवान आहे, तर राजलक्ष्मी सर्जेराव या तालेवाराची लेक. गावात दहशत माजवणाऱ्या नरभक्षक वाघाला धना शस्त्राशिवाय ठार मारतो. गंभीर जखमी झालेला धना इस्पितळात उपचार घेत असताना यशवंत महाराज ऊर्फ राजे त्याचं अपहरण करतात. राजे देशसेवेसाठी धनाला राजलक्ष्मी आणि घरादाराचा त्याग करायला सांगतात. दरम्यान, वाघाच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी गावात आलेला सूर्याजी जाधव हा वन खात्याचा अधिकारी राजलक्ष्मीच्या प्रेमात पडतो; पण राजलक्ष्मीचं मन धनावर जडलं आहे, हे कळल्यावर तो त्या दोघांना एकत्र आणायचं ठरवतो. दरम्यान, खूप वेगाने काही घटना घडतात आणि राजे व त्यांच्या फौजेची गुप्तता धोक्यात येते. त्यामुळे ते स्थलांतर करायचं ठरवतात; मात्र, स्थलांतर करण्याआधी राजलक्ष्मी आणि सूर्याजीला संपवण्याचा आदेश त्यांनी दिलेला असतो. त्या आदेशामुळे धना अस्वस्थ असतो. त्यानंतर या प्रेमकहाणीला धक्कादायक वळण मिळतं. देशभक्ती आणि प्रेम यांच्या कात्रीत सापडलेल्या धनाच्या संघर्षाची ही गाथा उत्कंठावर्धक आणि तितकीच रोमहर्षक आहे.

## प्रासंगिक

**(आषाढी एकादशीनिमित्त मंजुश्री गोखले यांच्या**

**'ज्ञानसूर्याची सावली' या कादंबरीमधून)**

# ज्ञानसूर्याची सावली

'उद्या आपल्याला दादा शिष्य करून घेणार...! आपल्याला ज्ञान मिळण्याचा मार्ग दिसणार. गीता, वेद, उपनिषदं हे सारं आपल्याला पाठ आहे; पण त्यातील तत्त्वार्थ आणि अन्वयार्थ यांची ओळख आपल्याला होणार,' या आनंदात निजलेल्या सोपानाला अगदी मध्यरात्रीच जाग आली. रात्रीचा दुसरा प्रहर संपत आला होता. सोपान आपल्या अंथरुणावर उठून बसला. देवासमोर समई शांतपणे तेवत होती. तिचा अंधूक प्रकाश झोपडीत एक गूढ वातावरण निर्माण करत होता. सोपान झोपडीचं कवाड लोटून बाहेर आला. आकाश निरभ्र होतं. चंद्राची अर्धी कोर पूर्ण तेजानं प्रकाशत होती. डोणीतल्या पाण्यानं त्यानं अंघोळ केली आणि तशाच ओलेत्या वस्त्रानं तो पद्मासन घालून तुळशी वृंदावनाजवळ बसला. एकवार श्रीकृष्णाचं स्मरण करून त्याने ओंकारसाधनेला सुरुवात केली. हळूहळू त्याचा स्वर, त्याचा आकार, शुद्ध होत चालला. एकेक ओंकार नाभीतून निघून मस्तकापर्यंत भिनत चालला. त्या ओंकारानं मग ती झोपडी व्यापली. झोपडीभवतालचा परिसरही व्यापला. ओंकारसाधना आता अधिक गहिरी झाली. अधिक शुद्ध होऊ लागली. त्या ओंकाराला आता एक विशिष्ट लय आली. ताल आला. त्या ओंकाराची स्पंदनं आवर्तात फिरू लागली. एकेक आवर्तनं अधिकाधिक गहिरं, अधिक खोल, अधिक सर्जनशील होत गेलं, त्या स्पंदनांनी अवघ्या वातावरणात एक कंप निर्माण केला. त्या ध्वनिलहरींत चराचराला अस्थिर करण्याचं सामर्थ्य होतं. त्या ध्वनिलहरींच्या स्पंदनांतून आवर्तनांची एक मालिकाच तयार झाली आणि अवघ्या सृष्टीला जाग आली. सर्वप्रथम जाग

आली निवृत्तीला. सभोवती निर्माण झालेल्या या स्पंदनांची जाणीव त्याला झाली. त्या ध्वनिलहरींनी निर्माण केलेली कंपनं अंथरुणावर उठून बसलेल्या ठिकाणीही त्याला जाणवत होती. त्याचं जाणिवेनं जागा झाला ज्ञानेश्वर. आपल्या अंगाखालची जमीन कंप पावते आहे, असं त्याला वाटलं. तो ताडकन उठून बसला. ध्वनिकंपनांची ही चाहूल मुक्तालाही लागली आणि अंथरुणावर डोळे चोळत तीही उठून बसली.

निवृत्तीने पाहिलं, सोपान अंथरुणावर नव्हता. अजून बरीच रात्र शिल्लक होती. अजून चांदण्या लुकलुकत होत्या. चंद्र अजून आकाशाच्या मध्यावर होता. झोपडीच्या छतातून त्याचे किरण कवडशांचे रूप घेऊन खाली उतरत होते. झोपडीतल्या सारवलेल्या जमिनीवर त्या किरणांचे गोल-गोल वर्तुळाकार उमटले होते; पण हे सगळं पाहण्याची ही वेळ नव्हती. सोपान अंथरुणावर दिसत नव्हता. 'मग हा गेला कुठे? आणि चराचराला पुरून उरलेला हा ध्वनी कसला? अवघ्या सृष्टीला वेढून टाकणारी ही स्पंदनं कसली? अवघ्या अवकाशात भरून राहिलेल्या या ध्वनिलहरी कुठून आल्या? यांचं उगमस्थान काय? आणि ही कंप पावणारी जमीन, प्रतिध्वनीनं गुंजणारं क्षितिज कोणता संकेत देत होतं? काय सुचवायचं होतं या चराचराला? आणि या सगळ्यांपेक्षा सोपान कुठं आहे?' निवृत्ती-ज्ञानेशाच्या मनात प्रश्नांची मालिकाच तयार होत होती; पण उत्तर एकाचंही नव्हतं. 'खरंच! एवढ्या उत्तररात्री हा कुठे गेला असेल? गंगेच्या घाटावर तर नसेल? वाळवंटात तर जाऊन बसला नसेल? किंवा औदुंबराखाली? छे:! काही सुचत नव्हतं.' यातल्या प्रत्येक प्रश्नाचं उत्तर नकारार्थीच येत होतं.

'मग हा सोपान गेला कुठं! स्वभावानं काहीसा शांत, अबोल वाटणारा, सतत आपल्याच विचारात, कसल्या ना कसल्यातरी चिंतनात मग्न असणारा सोपान तसा मनस्वीही होता. कधीकधी त्याचा हा मनस्वीपणा त्याच्यातल्या समंजसपणावर मात करत असे. याचं प्रत्यंतर त्यानं दशक्रिया विधीच्या वेळी हविर्भाग घेण्यासाठी प्रत्यक्ष आई-बाबांना बोलावून आणलं, तेव्हा आलं होतं. आता हा कुठे गेला असेल?' निवृत्ती-ज्ञानेश्वर विचार करत होते. आणि ओंकारध्वनी? तो तर आणखीनच निनादत होता. आता जणू त्याची व्याप्ती वाढली होती. पृथ्वी पादाक्रांत करून धरेला आपल्या ध्वनिस्पंदनात सामावून

घेऊन तो ओंकार ध्वनी आता स्वर्ग आणि पाताळ यांना आपल्यात विरघळून टाकण्यासाठी सज्ज झाला होता. जणू त्रैलोक्याला आपल्या बाहूत भरण्याचं सामर्थ्य त्याच्यात होतं. निवृत्ती लक्षपूर्वक ऐकू लागला. त्या ओंकाराचा उच्चार गगनवेधी होता. त्याची दीर्घता क्षितिजापर्यंत होती. षड्जापासून सुरुवात करून पुन्हा तो ओंकार बाराही स्वरांनंतर मध्य सप्तकातल्या षड्जापर्यंत येऊन पोहोचत होता. तिथून मध्य सप्तकातल्या बारा स्वरांना घेऊन तो तार सप्तकापर्यंत निनादत होता. तार सप्तकातल्या बारा पायऱ्यांवरून ओघळत तो ओंकार पुन्हा मंद्र षड्जापर्यंत पोहोचत होता.

अशा प्रकारे मंद्र षड्ज ते तार षड्ज आणि तार षड्ज ते पुन्हा मंद्र षड्ज अशा आवर्तनात फिरताना बहात्तर ओंकारांची पल्लेदार स्वरसाधना होत होती. प्रत्येक ओंकार अचूक आणि नेमका होता. सुस्पष्ट होता. स्वरसंकोचाला थारा नव्हता आणि अतिक्रमणाचा मोहही नव्हता. अतिशुद्ध अशा त्या ओंकारात सहस्त्र रश्मीचं तेज होतं, चंद्राची शीतलता होती, मोरपिसाची थरथर होती, शेषाची अविचलता होती, गोरसाची माधुरी होती, अमृताचं पावित्र्य होतं, आकाशगामी नाद होता, उदधीची गाज होती, प्रत्ययकारी आवर्त होतं. विश्वाचं आर्त होतं. तो ओंकार लक्षपूर्वक ऐकत असता निवृत्तीला एक क्षणभर, अगदी क्षणभर तो आवाज ओळखीचा वाटला. तो श्वास ओळखीचा वाटला. क्षणभरच! पण तेवढ्या क्षणानंही निवृत्तीला चकित केले. तो आवाज, तो स्वर, तो श्वास ओळखीचा, अगदी ओळखीचा, अगदी जवळचा, आपल्या काळजातला आहे आणि तो ओंकार स्वरसाधनेचा शुद्ध स्वर आपल्या सोपानाचा आहे, हे निवृत्तीच्या लक्षात आलं. त्याच वेळी ते ज्ञानेशाच्याही लक्षात आलं आणि दोघंही जण अंतर्बाह्य थरारले. 'नऊ-दहा वर्षांच्या सोपानानं इतकी शुद्ध ओंकारसाधना करावी? छे:! एवढ्या लहान वयात इतका शुद्ध ओंकार? त्याची स्पंदनता एवढी तीव्र, की अवघी सृष्टी कंपायमान व्हावी?' मनाला पटत नव्हतं, पण कानावर विश्वास ठेवणं भाग होतं. दोघंही एकाच वेळी झोपडीच्या दाराकडे धावले. कवाड नुसतं ओढून घेतलं होतं. त्यांच्या पाठोपाठ मुक्ता धावली. तिघंही झोपडी बाहेर आली. बाहेरचं वातावरण प्रचंड अल्हादायक होतं. अवकाशात विरघळलेल्या चंद्राच्या प्रकाशाबरोबरच एक मंद सुगंधही दरवळत होता. जणू

तो चंद्रकिरणांसमवेतच पृथ्वीवर आला होता आणि वातावरणात विरघळून गेला होता. ओंकाराचा स्वर मात्र या साऱ्याला छेदत वातावरणात लहरी उत्पन्न करत होता. आवाजाच्या रोखानं तिघांचीही पावलं पडू लागली. अंगणातलं तुळशीवृंदावन भारल्यासारखं दिसत होतं. तुळशीचं ते रोप थरारत होतं. मंजिऱ्या थरथरत होत्या आणि तुळशीवृंदावनापलीकडून तो स्वर येत होता. त्या निनादणाऱ्या स्वराचा उगम त्या वृंदावनापलीकडे होता. तिघंही त्वरेनं तिथं पोहोचली आणि त्या तिघांनी, त्या तिघांच्या दोन दुणे सहा नेत्रांनी जे पाहिलं, ते खरोखर अविस्मरणीय होतं, अलौकिक होतं, अपूर्व होतं.

तुळशीवृंदावनापलीकडे पद्मासन घालून सोपान बसला होता. त्यानं नेसलेल्या पंचावरून ते उद्‌धृत होत होतं. ओंकारसाधना तोच करत होता; पण हे सगळं असूनही समोर बसलेला तो सोपान नव्हताच. तिथं कुणीतरी वेगळ्याच रूपात बसलं होतं. त्या रूपाला चार मुखं होती. चारही चेहरे चार बाजूंकडे तोंड केलेले होते. चारही मुखं अत्यंत तेजस्वी, दिव्य प्रभा असलेली अशी होती. चारही मुखांच्या मस्तकावर शोभायमान किरीट होता. कपाळावर अशा आकाराचे ओंकार सदृश गंध त्या दिव्य प्रभेची शोभा वाढवत होते. त्या रूपाला चार हात होते. एका हातात ऋग्वेद होता, दुसऱ्या हातात कमंडलू होता, वर धरलेल्या दोन्ही हातांपैकी एका हातात रुद्राक्ष माळा होती आणि दुसऱ्या हातात स्त्रृवा (यज्ञात तूप घालण्याची लांब पळी) होती. कमळावर पद्मासन घालून ते दिव्य रूप आसनस्थ झालं होतं.

त्या दिव्य रूपाचे डोळे अत्यंत तेजस्वी, पण स्निग्धतेने भरलेले, स्नेहार्द होते. पांढरीशुभ्र दाढी त्या दिव्यमुखावर होती आणि ती छातीवर रुळत होती. आपल्यासमोर सोपान नसून दुसरंच कुणीतरी तेजस्वी रूपडं बसलं आहे; अत्यंत तेजस्वी, अत्यंत प्रभावशाली, ऋषितुल्य असं! निवृत्तीच्या हे लक्षात आलं आणि तत्काळ त्याला बोध झाला, हे तर 'जगत्पिता ब्रह्मदेव!' सृष्टीची उत्पत्ती ज्यांनी केली, या विश्वाचं पालकत्व ज्यांच्याकडे जातं ते 'जगत्पिता ब्रह्मदेव!' ब्रह्मदेव इथं आहेत मग सोपान? निवृत्ती-ज्ञानेश्वर एकमेकांकडे पाहू लागले. त्यांच्या नजरेत प्रश्न होता आणि आश्चर्यही! मुक्तानं घाबरून निवृत्तीचा हात धरला. निवृत्ती-ज्ञानेशाची नजरानजर झाली आणि दोघांनी

एकाच वेळी त्या विश्वकर्त्याला हात जोडले. मुक्तानंही त्याचं अनुकरण केलं. मस्तक झुकवून, हात जोडून, डोळे मिटून तिघं क्षणभर अविचल स्तब्ध उभे राहिले. जणू त्या ब्रह्मदेवाच्या दर्शनानं त्यांचं भान हरपलं होतं. आता डोळे उघडून पुन्हा एकवार ब्रह्मदेवाचं दर्शन घ्यावं, असा विचार करताहेत, तोच त्यांना सोपानाचा आवाज ऐकायला आला, ''निवृत्तीदादा, ज्ञानादादा, दोघं हे काय करताय? मला कशाला वंदन करताय? अरे, मी तुमच्यापेक्षा लहान आहे. निवृत्तीदादा, अरे मीच तुम्हा दोघांना वंदन करायला हवं! निवृत्तीदादा, खरंतर तू माझा मोठा भाऊ; पण आई-बाबा गेल्यापासून तूच आई झालास आणि बाबाही! आणि आज तर मी तुझा शिष्य होणार आणि तू माझा गुरू. दादा, मी किती भाग्यवान आहे, की मला आई-वडिलांच्या ठिकाणी असलेला मोठा भाऊ गुरू म्हणून लाभला. दादा, 'मातृदेवो भव। पितृदेवो भव। आणि आचार्य देवो भव।' अशी तीन श्रद्धास्थानं मला एकाच वेळी, एकाच ठिकाणी गवसली. दादा, मी कृतार्थ आहे!'' सोपानाचं बोलणं ऐकून निवृत्ती-ज्ञानेश्वर भानावर आले. 'अरे! हा तर आपला सोपान! मग ब्रह्मदेव कुठे गेले? की सोपान हाच ब्रह्मदेव आहे?' निवृत्तीच्या मनात प्रश्न उभा राहिला आणि त्या प्रश्नाचं उत्तरही त्याला 'होय' असं मिळालं.


त्रिपुरारी पौर्णिमेला जन्मलेला हा सोपान साक्षात ब्रह्मदेवाचं रूप होता आणि प्रत्यक्ष ब्रह्मदेवानं साक्षात आपलं रूप दाखवून याची प्रचिती दिली होती. अभावितपणे निवृत्तीनं सोपानाला जवळ घेतलं. धाकटा भाऊ म्हणून वाटणारी माया, पुत्रवत सांभाळतो आहोत म्हणून वाटणारे प्रेम, शिष्य होणार म्हणून होणारा आनंद, निवृत्तीच्या मनातल्या या भावना सोपानाच्या दिसलेल्या या ब्रह्मरूपानं त्या शतगुणित झाल्या. ज्ञानेश्वरासारखा शिष्य मिळाला म्हणून आपण धन्यता मानत होतो; पण सोपानासारखा शिष्य मिळून आपण कृतार्थ होणार आहोत, ही भावना निवृत्तीच्या मनात निर्माण झाली आणि त्याच्याही नकळत, अगदी नकळतपणे सोपानाभोवतालची त्याची मिठी घट्ट झाली. अधिक घट्ट.

◆

**नवं कोरं**

# अडगळ

लेखक
**ल. सि. जाधव**




**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज : ५०/ रु.**

ल. सि. जाधव यांची ‘अडगळ’ ही कादंबरी प्रस्थापित दलित लेखकाच्या वयस्क अवस्थेतील अगतिक व साठोत्तरी काळातील दलित साहित्याचा नवा प्रवाह अधोरेखित करते. प्रामुख्याने कथा-कविता व आत्मकथनातून आपल्या वास्तव जगण्याची अनुभूती दाहक, धगधगत्या शैलीतून आविष्कृत करत हा प्रवाह मराठी साहित्यात मिळाला. ल. सि. जाधवांचं साहित्य या प्रवाहात आपल्या वेगळ्या आणि स्वतंत्र ललित-दलित अशा संमिश्र शैलीतून आविष्कृत होऊन एक स्वतःचं खास अस्तित्व म्हणून वेगळेपण दर्शवतं. त्यांचं लेखन वयाच्या सत्तरीत लिहिलेलं असलं तरी ते वयोपरत्वे परिपक्व, वैचारिक भूमिका व मनाची एक स्तब्धस्थिर अवस्था प्रकट करतं, असं जाणवतं. प्रस्तुत कादंबरीत दलित साहित्यिकाचं अस्वस्थ अंतरंग अत्यंत समर्थ शैलीतून हळुवारपणे उलगडत गेलं आहे, असं दिसतं.

तरल इंद्रिय संवेदना असोत किंवा मनातील कोमल आंदोलनं असोत, इथं पानोपानी त्यांचं आविष्कृत प्रतिबिंब विस्मयाचा अनुभव देत उमटत राहतं. खोल समजूतदारपणातून जाणवणारी नम्रता त्यांच्या ठायी भरून आहे.

# अरविंद गोखले



अभिजात मराठी नवकथेचे शिल्पकार अशी अरविंद गोखले यांची ओळख. लघुकथा, लघुत्तम कथा, दीर्घकथा आणि कथालेख व्रतस्थपणे लिहिणारे कथोपासक गोखले ह्यांनी आपल्या लेखन काळात सुमारे पाचशे कथा लिहिल्या आणि मराठी कथाविश्वावर आपल्या नावाची सुवर्णमुद्रा समर्थपणे उमटवली. नवकथेच्या ह्या शिल्पकाराने कथेचे नवे नवे रूप आणि भोवतीचा भव्य परिसर खूप बारकाईने न्याहाळला होता. रसिक वाचकांवर आपल्या अभिरुचीसंपन्न कथेची गारूडमोहिनी घालणाऱ्या गोखले ह्यांनी एका कथालेखनाव्यतिरिक्त, वाङ्मयातल्या इतर लोभसवाण्या दालनांकडे चुकूनही पाहिले नाही. एका चिरंतन ध्यासाने आणि प्रचंड आत्मविश्वासाने आपल्या अंत:करणातले कथाविश्व प्राणपणाने जोपासले. अत्यंत सकस आणि सदासतेज अशी केवळ कथाच लिहिली.

कथाकार गोखले यांनी आपल्या कथांमधील वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वांचा शोध घेताना, जीवनभाष्याच्या दिशेने आपल्या कोणत्याच कथेची होडी ओढून नेली नाही, तर त्यांनी व्यक्तीव्यक्तींमधील भावनिक संदर्भ, एकमेकांमधील संबंध आणि चिंतनशील मन ह्या अप्रतिम त्रिवेणी संगमावर आपले हवेहवेसे वाटणारे कथाविश्व उभे केले. प्रत्येक माणूस, आपल्या

आयुष्यात घडणाऱ्या छोट्या-मोठ्या प्रसंगांनी जसा अनुभवसिद्ध होतो, तसा प्रत्येक लेखक तो प्रत्यक्ष अनुभवत असलेल्या घटनांमधून स्वतःच्या जन्मदत्त, तरल प्रतिभेच्या बळावर साहित्याच्या माध्यमातून शब्दांच्या साहाय्याने एक अनोखे कथाविश्व विणत असतो. मनाच्या पायऱ्या चढत-उतरत स्वतःचे अक्षरविश्व उभे करतो. एकमेकांवरील प्रेम हा माणसामाणसांमधला वास्तविक स्नेहमयी आधार असतो. लेखक ह्या प्रेमाला शब्दरूप देतो. ह्याची मग कथा होते. कादंबरी होते. कविता होते. अशा निखळ प्रेमाचा आधार गोखले ह्यांच्या समग्र कथेने जिवापाड जपला.

गोखले ह्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर ह्या तालुक्याच्या ठिकाणी १९ फेब्रुवारी १९१९ रोजी झाला. जन्माने चित्तपावन ब्राह्मण. त्यांच्या घराण्यात ही लेखनकला पाझरत होती. गोखल्यांचे वाङ्मयप्रेमी आजोबा हे ज्येष्ठ कथा-कादंबरीकार असलेल्या हरिभाऊ आपट्यांचे जवळचे स्नेही होते. वडील तर विज्ञानविषयक लेख आणि पुस्तके लिहीत असत. त्यांच्या वडिलांनी त्या काळात अनेक शास्त्रज्ञांची छोटी छोटी चरित्रे लिहून प्रसिद्ध केली होती. गोखल्यांची आई कविता लिहायची. त्यांच्या आईचे वडील बंधू म्हणजे गोखल्यांचे सख्खे मामा, ख्यातनाम कवी श्री.बा.रानडे आणि मामी मनोरमाबाई रानडे हे दाम्पत्य, हे तर सहित्यक्षेत्रातले रसरसते चैतन्य होते. गोखले ह्यांचे जन्मदत्त भाग्य असे होते की, अगदी घरातच सर्जनशील साहित्याचे एक छोटे सळसळते विश्व अगदी लहानणापासून त्यांच्या भोवती पौर्णिमेचे चांदणे होऊन पसरलेले होते. घरात उत्तमोत्तम ग्रंथ आणि वाङ्मयीन नियतकालिकांची रेलचेल होती. गोखले यांच्यासारखा नवकथेचा शिल्पकार लहानपणीच भोवतीच्या वाङ्मयीन वातावरणात पोसला गेला होता.

पुण्यातल्या सदाशिव पेठेत अरविंद गोखले यांचे बरेचसे पूर्वायुष्य संपन्न झाले. त्यांच्या लहानपणी पुण्यामधले वाङ्मयीन वातावरण अक्षरशः बहराला आले होते. वाङ्मयाला प्राधान्य देणारी नियतकालिके तेव्हा पुण्यात प्रसिद्ध होत होती. चित्तपावनी कलंदर वृत्ती, लेखनाची उपजत देणगी आणि त्याला पुण्यातल्या शुद्ध वाङ्मयीन वातावरणाची अनुकूलता ह्याचा उत्तम

उपयोग गोखल्यांनी आपल्या उत्तमोत्तम कथा लिहिण्यासाठी करून घेतला आणि नवकथेच्या उगम स्थानाचे भाग्य गोखल्यांच्या नवकथेला प्राप्त झाले. भोवतीची वाङ्मयीन आवड असणारी मोठी माणसे आणि समृद्ध ग्रंथसंपदा यांच्या सहवासात गोखल्यांचे लहानपण पोसले गेले आणि अगदी लहान वयातच गोखले ह्यांच्या अंतःकरणात कथावाङ्मयाची बीजे रोवली गेली.

'मनोरंजन', 'रत्नाकर' ह्या वाङ्मयानी बहरलेल्या मासिकांचे एकत्रित बांधलेले अंक गोखल्यांच्या घरातच होते. त्यातल्या रास्त वाङ्मयाचा त्यांच्यावर खूप लहानपणी खोल संस्कार झाला. मामा श्री.बा.रानडे यांच्यामुळे ऐन तारुण्यात वि.स.खांडेकर यांची ओळख झाली. त्याचा सुपरिणाम असा झाला की, केसरीवाड्यात आणि कवी यशवंतांच्या घरात जे साहित्यिक एकत्र जमत, त्यांच्या वाङ्मयीन गप्पा गोखल्यांना सहजपणे ऐकायला मिळायच्या. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारखे अनेक दिग्गज गोखले यांनी अगदी लहान वयातच अनुभवले. वि.स.खांडेकर हे ऋषितुल्य संस्कारक्षम लेखक तर गोखल्यांचे आधारवड झाले.

गोखले जेव्हा स.प. कॉलेजात शिकत होते, तेव्हा १९३६ साली, वयाच्या सतराव्या वर्षी गोखल्यांची 'हेअर कटिंग सलून' ही पहिली कथा प्रसिद्ध झाली. समान हक्क मागणाऱ्या सुशिक्षित स्त्रीवर बेतलेल्या ह्या त्यांच्या पहिल्याच कथेने साहित्यविश्वात खळबळ माजली. नवकथेची ती एक छोटीशी सुरुवातच होती; परंतु गोखले ह्यांना त्या तरुण वयात न जाणवलेले त्यांच्या ह्या पहिल्या नवकथेमधले जीवनविषयक तत्त्वज्ञान, त्यांच्या भाग्याने त्या कथेतल्या तीव्र उपरोधाला जोजवत श्री.म.माटे ह्यांनी समजावून सांगितले. ते ऐकून गोखले तर हरखूनच गेले आणि त्या दिव्य क्षणानंतर त्यांचे कथाविश्व सहजपणे फुलातल्या गंधासारखे उमलू लागले. त्यांनी आपल्या उपजत कथाविश्वाला हलके हलके फुलवत ठेवायला जाणीवपूर्वक सुरुवात केली.

गोखले हे मूलतः विज्ञान शाखेचे विद्यार्थी होते. १९४० साली ते बी.एस्सी. पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. दिल्लीच्या ॲग्रिकल्चरल रिसर्च इस्टिट्यूटचा त्यांनी दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. अमेरिकेतल्या

'विस्कॉन्सिस विद्यापीठा'ची ॲग्रिकल्चरल जर्नालिझमची एम.एस. ही पदवी १९५७ साली प्राप्त केली. पुण्याच्या कृषी महाविद्यालयात १९४३ ते १९६३ अशी वीस वर्षे संशोधन आणि अध्यापन केले. त्यानंतर मुंबईच्या प्रसिद्ध धरमसी मोरारजी केमिकल कंपनीमध्ये खत विभाग प्रमुख म्हणून १९६३ ते १९७९ अशी सलग सोळा-सतरा वर्षे काम करून वयाच्या साठाव्या वर्षी गोखले निवृत्त झाले. सतत लेखनमग्न असणाऱ्या गोखले ह्यांनी एका कथालेखनाव्यतिरिक्त इतर कुठलाही वाङ्मयप्रकार हाताळला नाही, हे विशेष.

गोखले ह्यांचे कथा ह्या वाङ्मय प्रकारावर नितांत प्रेम होते. १ जानेवारी १९७२ रोजी त्यांचे 'कथाकार' नावाचे पुस्तक प्रकाशित झाले. भारतातल्या प्रमुख बारा भाषांमधील श्रेष्ठ कथाकारांचा सुरेख परिचय आणि त्यांच्या महत्त्वाच्या कथांचा अनुवाद यांचा या पुस्तकात समावेश होता. त्यांचे हे पुस्तक खूपच गाजले. कथालेखकांच्या भेटीगाठीतून निर्माण झालेला हा आगळावेगळा संग्रह मराठी अभिजात वाङ्मयात एक अनोखी वाट निर्माण करणारा ठरला. मराठी संवेदनशील, काव्यात्म वृत्तीवर पोसले गेलेले जे रसिक वाचक होते, त्यांच्या मनात भारतातल्या अन्य भाषांतल्या लेखकांविषयी एक आपुलकी निर्माण करणारा 'कथाकार' हा अनुवादित कथांचा संग्रह गोखले ह्यांच्या अभिजात रसिकतेची साक्ष देणारा ठरला.

ही गोष्ट आहे, १९८९ मधली. माझे प्रकाशक मित्र दिलीप प्रकाशनचे श्री. दिलीप वामन काळे ह्यांची फार इच्छा होती की, अरविंद गोखले ह्या सर्वोत्तम कथालेखकाचे निदान एखादे तरी पुस्तक आपल्याला प्रसिद्ध करायला मिळावे. श्री. काळे मला तसे सतत बोलून दाखवायचे. त्यांची ही श्रद्धेय भावना मी गोखले ह्यांना सांगितली आणि आश्चर्य म्हणजे, क्षणाचाही विलंब न लावता गोखल्यांनी होकार दिला. त्यांच्या ह्या औदार्यातून 'कथोपासक' सिद्ध झाले. कथाव्रती गोखले यांनी 'कथोपासक' ह्या संग्रहात आपल्या कथा न देता, समकालीन कथाकारांची जी स्नेहचित्रे सादर केली होती त्यांचा समावेश ह्या 'कथोपासक'मध्ये केला. ह्या 'कथोपासक'मध्ये गोखल्यांचे सहप्रवासी कथालेखक तर आहेतच; परंतु पंजाबी, पाकिस्तानी

आणि बांगलादेशीय कथाकारही आहेत. ह्या स्नेहचित्रांशिवाय सरोजिनी वर्मा हिचे शब्दचित्र, कथापूर्ती, कथाकार मंडळ अशा कथेच्या उपासनेच्या कार्यक्रमांवरचे लेखही 'कथोपासक' संग्रहात अंतर्भूत केलेले आहेत. थोडक्यात सांगायचे झाले तर एका श्रेष्ठ कथाव्रती लेखकाच्या आयुष्यात डोकावलेल्या इतर अनेक लेखकांचा, त्यांच्या घट्ट मैत्रीचा हा ऐतिहासिक दस्तऐवजच आहे. आश्चर्य म्हणजे मी जे अरविंद गोखले ह्यांच्या एकूणच कथाप्रवासाबद्दल प्रदीर्घ लेखन केले होते, त्याचाही अंतर्भाव गोखले यांनी 'कथोपासक'मध्ये केला आणि त्यांच्या दोस्तान्यात मला सामील करून घेतले होते... माझे 'वाल्मिक प्रकाशन' १९७६मध्ये मी जेव्हा सुरू केले तेव्हा माझी गोखले यांच्याशी पहिल्यांदा भेट झाली. 'मंजुळा' ह्या कथेवर मी नितांत प्रेम तर केले होतेच, परंतु मला गोखल्यांचे कथाविश्व खूप माझेच आहे, असे वाटायचे. आश्चर्य म्हणजे पहिल्या भेटीतच ह्या माझ्या आवडत्या कथालेखकाने त्याचे 'समांतर' हे पुस्तक प्रसिद्ध करायला दिले होते, हे मी कधीच विसरणार नाही.

गोखले ह्यांचा पहिला कथासंग्रह 'नजराणा' १९४४ साली प्रसिद्ध झाला तेव्हा त्यांनी ऐन पंचविशीत प्रवेश केला होता. त्यानंतर गोखल्यांनी कधी मागे वळून पाहिलेच नाही. त्यांचे एकंदर पंचवीस कथासंग्रह प्रकाशित झाले. त्यांचा शेवटचा कथासंग्रह 'उजेडाचे वेड' १९७९मध्ये प्रकाशित झाला होता. गोखल्यांचे लघुत्तम कथांचे तीन आणि दीर्घकथांचे दोन संग्रह प्रकाशित झाले होते. त्यांचा कथा-लेखसंग्रह 'समांतर' मी वाल्मिक प्रकाशनातर्फे १९७७मध्ये  प्रकाशित केला होता. गोखले असे भाग्यवान लेखक होते की त्यांच्या निवडक कथांचे संपादन केलेले सात संग्रह प्रकाशित झाले. गोखले ह्यांनी काही अमेरिकन कथांचे मराठीत रूपांतर करून त्या प्रसिद्ध केल्या होत्या. आश्चर्य म्हणजे त्यांनी ना.सी.फडके, वामन चोरघडे, व्यंकटेश माडगूळकर ह्या समकालीन श्रेष्ठ कथाकारांच्या सर्व कथांचा रसिकतेने आस्वाद घेत त्यांच्या निवडक कथा निवडून त्याला मर्मग्राही प्रस्तावना लिहून तीन संग्रह प्रकाशित केले होते. इतकेच नव्हे तर १९५९ ते १९६३ अशी सलग पाच वर्षे मराठी नियतकालिकांमधून आणि दिवाळी अंकांमधून प्रसिद्ध

होणाऱ्या आणि त्यांना भावलेल्या कथांना एकत्रपणे गुंफून वार्षिक अंक प्रकाशित केले.

त्यांनी अमेरिकेचा प्रवास केला होता. ते प्रवासवर्णनसुद्धा पुस्तकरूपात प्रकाशित झाले. गोखले यांनी एखाद्या व्रतस्थ योग्याप्रमाणे कथेचा आणि एकूणच कथावाङ्मयाचा आयुष्यभर वेध घेतला, मराठी कथा जनमानसात रुजवली आणि अखंडपणे कथेच्या नादात रममाण झाले. त्यांच्या एकूणच कथेचा वेध घेणारे अनेक लेख वाङ्मयीन मासिकांत प्रकाशित झाले. त्यांच्या नावावर सुमारे पन्नास पुस्तके आहेत. साहित्यात रममाण राहूनही साहित्यिक विश्वापासून ते आयुष्यभर काहीसे अलिप्तच राहिले. एकटेपण अनुभवत त्यांनी आयुष्यभर कथालेखन केले. गोखले नेहमी म्हणत की, मी कथेशी गांधर्व विवाह केला आहे. कथा ह्या साहित्यप्रकारावर निस्सीम प्रेम करणारा गोखल्यांसारखा दुसरा एखादा समर्थ लेखक फार क्वचितच भेटेल.


संगीतावर अतोनात प्रेम करणारे अरविंद गोखले माझ्या आयुष्यात माझ्या ऐन पंचविशीत आले आणि त्यांच्या स्नेहाची अपूर्व साथ मला त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत लाभली. गोखले अत्यंत ऋजु व्यक्तिमत्त्वाचे होते. वयाच्या ७३व्या वर्षी एशियाड बसच्या अपघातात त्यांच्या रसिल्या आयुष्याचा शेवट झाला, तो दिवस होता, २४ ऑक्टोबर १९९२. ज्यांना साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मानाने मिळायला हवे होते ते अरविंद गोखले गेले. त्याचा मला विलक्षण धक्का बसला होता. ज्यांना साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मानाने मिळायला हवे होते ते अरविंद गोखले गेले. त्याचा मला विलक्षण धक्का बसला होता.

- **वामन देशपांडे**

**मोबाईल - ९३२४६१५०७७**

◆

# अभिप्राय




## पावनखिंड

**लेखक :** रणजित देसाई

**पृष्ठसंख्या :** १६४

**किंमत :** १५०/-

**अतुल्य पराक्रमाची कथा...**

छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेताच मान ताठ होते. छाती अभिमानाने फुलते. अंगात वीरश्री संचारते. अशा रयतेच्या राजाच्या जीवनाकार्याचा सखोल अभ्यास करून रणजीत देसाईंनी 'पावनखिंड' ही एका वीर योद्ध्याची शौर्यगाथा लिहिली आहे. ज्याने आपल्या महाराजांसाठी आपले प्राण पणाला लावले. मरतानादेखील महाराजांना मुजरा करूनच श्वास सोडला अशा बाजीप्रभू देशपांडे यांची स्वराज्यनिष्ठा, स्वामिनिष्ठा आणि अतुल्य पराक्रमाची अद्भुत कथा असलेले हे पुस्तक.

एका लढाईसाठी शत्रू म्हणून समोर आलेल्या बाजींना शिवरायांनी वडिलांचा मान देऊन आपलेसे केले. बाजींचे थोरले बंधू फुलाजी हेसुद्धा बांदलांच्या सैन्यसहित शिवरायांकडे आले आणि अखेरच्या श्वासापर्यंत शिवरायांचेच राहिले. हे पुस्तक वाचताना एकनिष्ठ आणि स्वामीभक्त योद्ध्याची जिद्द पाहून

खरोखर मन भरून येते.

'भाऊ जगण्याचं सार्थक केलंस! गेलास! म्हणजे जातोस कुठं! तू मोठा ना? तुझा मान पहिला! मी मागून आलोच! बाजीच्या थोरल्या भावाचा म्हणजे फुलाजींचा खिंड लढवताना मृत्यू झाला, त्यावेळचे बाजींचे हे उद्‌गार त्यांच्या मनाचा मोठेपणा दर्शवतात. बाजींच्या वीरमरणाच्या वेळेचा प्रसंग वाचताना अश्रू अनावर होतात. राजा असावा तो शिवरायांसारखा आणि सहकारी असावा तो बाजी, फुलाजीसारखा याची जाणीव हे पुस्तक वाचताना होते.

'शिवाजी राजा साधं पोर नाही. देवमाणूस आहे. त्याच्या मागं देवीचं बळ आहे. माणसांची पारख आहे. माणसानं एकदा त्याच्याबरोबर बोलावं आणि कायमचा गुलाम व्हावं अशी त्याची करामत आहे.' हे फुलाजींचे उद्‌गार शिवरायांविषयीचे प्रेम, कौतुक आणि आदर स्पष्ट करतात. या शिवाजी राजांसाठी बाजी, फुलाजींनी शर्थीने घोडखिंड लढवली. जिला 'गजाखिंड' ही म्हटले जात होते. त्या बाजीच्या बलिदानाने पावन झालेल्या खिंडीला शिवरायांनी 'पावनखिंड' हे नाव दिले त्याचप्रमाणे सिद्दी जोहरच्या वेढ्यातून सहीसलामत निसटून खेळणा किल्ल्यावर महाराज पोहोचले. त्यावेळी 'खेळण्या'ला त्यांनी 'विशाळगड' हे नाव दिले.

बाजीप्रभूंमुळे महाराजांना अनेक मोठ्या संकटांना सामोरे जाण्याचे बळ मिळाले होते. अफजलखानाची भेट, सिद्दीच्या वेढ्यातून सुटका या महत्त्वाच्या घटनांमध्ये बाजींनी शिवरायांना कशी मदत केली ते या पुस्तकात सविस्तरपणे कथन केले आहे. राजा असला तरी त्याचे काही निर्णय चुकू शकतात आणि ते सुधरवण्यासाठी त्याला बाजींसारखे सहकारी हवे असतात याचा अनुभव ही शौर्यगाथा वाचताना येतो. हेच सहकारी पुढे संकटातून सुटण्यासाठी राजाला मदत करतात. बाजी, फुलाजींनी स्वराज्यासाठी आपल्या या राजाला मरेपर्यंत सहकार्य केले. म्हणून मरतानासुद्धा राजांना मुजरा करूनच प्राण सोडणाऱ्या या वीर योद्ध्यांना आणि शिवरायांना माझा मानाचा मुजरा!

**-ऋचा सिनकर**

**दैनिक सामना, ६.५.२०१८**

◆

## प्रासंगिक

**(पावसाळ्यानिमित्त-शान्ता शेळके यांच्या 'रंगरेषा' या ललित लेखसंग्रहातून )**

# रिमझिम पाऊस पडतो बाई

पाऊस मुसळधार पडतो आहे आणि मी माझ्या खोलीत खिडकीशी बसून त्याचा आनंद लुटते आहे. पावसाच्या धारांची एक संथ लय लागली आहे आणि ती खोलवर मनाला, माझ्या व्यक्तित्वाच्या अगदी गाभ्याला जाऊन भिडते आहे.

घराभोवती पावसाच्या धारांनी जणू एक संरक्षक पिंजरा उभा केला आहे आणि निदान या घटकेपुरते तरी त्याने बाहेरच्या जगापासून मला अलग करून टाकले आहे. यावेळी फक्त मी आणि हा पाऊस. आमच्या दोघांमध्ये आणखी कुणीही तिसरे नाही आणि पावसाशी झालेला हा एकांत मला अगदी हवाहवासा वाटत आहे. तसा पावसाचा सामुदायिक पातळीवरून अनुभव मी अनेकदा घेतला आहे.

रस्त्यावरच्या गर्दीतून चालताना, हॉटेलात बसून कढत चहा पिताना, भलत्या वेळी पावसात सापडल्यामुळे एखाद्या घराच्या वळचणीखाली उभे राहून पावसापासून स्वत:चा बचाव करताना अनेक वेळा मी पावसाला भेटले आहे. त्याच्या वर्षावात भिजून चिंब झाले आहे आणि भलत्या वेळी भलत्या जागी त्याने मला गाठून माझी गैरसोय केल्यामुळे चिडून मी त्याला मनातल्या मनात शिव्याशापही दिले आहेत. पण आता आपल्या घराच्या निवाऱ्यात, सुरक्षित जागी बसून, खिडकीतून हा पाऊस बघताना माझे मन आनंदाने भरून येत आहे. हा पाऊस सर्वांसाठीच पडतो आहे हे मला ठाऊक आहे आणि तरी या क्षणी तो माझा, फक्त माझा आहे. आणि फक्त माझ्यासाठीच

तो असा भरभरून कोसळतो आहे. हा पाऊस बघताना शास्त्रीय संगीत सादर करणाऱ्या गायकाची मला आठवण येते.

खरे तर तो कलाकार मैफलीला हजर राहिलेल्या सर्व श्रोत्यांसाठी गात असतो, पण ते गाणे ऐकताना एखादा क्षण असा येतो की तो हॉल, तो दिव्यांचा झगमगाट, रसलुब्ध श्रोत्यांची ती रंगलेली चित्तवृत्ती, त्यांच्या मुखातून घटकेघटकेला दिली जाणारी दाद- साऱ्यांचा आपल्याला विसर पडतो आणि तो गायक फक्त आपल्यासाठी गात आहे असा एक विलक्षण प्रत्यय येतो. या क्षणी खिडकीतून हा पाऊस बघताना मला अगदी नेमका तोच अनुभव येत आहे. वाटते, या क्षणी जगात फक्त मी आणि हा पाऊस आहे. दुसरे तिसरे कुणीसुद्धा नाही.

पण नाही कसे? मी आणि पाऊस आम्ही दोघेच एकमेकांच्या संगतीचा आनंद अनुभवत असताना आणखी कुणीतरी अगदी सहजगत्या तिथे आले आणि त्या व्यक्तीच्या आगमनाने आनंद कमी होण्याऐवजी तो एकदम कितीतरी पटीने वाढला. कोण बरे ही व्यक्ती?

ती कविता, आयुष्यातल्या कोणत्याही बऱ्यावाईट क्षणी, सुखदु:खाच्या घटकेला अगदी न चुकता आठवणारी, साक्ष देणारी, आनंद वाढवणारी आणि दु:खाची तीव्रता कमी करणारी कविता. आता या पर्जन्यानुभवांतही ती नकळत सामील झाली आहे आणि त्या अनुभवाचे अनेक पैलू दाखवणाऱ्या, त्याचा आनंद अधिक उत्कटतेने माझ्या प्रत्ययाला आणून देणाऱ्या कितीतरी जुन्या नव्या कवींच्या काव्यपंक्ती ती तत्परतेने मला सादर करते आहे.

माडगूळकरांची एक खूप जुनी कविता मनाच्या तळातून उसळून अचानक वर येते. कविताच, चित्रपटातले गीत नव्हे. फार वर्षांपूर्वी 'मौज' च्या दिवाळी अंकात ही कविता आली होती. तिचे शीर्षक होते, 'स्नानगृहातील गीत.' पण गीत म्हटले तरी होती ती कविताच आणि फार सुंदर कविता होती. पावसात स्नान करणाऱ्या एका वेलीचे शब्दचित्र माडगूळकरांनी त्या कवितेत रंगवले होते. तिच्या प्रारंभीच्या ओळी अशा होत्या-

*रिमझिम पाऊस पडतो बाई*
*भिजतो मांडव, भिजते जाई!*

पावसाची अखंड रिमझिम चालू आहे. बागेतला मांडव भिजत आहे आणि त्या मांडवावर चढवलेली जाईची वेलही भिजते आहे. भिजून शहारते आहे आणि आपले हे ओलेचिंब लावण्य कुणी बघत तर नसेल ना या स्त्रीसुलभ शंकेने थरथर कापतेही आहे. वेल कसली? ही तर स्नानगृहातील अबोध कुमारिकाच. माडगूळकर पुढे म्हणतात -

पानोपानी ओली सळसळ
करी गुदगुल्या वारा अवखळ
कळीकळीचे शहारते दळ
सुगंध आतिल देइ जांभई!

स्नानगृहात स्नान करणाऱ्या या वेलीच्या खोड्या काढतो आहे वारा. तो अवखळपणे तिला गुदगुल्या करतो. वेल अगदी विलक्षण लाजून जाते, तिची कळीकळी- नव्हे कळीकळीच्या पाकळ्या सुद्धा शहारतात. आणि आत दडलेला सुगंध आळसावल्यासारखा होऊन जांभई देतो. नंतर काय घडते?

बहरून येता अवघी अंगे
आनंदावर गंध तरंगे
खुणवून वारा उन्हास सांगे
एक कवडसा चोरून पाही!

जाईची वेल झिमझिमत्या पावसात स्नान करते. भिजून चिंब होते. तिची अंगे जणू बहरून येतात. स्नानानंतर तिच्या सर्वांगातून सुगंध दरवळतो. स्नानाचा आनंद भोगणारी ती वेल साऱ्यांपासून स्वत:ला लपवू बघते. पण तिचा तो प्रयत्न विफल होतो. तिला गुदगुल्या करणारा अवखळ, थट्टेखोर वारा उन्हालासुद्धा त्या वेलीकडे बघण्यास खुणावून सांगतो. मग एक कवडसा चोरून मांडवावरच्या पालवीतून आत घुसतो. असे हे सारेजण स्नानगृहातल्या त्या वेलीचे ओले सौंदर्य बघतात. पण त्यात कुठेही अभद्र पापवासना नाही. आहे तो सारा निष्पाप, निरागस, खेळकर आनंद आणि एका जवळिकीच्या भावनेने केलेली वेलीची निर्मळ मस्करी. पावसात भिजणारा मांडव आणि त्यावर चढवलेली, पावसात भिजणारी जाईची वेल यांतून माडगूळकरांनी एका स्नानमग्न कुमारिकेचे, तिच्या भिजलेल्या देहाचे

आणि उत्फुल्ल पण लाजऱ्या मन:स्थितीचे जे चित्र रेखाटले आहे ते किती सुंदर, किती चित्रदर्शी, किती प्रत्ययकारी आहे.

पण आता माझ्याजवळ आलेल्या कवितेने केवळ ही एकच जुनी आठवण जागी केली असे नाही. पावसाशी या ना त्या रीतीने निगडित असलेल्या आणखी कितीतरी ओळी मला भराभर आठवू लागल्या. कोकण मी कित्येक वर्षे पाहिलेले नव्हते. 'हिरवे तळकोकण' सारख्या कवितेतून कोकणचे रूपदर्शन मला झाले होते. पण ही कविता लिहिणारे चिपळूणचे कवी माधव यांचेच समकालीन आणि चिपळूणचेच रहिवासी 'आनंद' या नावाने कवितालेखन करणारे वि. ल. बर्वे यांच्या एका कवितेतल्या पुढील ओळी मला वाचताक्षणीच फार आवडल्या होत्या. आजचा पाऊस बघताना कवितेने मनातल्या या ओळींना जाग आली. ओळी अशा आहेत:-

सळ सळ सळ पाऊस कोसळे
हिरवाळून हे मळे
उमलले सोनटक्क्याचे कळे
अंगणात साचल्या जळावर
पागोळी सळसळे
बुडबुडा इकडून तिकडे पळे!

खरे तर ही कविता मी पहिल्याप्रथम जेव्हा वाचली तेव्हा कोकण जसे मी पाहिलेले नव्हते त्याप्रमाणे सोनटक्क्याची फुलेही मी बघितली नव्हती. पण आनंद कवींची कविता वाचली आणि पावसाचा विलक्षण, उत्कट, पंचेंद्रियांनी आस्वाद घ्यावा असा अनुभव आला. सळसळ कोसळणारा पाऊस, हिरवेगार झालेले मळे आणि उमलून आपला सुगंध सर्वत्र उधळणारे सोनटक्क्याचे कळे -त्यांनी एकाच वेळी नाद, रंग, गंध अशा आपल्या ऐंद्रिय संवेदनांना जाग येते आणि पावसाचा प्रत्यय अधिक अर्थपूर्ण, समृद्ध होतो. पुढे कोकण जेव्हा प्रत्यक्षात पाहिले, तिथला सळसळ कोसळणारा पाऊस अनुभवला तेव्हा आनंद कवींची कविता साक्षात माझ्या पुढ्यात आली आहे असे वाटले.

या कवितेतल्या 'पागोळया' शब्दावरून आणखी एक जुनी आठवण मनात जागी झाली. एक कविता, कवी जुन्या पिढीतला.

त्यांचे नाव हरि सखाराम गोखले. त्यांची ‘पागोळ्या’याच शीर्षकाची कविता आहे. तिच्या प्रारंभीच्या ओळी अशा आहेत-

पागोळ्या गळती झरझर कशा या पांढऱ्या गोजिऱ्या
गेहाच्या निटिलावरी सुबकशा मुंडावळ्या बांधिल्या
जेथे दीन दरिद्रतेसह आम्ही संकोचुनी राहतो
त्या गेहावरूनी प्रवाह रजता आता तुझा वाहतो!

कविता आठवली आणि कोसळणाऱ्या पावसाला जणू आणखी एक परिमाण प्राप्त झाले. हा पाऊस गरिबाच्या घरावर कोसळतो आहे. छपरावरून पांढऱ्याशुभ्र गोजिरवाण्या पागोळ्या गळत आहेत. त्या बघताना कवीच्या मनात येते, या पागोळ्या किती सुंदर दिसतात. घराच्या कपाळावर या सुबक मुंडावळ्याच जणू कुणी बांधल्या आहेत!

पागोळ्यांच्या धारा म्हणजे मुंडावळ्यांचे मोत्याचे हार ही कल्पना जेवढी नावीन्यपूर्ण तेवढीच हृद्य आहे. पण कवितेच्या पुढच्या ओळी अधिक हृदयस्पर्शी आहेत, कवी दरिद्री आहे. त्याचे कुटुंब एका लहानशा घरात राहते आहे. कारण त्या गर्दीतच दारिद्र्यही वसतीला आले आहे. पण पावसाने, पावसाच्या वाहणाऱ्या पागोळ्यांनी त्या गरीब घराला अचानक एक वैभव प्राप्त करून दिले आहे. कवी म्हणतो, ‘ज्या लहानशा घरात आमच्या दैन्यासह आम्ही कसेबसे अडचणीत दिवस काढतो आहोत त्यावरून हे पावसा, तुझ्यामुळे आज प्रत्यक्ष रुप्याच्या धारा कोसळत आहेत!’

बाहेर पडणाऱ्या पावसाने आणि त्याच्याबरोबर अकस्मात प्रकट झालेल्या कवितेने मनात अशी कितीतरी सुंदर कवितापंक्तींना जाग आली. संस्कृत श्लोक, जुन्यानव्या मराठी कवींच्या कविता, जपानी हायकू आणि चिनी प्रेमगीते- एकापाठोपाठ एक सारे माझ्या भेटीला आले. पाऊस अजूनही कोसळत होता. मी स्वत:शीच गुणगुणले ‘रिमझिम पाऊस पडतो बाई!

◆

# मयुरा रे झुलवित ये रे पिसारा

काही मराठी भावगीतं  रसिकांच्या मनात असतात. ओठांवर असतात; पण त्या गीतांचं लेखन आणि संगीत दिग्दर्शन कुणी केलं आहे, हे मात्र फार थोड्या रसिकांना माहिती असतं. 'मयुरा रे झुलवित ये रे पिसारा,' 'मन माझे भुलले', 'सखी सांज उगवली,' 'सांग प्रिये, सांग प्रिये' ही रामदास कामत यांनी गायलेली चार भावगीतं अशीच रसिकप्रिय आहेत; पण या भावगीतांच्या निर्मात्या आणि संगीतकार वीणा चिटको आहेत, हे फार थोड्या लोकांना माहिती असेल. मा. कृष्णराव यांच्या त्या कन्या. त्यामुळे वीणाताईंना संगीताचा वारसा वडिलांकडूनच मिळाला. ही चार भावगीतं मराठी भावगीत-संगीतात आपल्या वेगळेपणाने उठून दिसतात.

कोणत्याही संवेदनशील व्यक्तीला पाऊस आणि पावसाळ्यातील रम्य निसर्ग भावतो. वीणाताईंनाही तो भावला आणि त्यांच्या लेखणीतून शब्द उतरले :

*अंबरातल्या निळ्या घनाची शपथ तुला*
*मयुरा रे झुलवित ये रे पिसारा*

पावसाचं आणि मोराचं नातं अतूट आहे. पाऊस आल्यानंतर मोराला पिसारा फुलवून नाचताना पाहणं हा एक अवर्णनीय आनंद असतो. म्हणून वीणाताईंनी मोराला पिसारा झुलवण्याचं आवाहन केलंय. त्या पुढे लिहितात :

*जलधारेच्या वर्षावाने, हिरव्या कोमल अनुरागाने*
*वसुंधरेच्या श्वासाने हा गंधित होई वारा*

डोळ्यांना आणि मनाला भावणारी हिरवाई, मातीच्या ओल्या वासाने गंधित झालेला वारा, अशा या पावसाळ्यातल्या निसर्गामुळे सगळीकडे चैतन्य पसरलेलं असतं आणि ते चैतन्य वीणाताईंनी आपल्या

लेखणीत नेमकं पकडलं आहे.

वीणाताईंनी असाच एक जन्मजन्मांतरीचं नातं सांगणारा क्षण आपल्या लेखणीतून साकारलाय 'मन माझे भुलले' या भावगीतातून. या गीतातील प्रेमिक म्हणतो :

*मन माझे भुलले*
*वनराईच्या पानामधुनी काल तुला पाहिले*
*अंतरीचे गीत उमगले*
*शतजन्मीचे नाते जुळले*

*वचन तुला दिधले*

तिच्या प्रथम दर्शनाचा क्षण... इथेही वनराईच्या रूपाने निसर्ग आहेच. वनराईच्या पानांमधून तिला पाहिलं आणि त्याचं मन भुललं.
त्या क्षणी अंतरीच्या गीताची ओळख त्याला पटली आणि तिच्याशी त्याचं शतजन्मीचं नातं जुळलं...त्याने तिला वचन दिलं...जन्मजन्मांतरी साथ निभावण्याचं. निसर्ग, सूर आणि भावना यांचा मिलाफ या गीताचं सौंदर्य वाढवतो.

आणि मग तिच्या सान्निध्यातली एक रमणीय संध्याकाळ आणि त्या वेळी त्याच्या मनात दाटून आलेल्या भावनांचं एक सुंदर चित्र वीणाताई रेखाटतात. त्या लिहितात :

*सखी सांज उगवली*
*क्षितिज मोहुनी, किरण पाहुनी*
*नभी आज विहरली*
*अनुराग रंगला, निशा उमलली*
*जाणून आज प्रीती आपुली*
*हृदयात बहरली*

सखे, सांध्यरंग क्षितिजावर उधळलेत, सूर्याची मावळतीची किरणं त्यावर पडली आहेत. अशा विलोभनीय संध्याकाळी तू माझ्याबरोबर आहेस आणि आपली प्रीत बहरली आहे.

पण जेव्हा विरहाचा क्षण येतो, त्यावेळी तो म्हणतो :

*सांग प्रिये, सांग प्रिये, घन भरून आले*
*पैलतीरी या वेळी, मेघ आळविले*

*दशदिशा वादळी, अंतरी काजळी*
*संधिकाली या इथे अंधारून आले*

संध्याकाळ तीच आहे; पण तिच्या नसण्याने ती उदास भासते आहे. ढग भरून आलेत. दशदिशा वादळी भासताहेत, मन काजळलंय आणि अंधारून आलंय...विरही मन आणि झाकोळलेला निसर्ग यांचा हा कोलाज वीणाताईंच्या लेखणीतून किती सहजपणे उतरलाय.


तर ही चारही गीतं भावात्मतेचा प्रत्यय देणारी आहेत. या गीतांच्या शब्दसौंदर्याला, भावसौंदर्याला अधोरेखित करणारं संगीतही वीणाताईंचं आहे. त्यांनी आधी ही गीतं लिहिली आणि मग त्यावर स्वरसाज चढवला, की आधी त्यांना चाल स्फुरली आणि त्यावर त्यांनी शब्द लिहिले, हे सांगणं कठीण आहे; पण ही गीतं ऐकल्यानंतर असं वाटतं की, त्यांना आधी चाल स्फुरली असावी किंवा एखादी सुरावट त्यांच्या मनात निर्माण झाली असावी आणि मग त्यांनी शब्द लिहिले असावेत. दुसरी गोष्ट म्हणजे रामदास कामत यांना डोळ्यांसमोर ठेवून त्यांनी या गीतांच्या चाली बांधल्या असाव्यात असं वाटावं, इतकी ती गाणी त्यांच्या स्वरात चपखल बसली आहेत. कामतांचा भरदार आवाज, त्यांच्या आवाजाची घनता आणि त्यांचा स्वरावरचा ताबा यामुळे या गीतांचं सांगीतिक सौंदर्य तर वाढलंच; पण भावसंगीताला एक वेगळं परिमाण त्यामुळे लाभलं, असं म्हणायला हरकत नसावी. या चारही गीतांच्या लयींतून आणि वाद्यमेळातून गीताचा जो भावात्म परिणाम साधला जातो तो संगीतकार म्हणून वीणाताईंचं श्रेष्ठत्व दर्शविणारा. एकूणच भावगीतांच्या क्षेत्रात गीतकार आणि संगीतकार म्हणून वीणाताईंचं हे योगदान अल्प असलं तरी ते चिरस्मरणीय आहे.

**-अंजली पटवर्धन**

◆

# स्वराज्यसेवक खंडो बल्लाळ

**-रा.वा.शेवडे गुरुजी**




बाळाजी आवजींच्या मुलांना वाघाच्या तोंडी देण्याची मुदत अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपली होती. गुरुवारी संध्याकाळी सरकारी सैनिक खंडू-निळूंना आपल्या ताब्यात घेणार होते.

रविवारचा सारा दिवस जानकीआत्याने महत्त्वाच्या गाठीभेटीत घालविला. महाराणी येसूबाई दर सोमवारी गडावरील तटाच्या बाजूच्या शिवालयात शिवदर्शनाला सकाळी नऊच्या सुमारास जातात आणि मंगळवारी त्याच वेळी कुलस्वामिनी भवानीमातेच्या मंदिरात येतात, अशी माहिती जानकीआत्याने मिळविली.

खंडू-निळूला घेऊन दुसऱ्या दिवशी सकाळी शिवमंदिरात महाराणी येसूबाईंना गाठायचे आणि त्यांच्या पायावर ही दोन्ही पोरे ठेवायची, असा बेत तिने केला.

सोमवार उजाडला. जानकीआत्याने खंडू-निळूला चांगले स्नान घातले. घरच्या शंकराची पूजा त्यांच्याकडून करवून घेतली. त्या पोरांना घेऊन ती झपाझपा तटाकडील शिवमंदिराच्या दिशेने चालली.

महाराणी येसूबाई अद्याप यावयाच्या होत्या. एका झुडपाआड जानकीआत्या खंडू-निळूंना घेऊन बसली. थोड्या वेळाने महाराणी

येसूबाईंचा मेणा आला. दोन भोई आणि दोन शरीररक्षक घोडेस्वार बरोबर होते. मेणा पुढे आणि जानकीआत्या मागे असे ते चालले. मेण्यातून महाराणी येसूबाई उतरल्या. रक्षक घोडेस्वारांनी त्यांना मुजरा ठोकून दोघे आपले घोडे घेऊन बाजूला गेले. भोयांनी मेणा बाजूला लावून त्याजवळ ते बसले. महाराणी येसूबाई आत पूजेत मग्न झाल्या. डोळे मिटून त्या ध्यान करीत होत्या. शंभूमहादेवाला साकडे घालीत होत्या.

इतक्यात खंडू-निळूंना घेऊन जानकीआत्या मंदिराच्या आवाराजवळ आली. तिला भोयांनी अडविले. भोई म्हणाला,

''बाई, आत महाराणी येसूबाईसाहेब आहेत.''

''म्हणजे आम्हाला देवदर्शनाची बंदी म्हणा की!''

''नाही बाई, तसं नाही. पूजा आटोपून महाराणी येसूबाईसाहेब बाहेर येईपर्यंत आम्ही तुम्हाला आत सोडणार नाही.''

''बरं बाबा. त्यांचंच राज्य आहे. ज्यांचं राज्य त्यांचा कायदा. आम्ही आपलं इथं बसून देवाचं नाव घेतो. तसं म्हटलं तर–''

''काय म्हटलं तर, बाई?''

''देव भक्तीला पावतो. इथून भक्तिभावानं त्याला नमस्कार केला तरी पावतो. अगदी आत, त्याच्या पायाजवळ बसून पूजाप्रसादाचा थाटमाट केला नि मन एकाग्र नसलं तर–''

या संवादानं महाराणी येसूबाईंच्या ध्यानधारणेत बाधा आली. जे मागायचे ते झटपट मागून त्या माघारी फिरल्या. जानकीआत्याच्या संवादातील शेवटचा थोडा भाग त्यांनी स्पष्टपणे ऐकला आणि कुतूहलाने त्यांनी विचारले,

''बाई, कोण तुम्ही?''

''एक अभागिनी.''

''तुम्हाला काय हवंय?''

''ते तुम्ही देऊ शकणार नाही.''

''पण काय हवंय ते सांगितल्याशिवाय होय-नाही मी कसं म्हणू?''

''आणि पटलं तरी तुम्ही होय म्हणाल, याची मला खात्री नाही.''

जानकीबाईंच्या या वाक्याने दोन्ही भोई बिथरले आणि ते ताठ मान

करून दक्ष राहिले. महाराणी येसूबाईंनी भोयांना शांत राहण्याचा इशारा दिला आणि त्या जानकी आत्याला म्हणाल्या,

''बोला आजीबाई, चांगलं मन मोकळं करून बोला.''

''त्यासाठी तर मी या पोरांना घेऊन आले आहे.''

''किती सुंदर, बाळसेदार आणि गोंडस पोरं आहेत ही! पण तुमच्या मागण्याशी या पोरांचा काय संबंध?''

''महाराणीजी, बाळाजी आवजींची ही दोन दुर्दैवी पोरं आहेत. हा चौदा वर्षांचा खंडू आणि दहा वर्षांचा निळू. सुक्याबरोबर ओलं जळावं, तसं हुकुमाचे ताबेदार म्हणून शाहजादा अकबराला पत्र धाडल्यावरून बाळाजी आवजींना, त्यांच्या भावाला आणि या मुलांच्या सज्ञान मोठ्या भावाला देहान्ताची सजा दिली गेली आणि उद्याच्या गुरुवारी तुमचे सरकारी सैनिक या दोन निष्पाप पोरांना वाघाच्या तोंडी देण्यासाठी ताब्यात घेणार आहेत.''

''अरेरे!''

इच्छा नसतानाही महाराणी येसूबाईंच्या तोंडून उद्गार गेले.

''थोरले छत्रपती न्यायनिष्ठुर होते; पण ते अपराध्याचा अपराध सिद्ध झाल्यावरच त्याचा कडेलोट करीत. केवळ बाळाजी आवजींच्या पोटी जन्म हाच अपराध या मुलांनी केला आहे. महाराणीजी, न्याय म्हणा नाहीतर भीक म्हणा, देहान्ताची शिक्षा कमी करून या पोरांना वाटल्यास हद्दपार करा. उद्याच्या उद्या मी त्यांना घेऊन विदर्भात जाईन.''

''पण बाई, तुम्ही कोण?''

''मी त्या बाळाजी आवजींची सगळ्यांत मोठी बहीण. माझे पती आणि दोन मुलं छत्रपतींच्या सेवेत कामी आले आहेत, याचा अभिमान बाळगणारी मी मराठी स्त्री आहे. महाराणीजी, या पोरांना मी वाढवीन आणि बापापेक्षा स्वराज्य श्रेष्ठ आहे अशी शिकवण त्यांना देऊन पुन्हा स्वराज्याच्या सेवेला अर्पण करीन. महाराणीजी, मी न्याय मागितला; पण या वयात न्याय मागायलाही माझ्याजवळ बळ नाही. एवढी घालाल का भीक मला?''

''बाई, उद्या उत्तरेकडे तोंड करून असलेल्या मधल्या मोठ्या भवानीच्या मंदिरात मला सकाळी याच वेळी भेटा. तुमचं म्हणणं मला पटलं असलं तरी यश हा शंभू महादेवच देणार आहे.''

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी नऊच्या सुमारास जानकीआत्याची आणि महाराणी येसूबाईंची भवानीच्या मंदिरात भेट झाली.

लवून मुजरा करून जानकीआत्या म्हणाल्या,

''महाराणीसाहेब, केवळ भवानी मातेच्या नव्हे, तर आपल्याही दर्शनाला मी आले आहे. ही दोन्ही पोरं आपल्या पायांवर घालण्यास आपली अनुमती आहे काय?''

''बाई, स्वारींनी या पोरांना शिक्षा माफ केली आहे. पोरं मोठी नशिबवान आहेत. आम्ही स्वत: जातीनं त्यांच्या संरक्षणाची आणि ती सज्ञान होईपर्यंत त्याच्या चरितार्थाची हमी घेतली आहे. इतकेच नव्हे तर बाळाजी आवजींच्या कुटुंबात आता जी कुणी माणसे असतील, त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही. तुम्ही आता तुमचा निर्णय घ्या.''

''निर्णय?''

''होय, निर्णय. त्यांना इथं ठेवा किंवा त्यांना विदर्भात घेऊन चला. बाळाजी आवजींच्या स्वराज्यसेवेबद्दल आम्ही लौकिक ऐकला आहे. शंभू महादेव कृपा करो आणि झालं-गेलं विसरून ही पोरं सच्ची स्वराज्यसेवक म्हणून नावलौकिकास येवोत.''

जानकीआत्याने महाराणी येसूबाईंच्या पायावर कृतज्ञतापूर्वक त्या पोरांना घातले आणि आपणही नतमस्तक होऊन आनंदाश्रू ढाळले.दुपारचे भोजन आटोपून संभाजी महाराजांनी सहकाऱ्यांना निरोप दिला. वामकुक्षी घेण्याकरिता ते महालात गेले. महाराणी येसूबाई पंख्याने वारा घालीत होत्या. डुलकी लागली आहे अशा समजुतीने महाराणी निघून गेल्या. संभाजी महाराजांना झोप लागली नव्हती. बळेच डोळे मिटून ते झोप आणण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांचा जीवनपट त्यांच्या मन:चक्षूंसमोरून झरझरा जात होता. त्यांची झोप उडून गेली. स्वस्थ पडण्याचा त्यांना कंटाळा आला. अस्वस्थपणे या कुशीवरून त्या कुशीवर ते झाले. अखेर कंटाळून ते उठले आणि महालातून बाहेर येऊन सदरेवर बसले.

कोण्यातरी सेविकेने महाराज महालातून उठून सदरेवर गेल्याची बातमी महाराणींना सांगितली. त्या क्षणाचाही विलंब न करता सदरेवर आल्या. पहारेकऱ्याला इशारा करताच तो दूर निघून गेला. महाराणी महाराजांना

म्हणाल्या,
''झोप आली नाही का?''
''कशी येणार? सुखाची निवांत झोप यायला नशीब लागतं.'' महाराज उत्तरले.
''आता तर आपलं नशीब निष्कंटक झालंय. तशी तक्रार करायला आपणास मुळीच जागा नाही.''
''महाराणी, आपण आमच्याशी नुसतं लग्नच केलंत. या कमनशीब संभाजीचं मन कुणालाच समजलं नाही. कुणी समजून घेण्याचा प्रयत्नही केला नाही. निदान आपण तरी–''
इतक्यात एक सेवक सदरेवर वर्दी देण्यासाठी आला. अदबीचा मुजरा करून तो म्हणाला,
''महाराज, खंडो बल्लाळ आपल्या भेटीस आले आहेत.''
''कोण? खंडो बल्लाळ?'' महाराजांनी शंका व्यक्त केली.
''होय. बाळाजी आवजी चिटणिसांचे चिरंजीव खंडो बल्लाळ,'' महाराणींनीं खुलासा केला.
''अस्सं! म्हणजे ज्यांना आम्ही हत्तीच्या पायाखाली चिरडून ठार करण्याची शिक्षा दिली, त्यांचे चिरंजीव आमच्या भेटीस येत आहेत तर–''
''महाराजांनी सावध असावं,'' महाराणींनी धोक्याचा इशारा दिला.

◆

# अभंगवाणी

विटेवरी उभा दीनांचा कैवारी । भेटाया उभारी दोन्ही बाह्या ॥
दीनांची माऊली आजि म्या देखियली ॥
कटी ठेऊनिया कर । उभी राहे विटेवर ॥
मुगुट रत्नांचा साजिरा । वरी मोतियांचा तुरा ॥
रूप लावण्य गोजिरे । हृदयी पदक साजिरे ॥
कांसे पिवळा पीतांबर । चरणी ब्रिदाचा तोडर ॥
भक्तां कृपेची सावली । नामा वंदी पायधुळी ॥



-संत नामदेव

कोण तो सोवळा कोण तो वोवळा ।
दोहींच्या वेगळा विठ्ठल माझा ॥
कोणासी विटाळ कशाचा जाहला ।
मुळीचा संचला सोवळाची ॥
पंचाचा विटाळ येकचिये अंगा ।
सोवळा तो जगामाजी कोण ॥
चोखा म्हणे माझा विठ्ठल सोवळा ।
अरूपे आगळा विटेवरी ॥

-संत चोखामेळा



खेळ मांडियेला वाळवंटी घाई ।
नाचती वैष्णव भाई रे ॥
क्रोध अभिमान केला पावटणी ।
एक एका लागतील पायी रे ॥
वर्णाभिमान विसरली याती ।
एक एका लोटांगणी जाती ॥
निर्मळ चित्ते झाली नवनीते ।
पाषाणा पाझर सुटती रे ॥


-संत तुकाराम








Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. SDO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018
Posting at Marketyard, PSO, Pune 411037.
Publication Date : 09/07/2018 Posting Date : 11/07/2018



## आवर्जून वाचावे






**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,